


अधिक चौकशीसाठीं भेटा/लिहा:

**मे. आनंद ट्रेडर्स,**
११८० बुधवार पेठ, पुणें-२.

उत्पादक:

**मे. मिनीएचर इलेक्ट्रिकल्स**
जयसिंगपूर

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : अठरावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशाची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**स. न.** **सप्टेंबर ४**

'शिवसेना ! सावधान !' हा श्री. सदाशिव पेठकर यांचा लेख वाचला. सावध होण्याएवढा तो वस्तुनिष्ठ आहे का ? मार्गदर्शन करण्याचा केवळ वाऊ करून पेठकरांनी 'शिवसेने'वर भलभलते आरोप मात्र केलेत.

'शिवसेने'संबंधी दक्षिण भारतीय नागरिकांत भीती वसत आहे, तो काहीसा व्यथितचित्त झाला आहे. 'शिवसेने'ने 'मद्राशा'विरुद्ध थयथयाट सुरू केला आहे, निरपराध उडुपी हॉटेलवाल्यांना आपल्या रागाची शिकार केली आहे, असे श्री. पेठकर म्हणतात. एवढी बंडाळी माजली असतानाही दाक्षिणात्यांचा मुंबईकडे येणारा लोंढा कमी न होता 'पुरा'समान वाढत राहावा व ते ह्या मुंबईत राजरोसपणे सुरक्षित मिरवावेत हे आश्चर्य नोव्हे का ? 'शिवसेने'वर आजतागायत निरर्थक व आकसी आरोपांची कुभांडे रचली गेली असताना त्यातील एकतरी आरोप सिद्ध झाला आहे का ? उलटपक्षी दाक्षिणात्य गुंडांकडून मराठी माणसांवर अत्याचार होत असल्याचे चव्हाटयावर आले असताना 'शिवसेना' म्हणजे अनेक तोंडांचा राक्षस आहे, असे उद्गार इंदिराबाईंनी काढले. त्या मागे 'शिवसेने'ची गुंडगिरी त्यांना अभिप्रेत आहे, हे उघड आहे. या विधानाला कोणता आधार आहे ?

**सुभाष राजाराम परुळेकर**, कुर्ला, मुंबई,

**मूल्य ४० पैसे**
**४१९ नारायण**
**पुणे २**
**दूरध्वनी : ५७३५९**

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच, असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# १ शिवसेना

**स. न.** **सप्टेंबर ४**

सदाशिव पेठकरांचा ' दिल्ली दरबारा 'तील ' शिवसेना सावधान ' हा २–९ च्या अंकातील लेख वाचला. त्यात शिवसेनेला एका उद्योगपतीकडून पैशाचा पुरवठा होत असल्याचा आरोप श्री. मधू लिमये यांनी केला आहे, त्याबद्दल संशय व्यक्त करण्यात आला आहे. पुढे चर्चेच्या ओघात शिवसेनेने प्रारंभापासून मद्राशांविरुद्ध थयथयाट सुरू केल्याबद्दल नापसंती व्यक्त करून मराठी समाजाला आत्मसंशोधनाची गरज असल्याचे प्रतिपादले आहे.

शिवसेनेने निरापराधी उडुपी हॉटेलवाल्यांना आपल्या रागाची शिकार का केली ? आणि शिवसेनेला उद्योगपतीकडून पैशाचा पुरवठा होतो, असा आरोप मधू लिमये यांनी का करावा ? उत्तरासाठी काही गोष्टी डोळसपणे पाहणे आवश्यक आहे.

' पाचच काय परंतु पाच हजार वर्षे मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही ' अशी मदोन्मत्त भाषा ज्यांच्या तोंडी होती त्या स. का. पाटलांना गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेनेने दिलेला-कावेबाज पाठिंबा आणि त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी जॉर्ज फर्नांडीस ह्यांच्याविरुद्ध प्रचाराची उडवलेली राळ; मुंबईतील थैलीशहांचे एक अग्रणी हरिष महिंद्र ह्यांचा शिवसेनेने ह्याच निवडणुकीत केलेला पाठपुरावा; इतकेच काय, बेळगाव कारवारच्या प्रश्नावरून सचिवालयाला घातल्या गेलेल्या घेरावोचे निमित्त करून ज्या शांतिलाल शहांनी राजीनामा दिला त्या शांतिलाल शहांच्या विरुद्ध उभ्या असलेल्या गोखल्यांची पाच भस्मासुरांपैकी एक म्हणून केलेली संभावना ह्या गोष्टी काय दर्शवितात ? ज्या लोकसत्ता, जन्मभूमी, टाइम्स या मुंबईतील मांडवलशहांच्या वृत्तपत्रांनी एकमुखी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ बदनाम करण्याचा प्रयत्न केला तीच वृत्तपत्रे आज शिवसेनेवर स्तुतिसुमने उधळताहेत ही गोष्ट काय दर्शविते? ' शिवसेनेची दखल घेतली पाहिजे ', ' मराठी लोकांवर अत्याचार झाले तर त्याचा प्राणपणाने मी प्रतिकार करीन' असे स. का. पाटील आज का म्हणू लागलेत? त्यांना गोरगरीब, कारकून, मजूर असलेल्या मराठी माणसांचा आजच का पुळका यावा ? ह्या सर्वांचं कारण एकच. शिवसेनेच्या बनावामागे मुंबईतील थैलीशहांचं सुपीक डोकं आहे. आणि ह्याचमुळे शिवसेनेची चळवळ संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसारखे उग्र स्वरूप कधीच धारण करू शकणार नाही. तिचं मूळ अधिष्ठान गोरगरीब मराठी जनतेत नसून थैलीशहांचे हितसंबंध हे तिचे मूळ अधिष्ठान आहे. सर्वत्र बोकाळलेल्या बेकारी, ले ऑफ, महागाई, भ्रष्टाचार या विरुद्ध चिडलेल्या जनतेचा बुद्धिभेद करून सर्व त्वेष यंडू गुंडू विरुद्ध कसा वापरला जाईल आणि श्रमिक जनतेत

फूट कशी पडेल ह्याचा विचार करूनच मुख्यत: शिवसेनेचे डावपेच आखलेले आहेत. मुंबईतील मराठी जनतेच्या लक्षात हे डावपेच हळूहळू येताहेत व ती खरोखरच अंतर्मुख होऊन विचार करू लागली आहे आणि विचार करता करताच पटू लागते की, मधू लिमयांच्या उद्गारात तथ्य आहे.

**ज. रा. मदन**, मुंबई

## २

शिवसेनेला सध्या जी प्रसिद्धी मिळत आहे ती पाहून कमालीचे आश्चर्य वाटते. शिवसेनेचा जन्म होऊन अजून पुरते एक वर्षही झालेले नाही इतक्या अल्पावधीत इतकी प्रसिद्ध पावलेली दुसरी एखादी संघटना ऐकिवात नाही. ह्या प्रसिद्धीची कारणे अनेक आहेत. त्यातील एक कारण म्हणजे महाराष्ट्राला बदनाम करण्याची एक मोठी संधी काही खलनायकांना मिळाली आहे. अशीच एक सुवर्ण संधी म. गांधीखुनाच्या वेळी मिळाली होती. शिवसेनेच्या कार्यापेक्षा तिच्याबद्दल केलेल्या आरडाओरडीमुळेच ती अधिक प्रसिद्ध होत आहे. आज अनेक अविचारी पुढारी निष्कारण शिवसेनेवर गरळ ओकीत आहेत आणि महाराष्ट्राबाहेरील लोकांची शिवसेना, महाराष्ट्र सरकार आणि महाराष्ट्र जनता ह्यांच्याबद्दल अत्यंत विपरीत कल्पना करून देत आहेत. मुंबईत परप्रांतीयांचे—विशेषत: दक्षिण भारतीयांचे—जीवन धोक्यात आहे अशी अफवा पसरवली जात आहे. भारताचे गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनी मुंबईतील पोलिस कमिशनरांजवळ केलेल्या चौकशीवरून तर असे कळते की, परप्रांतीय मुंबई सोडून जात आहेत ही गोष्ट धादांत खोटी आहे; उलट पूर्वीप्रमाणेच त्यांचा मुंबईकडील दैनंदिन वाढता लोंढा अव्याहत येत आहे. महाराष्ट्र सरकार आणि महाराष्ट्रातील जनतेला बदनाम करून मुंबई केंद्रशासित करावी ह्या मागणीला जोर मिळावा हा शिवसेनेवरील प्रखर टीकेमागील एक दुष्ट हेतू आहे. गोव्याचे मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकर ह्यांनी हा हेतू एका सभेत जाहीर केला. २७ ऑगस्टच्या नवशक्ती आणि २८ ऑगस्टच्या टाईम्स ऑफ इंडियामधील ही एक बातमी आहे. श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांचे गृहमंत्रीपद हिरावून घेण्याचा प्रयत्नही ह्यात आहे असे त्यांच्या शिवसेनेशी लावलेल्या संबंधावरून म्हणावे लागते. श्री. राजगोपालाचारी ह्यांच्या ' स्वराज्य 'मधील लेखावरून हे स्पष्ट होते. केवळ एक मराठी माणूस असल्यामुळे ज्यांना यशवंतरावांसारख्या अत्यंत कार्यक्षम गृहमंत्र्याचा मत्सर वाटतो त्यांना शिवसेनेवर टीका करण्याचा काय अधिकार पोहोचतो ?

शिवसनेवरील टीकेचे दुसरे एक कारण म्हणजे शिवसेनेची वाढती शक्ती. हे

[ पृष्ठ ६२ वर चालू ]

# मुक्काम श्रीनगर

## २

## माणूस प्रतिनिधी

त्या दिवशी सकाळी—१५ ऑगस्टला—श्रीनगरमधील रिगल चौक मुलामाणसांनी, तरुणतरुणींनी, आबालवृद्धस्त्री-पुरुषांनी नुसता फुलून निघाला होता. चौकाला मिळणारे चारी रस्ते सारखे वाहत होते. सर्वांच्या मुखातून एकच घोष, एकच गर्जना निघत होती—' भारत भाग्यविधाता, ' ' भारतमाता की जय '—' भारता जागा हो, भारतीय बांधवांनो, आम्हांला साथ द्या, आम्हांला आपल्याशिवाय कोणाचा आधार आहे ! ' श्रीनगरात हे नवीन होते, अपूप होते. निदान गेल्या वीस वर्षांत हे शब्द, हा घोष, ही भारताविषयीची आत्मीयता येथल्या वातावरणाला अपरिचित होती. कुणालाही यात आव्हान नव्हते, कुठलाही आक्रमकपणा यात अभिप्रेत नव्हता. होता एक अविचल निर्धार, होती न्यायाची एक साधी, सरळ मागणी. श्रीनगरातील भारतीय म्हणवणारे, पण भारतीयत्वाच्या खाणाखुणा पुसून टाकणारे, जवळजवळ स्वतंत्र कारभार करणारे, दिल्लीलाही वेळप्रसंगी झुगारून देणारे शासन आपल्यावर अन्याय करीत आहे, आपले उरलेसुरले अस्तित्वच काश्मिरातून नाहीसे करण्याच्या खटपटीत आहे हे पाहिल्यावर, या श्रीनरातील पंडित समाजाने दिल्लीला जाग आणण्यासाठी, साऱ्या भारताचे लक्ष वेधण्यासाठी १५ ऑगस्टच्या सुमुहूर्तावर रिगल चौकाचा—श्रीनगरातील या मध्यवर्ती स्थानाचा—शेवटी आश्रय घेतला होता. नेहमीच जिथल्या साचिवालयावर भारतीय राष्ट्रध्वजाबरोबरच जम्मू आणि

काश्मीर राज्याचा स्वतंत्र लालध्वज बेमुर्वतखोरपणे डौलत असतो, तेथे निदान १५ ऑगस्टला तरी, निखळ भारतीय निष्ठा प्रदर्शित करण्याचा कार्यक्रम सहज खपवून कसा घेतला जाणार? काहीतरी तिखट, झणझणीत, कायमचा लक्षात राहील असा जबाब पंडितांना दिलाच पाहिजे, जमल्यास सादिकही बदनाम झालाच पाहिजे. पंडितांची खोडही मोडावी, राजकारणही साधावे. त्या दृष्टीने मग सर्व तयारी झाली, पोलिसदलाला अवश्य त्या सूचना दिल्या गेल्या.

तशी परमेश्वरी आंदोलनाला ११ ऑगस्टपासूनच सुरुवात झाली होती. पाच-पाच पंडितांची एक एक तुकडी रोज सत्याग्रह करीत होती, त्यांना निरोप देण्यासाठी लोक जमत होते, सभा होत होत्या; या सभांवर व क्वचित होणाऱ्या मिरवणुकांवर पोलिसांचे लाठीहल्लेही होत होते. पण १५ ऑगस्टचा रिगल चौकातला सत्याग्रह हे शासनाने आव्हान मानले व कोणतेही प्रक्षोभक कृत्य, एका न्याय्य मागणीसाठी जमलेल्या या हजारोंच्या जमावाकडून घडले नसताना पोलिसांनी जमाव हटवण्याच्या निमिताने निर्लज्ज वागणुकीची कमाल केली. माणुसकीला काळीमा आणणारी पोलिसांची ही संतापजनक वागणूक तेथे उपस्थित असणाऱ्या कोणालाही विसरता येणे अशक्य होते. १५ दिवसांनंतर मी श्रीनगरात पोचलो व ज्याला ज्याला म्हणून या घटनेविषयी विचारले, त्याने कधी शरमेने मान खाली घातली, संतापाने भुवई वर चढली, कधी त्याच्या डोळ्यांत एकदम पाणी तरळले. एक अनुभवी व दिल्लीतील एका नामवंत इंग्लिश वृत्तपत्राचा वार्ताहर मला सांगत होता, 'त्या दिवसापर्यंत मी या आंदोलनाविषयी तटस्थ होतो. पण त्या दिवशी पोलिसांनी केलेला रानटीपणा पाहून मीही हादरलो, हबकून गेलो. अखेर मीही एक माणूस आहे. वस्तुनिष्ठ वार्ता देणे हे माझे कर्तव्य असले तरी मलाही काही भावना आहेत, न्याय-अन्यायाची चाड आहे. त्या दिवशी गरज नसताना पोलिसांनी केवळ निर्घृण लाठीहल्लाच केला असे नाही, कच्चीबच्ची पोरे—स्त्रियांच्या अंगाखांद्यावर असलेली मुलेही—सडकून काढली असे नाही, हवेत अश्रुधूर सुटले, गोळीबार झाला असे नाही. हे मी एक वेळ समजू शकतो. पोलिस बेफाम वरेचदा होतात. पण त्या दिवशी—१५ ऑगस्टच्या या राष्ट्रीय महत्त्वाच्या दिनी, सुप्रभाती, येथे-या रिगल चौकात—भारतीय स्त्रीत्वाची जी विटंबना करण्यात आली ती मी समजूच शकत नाही. हे कृत्य पूर्वनियोजितच असले पाहिजे. ढकलाढकली, मारपीट तर काहीच नाही. पण कुणाचे केस ओढले गेले, कुणाची वस्त्रे टरकवण्यात आली, नको त्या अवयवांची ओढाताण केली गेली. Even sexual organs were touched. I can't describe. I can't describe. माझ्या शेजारीच एका पाकिस्तानी पत्राचा वार्ताहार हे सर्व दृश्य उभे राहून पाहत होता. तोही हात वर करून एकदम किंचाळला होता, ' No. No. This is not in our culture. '

'हे आमच्या संस्कृतीत बसत नाही.' त्या दिवसापर्यंत अगदी तटस्थपणे पंडितांच्या आंदोलनाकडे पाहणारा मी एकदम त्याविषयी सहानुभूती बाळगणारा झालो, शासनाच्या मनात काहीतरी काळेबेरे आहे अशी शंका त्या दिवसापासून माझ्या मनात घर करून बसली.'

पाकिस्तानी वार्ताहरालाही जे पाहिल्यावर असभ्य, नीच, रानटी, माणुसकीला काळीमा आणणारे, मुसलमानी संस्कृतीतही न बसणारे असे वाटले ते आमच्या दिल्लीतील बड्या इंग्रजी पत्रातून कसे छापून आले माहीत आहे ? 'Police mildly latthicharged–' 'पोलिसांनी जमाव पांगवण्यासाठी सौम्यसा लाठीहल्ला केला.'

"असे का चुकीचे छापून यावे ?" मी त्या वार्ताहराला प्रश्न केला.

तो हसला. एवढेच म्हणाला, "तुम्हांला माहीत तर आहे ? माझ्याकडून कशाला काढून घेता ?"

वृत्तपत्रे ही लोकशाहीच्या रक्षणाची हमी आहे, जनतेच्या हातातील ते एक महान शस्त्र आहे......काय राव टिळक–आगरकरांच्या काळातल्या जुन्या बाता अजूनही मारता ! वृत्तपत्रे, विशेषत: मोठी पत्रे, हा आज एक व्यवसाय आहे. बाजारात विकत घेण्याची आणि देण्याची ती एक वस्तू आहे. तिची किंमत मोजली की आपल्याला हवा तसा आणि तेवढाच आवाज तियून निघेल, अशी व्यवस्था करता येते, एवढी साधी गोष्टही तुम्हांला माहीत नाही ?

हजरतबल मशिदीतील पैगंबरांचा म्हणून मानला जात असलेला एक केस नाहीसा झाला तर याच गुलाबी काश्मिरने पाच-सहा वर्षांपूर्वी केवढा पेट घेतला होता ! दिल्ली केवढी हादरली होती ! आमच्या सौजन्यमूर्ती लालबहादुरांना श्रीनगरात केस सापडेपावेतो कसा तळ ठोकून राहावे लागले होते ! शमसुद्दीनसाहेबांच्या मंत्रिमंडळाची आहुती घेऊनच हे वडवडलेले कुंड तेव्हा कसे अखेर शांत झाले होते, करण्यात आले होते ! आठवतो का हा सारा इतिहास ?

पंधराशे वर्षांपूर्वी जगाचा निरोप घेतलेल्या एका थोर प्रेषिताच्या केसासाठी काश्मिर पेटू शकत होते; पण १५ ऑगस्टच्या राष्ट्रीय दिनी, पाकिस्तानी पत्रकारालाही अमानुष आणि रानटी वाटणाऱ्या पद्धतीने भारतीय स्त्रीची अब्रू, दिवसाढवळ्या, श्रीनगरातील भरचौकात लुटली गेली होती, तरीही साधी चौकशीची मागणी सादिकसाहेब धुडकावू शकत होते आणि दिल्लीलाही हस्तक्षेप करण्याची गरज भासत नव्हती, की हिंमतच होत नव्हती ?

पंडितसमाजाची हिंमत मात्र या प्रसंगानंतर खचण्याऐवजी अधिकच वाढली त्यांचा निश्चय अधिकच कणखर झाला. आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार

करण्यात आला. भारतात ठिकठिकाणी पसरलेल्या पंडित समाजाकडून आर्थिक मदतीची आश्वासने येऊ लागली. सहानुभूती व्यक्त करणाऱ्या तारांचा पाऊस पडू लागला, पुढील कार्यक्रमांबाबत सूचना व प्रत्यक्ष भाग घेण्याची तयारीही पत्रांतून कळवली जाऊ लागली. पाच हजारांच्या तुकडीने श्रीनगर ते दिल्ली चालत जाऊन लोकसभेचे द्वार ठोठावावे, काहींनी अग्निसमर्पण करून घ्यावे, प्राणांतिक उपोषणे करावीत, शंभर शंभर कुटुंबांनी काश्मिरातून कायमसाठी बाहेर पडावे असे अनेक कार्यक्रम कृती समितीपुढे या वेळी विचारासाठी होते, यावरून पंडित समाज किती प्रक्षुब्ध झाला होता, जिवावर उदार होऊन आंदोलन यशस्वी करण्याचा त्याचा निर्धार किती तीव्र होता याची काहीशी कल्पना येऊ शकते. चळवळीची रोजची हकीकत, प्रगती पत्रकातून जनतेसमोर ठेवण्यात येत होती. भूमिका पुनःपुन्हा स्पष्ट केली जात होती. सरकारतर्फे करण्यात येत असलेल्या आरोपांचे खंडन केले जात होते.

चळवळीचे लोण हळूहळू इतरत्रही पसरू लागले होते. जम्मूत गडबड सुरू झाली होती, शेजारच्या पंजाब-हरियाना भागातही अस्वस्थता वाढत होती. श्रीनगरातील व एकूण काश्मिरातीलच बहुसंख्य मुसलमान समाजानेही या आंदोलनाबाबत अद्यापपर्यंत स्पृहणीय आलिप्तता राखली होती. जरी या आंदोलनाला काश्मिरातील सर्वसाधारण मुसलमान समाजाचा पाठिंबा होता असे म्हणता येत नसले तरी, १५ ऑगस्टला जे घडले ते वाईट आहे अशीच समजूतदार मुसलमान समाजाची तरी मनोमन भावना होती असा निर्वाळा पंडित समाजातील अनेक कार्यकर्त्यांनी व तटस्थ निरीक्षकांनी मला, दिला हेही येथे नमूद करणे अवश्य आहे.

मात्र हे वातावरण फार तर आणखी एक आठवडाभरच टिकणार होते. त्यानंतर आंदोलनाला एक नवेच जहरी वळण लागणार होते. नवाच जातीय पीळ भरला जाणार होता. अद्यापपावेतो आंदोलन चालू होते, दिवसेंदिवस तीव्रता वाढत होती, पोलिसांचे अत्याचार सुरू होते—एवढीच आंदोलनाची व्याप्ती होती. पण आठवड्याभराने चित्र पालटणार होते. हजारो वर्षे गुण्यागोविंदाने शेजारी राहत असलेल्या हिंदूंच्या घरात मुसलमान गुंड घुसणार होते. जाळपोळी होणार होत्या, दंगली उफाळणार होत्या, लुटालूट होणार होती. आंदोलनाने हे जातीय वळण का घेतले? याला जबाबदार कोण? निमित्ताचा धनी कोण ठरला आणि खरी कारस्थाने कोणी रचली?

[ पुढील अंकी ]

# सी मा प्र दे शा ती ल

मणिपूरसारख्या पूर्व सीमेवरच्या एका जिल्ह्याएवढ्या प्रदेशातही काँग्रेसवर तोंड बचावण्याची पाळी यावी, ही मोठी गंमतीची गोष्ट आहे. अवघ्या बत्तीस सदस्यांची ही विधानसभा ! पण तेथेही संयुक्त आघाडीच्या नेत्यांनी काँग्रेस-सदस्य फोडण्याची किमया करून दाखविली. बहुमत आता संयुक्त आघाडीच्या पाठीमागे आहे हे काँग्रेसच्या सूत्रधारांना कळून आल्यानंतर परिस्थितीला सरळ तोंड देण्याऐवजी त्यांनी चीफ कमिशनरांवर विधानसभा पंधरा दिवस स्थगित करण्याबाबत दडपण आणले आणि चीफ कमिशनरांनीही ते मान्य केले. त्यामुळे मणिपूरसारख्या केंद्रशासित प्रदेशातील नामुष्की काँग्रेसवाल्यांनी आणखी पंधरा दिवस पुढे ढकलली आहे इतकेच.

आता या पंधरा दिवसांत कोणते प्रयत्न होणार आहेत हे काही नव्याने सांगावयास नकोच. बंडखोरांना पुन्हा काँग्रेसमध्ये आणण्यासाठी नवी आमिषे दाखविली जातील आणि या आमिषांना हे बंडखोर बधत नाहीत असे जर आढळून आले तर दिल्लीश्वरांच्या आशीर्वादाने विरोधी पक्षांतील काही सदस्यांनाच गळाला लावण्याच्या कारवाया सुरू होतील. वस्तुतः मध्यप्रदेशात पं. द्वारकाप्रसाद मिश्रा यांना हाच प्रयोग करून पाहावयाचा होता. परंतु तेथील राज्यपालांनी विधानसभेचे अधिवेशन स्थगित करण्यास व संपूर्ण विधानसभाच विसर्जित करण्यास विरोध केल्यामुळे मिश्राजींना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देऊन स्वस्थ बसावे लागले. मध्यप्रदेश हे एक राज्य होते तर मणिपूर हा लहानसा केंद्रशासित प्रदेश आहे. त्यामुळे येथील चीफ कमिशनरांना दिल्लीच्या मेहेरबानीची अधिक गरज असल्यामुळे त्यांनी मध्यप्रदेशाच्या राज्यपालांचे अनुकरण न करता विधानसभाच तूर्त तहकूब करून काँग्रेसवाल्यांना सत्ता राखण्यासाठी पंधरा दिवसांची मुदत दिली आहे. पुढल्या आठवड्यात मणिपूर विधानसभेची बैठक सुरू होईल त्या वेळी काँग्रेसच्या डावपेचांना कितपत यश आले याचे चित्र स्पष्ट होईल.

गेली वीस वर्षे सत्तेचा सुखेनैव आस्वाद घेतलेल्या काँग्रेस पक्षाच्या भ्रष्टाचारी राजवटीमुळे सर्वत्र सर्वसामान्य माणूस काँग्रेसवर नाराज झालेला आहे. गेल्या काही वर्षांत जीवनमान महागले आहे म्हणून हा रोष झाला आहे असे काँग्रेसवाले सांगत असले तरी ते खरे नव्हे. काँग्रेसच्या राजवटीत लाचलुचपत, वशिलेबाजी आदी समाजद्रोही प्रवृत्तींना इतक्या पद्धतशीरपणे खतपाणी मिळाले आहे की, सच्चा

# सत्तेचा बुजबुजाट

काँग्रेसवाला शोधून सापडणेही दुर्घर झाले आहे. सत्तेचा वारेमाप हव्यास आणि त्या हव्यासापायी जनतेच्या पैशाची बेमुर्वतखोर उधळपट्टी म्हणजे काँग्रेसी राजवट हे समीकरण लोकांच्या मनांत दृढ होऊन बसले आहे. त्याला काँग्रेसवालेच कारणीभूत आहेत. त्यामुळे कोठेही काँग्रेसचे मंत्रिमंडळ गडगडले की, लोकमानसाला विशेष आनंद होतो आणि एका मर्यादित अर्थाने तो स्वाभाविकही आहे.

परंतु प्रश्न असा की, मणिपूर विधानसभेतील काँग्रेस-पक्षाच्या ज्या आठ सदस्यांनी काँग्रेसशी घटस्फोट घेऊन संयुक्त दलाशी सोयरीक केली त्यामागे त्यांची वैचारिक भूमिका कोणती आहे? काँग्रेसचे धोरण वा कार्यक्रम कालपर्यंत ज्यांना मान्य होता व ज्यांनी गांधी-नेहरूंच्या पुण्याईवर निवडणुका जिंकून आमदारपदे मिळविली त्या आठ सदस्यांना आजच काँग्रेस त्याज्य व तिरस्कारार्ह का वाटावी? काँग्रेस पक्षाने हस्तगत केलेल्या सत्तेची खिरापत आपल्या हातावर पडली नाही, यासाठीच जर हा त्रागा असेल तर निवडणुका यासाठीच लढवावयाच्या असतात का, हा प्रश्न निर्माण होतो. अर्थात हा प्रश्न विचारण्याचा जसा विरोधी पक्षाला अधिकार उरलेला नाही, तसाच तो काँग्रेसलाही उरलेला नाही. कारण, जेव्हा जेव्हा काँग्रेस पक्ष अडचणीत सापडला तेव्हा तेव्हा विरोधी पक्षांतील सत्तापिपासू सदस्य फोडूनच काँग्रेसने आपली प्रतिष्ठा सावरल्याचे दाखले गेल्या वीस वर्षांच्या आपल्या संसदीय राजकारणात जागोजागी विखुरलेले आहेत. कोठे जातीचा आधार घेऊन, कोठे भाषेचा आधार घेऊन तर कोठे धर्माचा आधार घेऊन हेच सत्ताबाजीने पछाडलेले राजकारण काँग्रेस खेळत आली आहे. त्यामुळे मणिपूर विधानसभेतल्या आठ बंडखोरांना संसदीय नीतीचा प्रश्न विचारण्याच्या भानगडीत दिल्लीश्वरांनी पडू नये.

मणिपूर हा पूर्व सीमेवरचा आणि त्यातूनही पाकिस्तानला भिडणारा आपला सीमाप्रदेश आहे. नागा आणि मिझो बंडखोर याच मणिपूरमधून पूर्व पाकिस्तानमध्ये पळून जात असतात. या बंडखोरांसाठी चीनने मणिपूरलगतच्या पाकिस्तानी प्रदेशातच छुप्या युद्धाची शिक्षणकेंद्रे उभारली आहेत. त्यामुळे भारताच्या संरक्षणव्यवस्थेच्या दृष्टीने मणिपूरचे महत्त्व विशेष मानावे लागते. अशा या सीमावर्ती प्रदेशात हा जो लोकशाहीचा पोरखेळ चालू झाला आहे तो चालू ठेवणे काँग्रेस पक्षाला काय किंवा विरोधी पक्षाला काय कितपत परवडण्यासारखा आहे याचा विचार करता ही घटना मला चिंतनीय वाटते. मंत्रिमंडळातल्या एखाद्या खुर्चीसाठी वैचारिक निष्ठे-

वर बेगुमान रीतीनी पाणी सोडणारे हे लोकप्रतिनिधी पाहून, अधिक वैयक्तिक लाभ होतो आहे असे आढळून आल्यानंतर ते देशशत्रूशीही हातमिळवणी करणारच नाहीत अशी कोणी तरी हमी देऊ शकेल काय ? मणिपूर हा चिनी हेरांनी बुजबुजलेला प्रदेश आहे. साऱ्या भारतात चिनी पद्धतीची क्रांती करण्याचा आदेश देणारे प्रचार-वाङ्मय याच भागातून साऱ्या भारतात विखुरले जाते. अशा वेळी सत्तेसाठी जीव टाकणाऱ्या या महाभागांचा परकीय सत्ता उपयोग करून घेणारच नाहीत असे आपण मानून चालणे कदाचित् आत्मसंतुष्टपणाचे ठरेल, पण त्यातच आत्मघाताची बीजे दडलेली आहेत हे कसे नाकारता येईल ?

त्यातून पाकिस्तान्यांनी पोखरलेला आसाम आणि डाव्या कम्युनिस्टांनी कच्छपी लावलेला बंगाल ही दोन्ही राज्ये मणिपूरच्या शेजारी आहेत. त्यामुळे पाकिस्तान्यांना आणि चिनी हस्तकांना मणिपूरमधील असंतोष स्वतःच्या उद्दिष्टांसाठी राबविणे किती सोयीचे जाणार आहे हे सहज समजते.

## भयावह धडक

पश्चिम बंगालमधल्या संयुक्त सरकारवर डाव्या कम्युनिस्टांनी आपला प्रभाव किती पाडला आहे आणि या प्रभावाच्या बळावर तेथील राज्ययंत्रणा आपल्या अंतिम उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी पोखरून टाकावयाचे कार्य त्यांनी किती वेगाने सुरू केले आहे यासंबंधीचे सविस्तर अहवाल वारंवार प्रसिद्ध होतच असतात. इंदिरा गांधी यांचे केंद्रीय सरकार प्रतिगामी असून ते उलथून पाडले पाहिजे असे पेकिंग नभोवाणीवरून सारखे सांगण्यात येत आहे आणि माओचा हा आदेश शिरोधार्य मानून डावा कम्युनिस्ट पक्ष बंगालमध्ये आपल्या मुक्ति–मोहिमेची बीजे पेरू लागला आहे. नक्षलवारी हे त्यापैकी लक्षात आलेले एक बीज. राष्ट्र या कल्पनेवर कम्युनिस्टांचा विश्वास नाही. त्यांची लोकशाहीवर तीळभरही श्रद्धा नाही. त्यांची स्वतःची अशी खास लोकशाही असते. स्टॅलिनच्या रशियाने ती अनुभवली आहे आणि आज माओचा चीन ती मनमुराद अनुभवत आहे. पददलितांच्या क्रांतीचे मोहक नाव घेऊन पददलितांच्या असंतोषावर स्वार होऊन सत्ताकेंद्रे काबीज करावयाची व अखेरीस एकतंत्री सुलतानी राजवटीचा पुकारा करावयाचा याशिवाय कम्युनिस्टांना दुसरे ध्येय नसते. इंडोनेशियात त्यांनी हाच प्रयत्न करून पाहिला. तेथील राष्ट्रीय आंदोलनाच्या नरडीला नख लावून इंडोनेशियाला चीनच्या हातातील बाहुले बनविण्यापर्यंत इंडोनेशियन कम्युनिस्टांची मजल गेली होती. आयत्यावेळी तेथे लष्कर जागे झाले आणि त्याने या देशद्रोह्यांचा निर्घृण निःपात केला म्हणून इंडोनेशिया वाचला. एरवी उत्तर कोरियाच्या नशिबी जे आले आहे तेच इंडोनेशियाच्या नशिबी यावयाचे.

कम्युनिस्टांचे हे स्वरूप कदाचित कोणाला अतिशयोक्त वाटण्याचा संभव आहे.

परंतु जेथे सरकार कामगारांना घेराओचा आदेश देतें आहे तेथे त्या सरकारला अखेरीस काय अपेक्षित आहे या प्रश्नाचे उत्तर शोधल्यानंतर ही अतिशयोक्ती वाटण्याचे कारण उरणार नाही. एकदा कम्युनिस्ट राजवट आली की काय होते याचे मुद्दाम भडक चित्र रंगविण्याचेही कारण नाही. झेकोस्लोव्हाकिया किंवा हंगेरी-पोलंड आदी पूर्व युरोपीय राष्ट्रांना किंवा आपल्या उत्तर सीमेवरच्या तिबेटला विचारले की कम्युनिस्ट राजवटीच्या भयावह स्वरूपाची स्पष्ट कल्पना येईल. इतकेच कशाला, स्टॅलिन-कन्या स्वेटलाना हिच्या आठवणी सध्या ज्या प्रसिद्ध होत आहेत त्यांतही कम्युनिस्ट राजवट ही काय चीज असते याची भरपूर उदाहरणे वाचावयास मिळत आहेत. लोकशाही, मतस्वातंत्र्य, मानवी जीवनाची प्रतिष्ठा या साऱ्या कल्पना तेथे कवडीमोल ठरतात.

मणिपूरमधल्या क्षुल्लक घटनेमुळे हे सारे विचार सुचण्याचे कारण इतकेच, की गेल्या सहा महिन्यांतला संयुक्त आघाडीचा कारभार आणि त्याद्वारे इतर पक्षांना बदनाम करून लोकमानसात आम्हीच तेवढे तुमचे कैवारी आहोत ही प्रतिमा स्थापन करण्याची खटपट या दोन उद्दिष्टांत कम्युनिस्टांनी जी धडक दाखविली आहे तिच्या भयावह परिणामांचा वेळीच शांत चित्ताने विचार व्हावयास हवा. या एका प्रश्नाबद्दल तरी कम्युनिस्ट सोडून काँग्रेससह सर्व पक्षांना एकत्र येण्यास काहीच प्रत्यवाय नाही. प्रत्येक पक्षाचे नेते खाजगी बैठकीत ही गोष्ट मान्यही करतात. परंतु त्या दृष्टीने पाऊल पडत नाही हे मात्र खरे.

**— सदाशिव पेठकर**

## हिप्पीज्

‘ हिप्पीज् ’ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ‘ मूर्तिभंजक ’ पाश्चिमात्त्य तरुण-तरुणींची आता भारतीयांना बरीच ओळख झाली आहे. त्यांच्याबरोबर राहून त्यांचे जीवन जवळून पाहणाऱ्या सौ. केली नावाच्या कॅनेडियन पत्रकार-स्त्रीने भारतात प्रकट केलेले मत :

“ हिप्पीज् ही एक धार्मिक चळवळ आहे. त्यांचा तिरस्कार करणाऱ्या बहुतेक लोकांना त्यांच्याबद्दल चुकीची माहिती मिळालेली असते. हिप्पीज् हे खरे म्हणजे एक प्रकारच्या भिक्षू-भिक्षुणी आहेत. ते मादक द्रव्यांचे व्यसनी नाहीत. ”

# मुक्ताफळे

## ☐ सुसर–सुख !

भारतावर जेव्हा राणीचे राज्य होते तेव्हाची ही गोष्ट आहे. एका गावात मध्यभागी एक पाण्याचे सुंदर तळे होते. किंबहुना तो तलाव होता म्हणून तर त्याच्याभोवती गाव वसले होते. जलाशयातले पाणी गोड होते. गावात पाण्याची टंचाई नव्हती. बायका सुखाने पाणी भरत होत्या. परंतु हे सुख देवाला पाहवले नाही म्हणा किंवा काहीही म्हणा ! एक दिवशी मली मोठी सुसर त्या तळ्यात अवतीर्ण झाली.

सकाळी बायका पाण्याला येतात तो तलावात सुसर ! मजेत पोहत होती. हंडे तिथेच टाकून सर्व स्त्रिया किंचाळत पळाल्या. हळूहळू पुरुष माणसे, पोरांना मागे ढकलीत, तलावातील सुसर पाहण्यासाठी जमली. सर्वांच्या बायका आपापल्या नवऱ्यांना मागे ओढीत म्हणत होत्या, " अहो, तुम्ही पुढे जाऊ नका !"

अखेर गावकऱ्यांनी ठरवले, राणी सरकारकडे अर्ज करावा. अर्ज पुणेरी वृत्तपत्रांत छापून झाला–" गावाच्या तलावात सुसर, मारणे श्रेयस्कर. मारावी विनंती."

सरकारी चक्रे हलू लागली. सुसर पाण्यात मजेत होती. गावकरी शेजारच्या गावातून कावडीने पाणी आणू लागले. पाण्याचा भाव रुपया हंडा झाला.

अखेर सहा महिन्यांनी सरकारातून उत्तर आले–" सुसर मारण्याकरता रखवालदाराची नवी जागा निर्माण करण्यात आली असून त्या जागी लवकरच नेमणूक होईल."

गावकरी वाट पाहत होते. सुसर सुखात होती. लोक पाणी पाणी करीत होते.

अखेर एक दिवशी बंदूक घेऊन रखवालदार तळ्याच्या काठी कामावर रुजू झाला. नोकरी लागल्याबद्दल त्याने पेढे वाटले. लोकांना हायसे वाटले. लोक वाट पाहत होते. सुसर मारल्याची बातमी लवकरच येईल. तलाव पुन: मोकळा होईल.

आठवडा गेला, आठवडे गेले. महिना गेला, महिने गेले. रखवालदाराचे पहिले इन्क्रिमेंट झाले. ३५–१–४० च्या ग्रेडमध्ये हळू हळू तो मॅक्झीममला पोचणार, असे लोक म्हणू लागले ! सुसर पोहत होती.

शेवटी गावकऱ्यांनी 'तलाव मुक्ती' आंदोलन उभारले. डेलिगेशन रखवालदाराकडे गेले. त्यांनी विचारणा केली–

" साहेब, आपण चतुर्थश्रेणीचे अधिकारी आहात. जबाबदारी आपल्याला कळते. आपण खांद्यावर बंदूक टाकून नुसते काठावर गेली कित्येक वर्षे फिरत आहात. सुसर लोकांनी दाखवली तरी आपण मारीत का नाही? सुसरीला पोरे व्हायची वेळ आली आहे!"

रखवालदार हसला. तो खांद्यावर बंदूक टाकून फिरतच होता. डेलिगेशन त्याच्या मागे उत्तरासाठी धावत होते. त्याने एकदम अबाउट टर्न करून सांगितले–

" तुम्हांला सुसर मारायला हवी आहे. मी सुसर मारली तर माझ्या पोटापाण्याची काय वेवस्था?"

डेलिगेशन बुचकळ्यात पडले. आता सुसर मारायला याला नेमल्यावर याने असा वाकडातिकडा ' जंक्शन ' प्रश्न का हो विचारावा, हे त्यांना कळेना. रखवालदाराने खुलासा केला–

" सुसर मेली की माझ्या जागेचे सँक्शन संपले! मला नोकरीवरून काढतील, नोकरी टिकायची तर सुसर जगली पाहिजे!"

गावकऱ्यांच्या डेलिगेशनला हा मुद्दा एकदम पटला. त्यातला एक पुढारी होता. तो म्हणाला,–" नहीं होगी नहीं होगी! नोकरकपात नहीं होगी!" एक सरकार विरोधीही होता. तो म्हणाला–" यह सरकार निकम्मी है।" एक फॉरेस्ट खात्यातला होता. तो म्हणाला–" वन्य पशूंचे रक्षण हेच देशाचे भूषण!" गावातल्या जनतेचे तलावमुक्ती आंदोलन मग संपुष्टात आले.

पुढे वर्षानुवर्षे ती सुसर त्या तलावात सुखाने नांदत होती. रखवालदार परमनंट झाला. त्याने लग्न केले. त्याला मुले झाली व यथावकाश त्याने पेन्शनही घेतले.

तात्पर्य, सरकारी नोकरी फार पुरातन काळापासून अती सुखाची नोकरी आहे. कामाचा पगाराशी इथे संबंध नसतो. एकदा चिकटला की सहसा त्याला कामावरून कुणी यापुढे काढत नाही. जनता त्याच्याशी अदबीने वागते. गावात खूप सरकारी नोकर असणे हे गावाचे सर्वांत मोठे वैभव होय!

राणीचे राज्य गेले. इथून ब्रिटिश सरकार गेले. स्वातंत्र्य आल्यावर लोकांना भीती वाटत होती की सरकारी नोकरी दुःखाची होते की काय? परंतु समाधानाची गोष्ट की सरकारी नोकरी गेली वीस-बावीस वर्षे अतीव सुखाची गोष्ट होत चालली आहे.

सरकार जसजसे नवेनवे उद्योगधंदे ताब्यात घेईल तसतशी ही सुखाची स्थाने वाढत जाणार आहेत. कमीत कमी वेळात चेक वटवणे ही फुशारकी मारण्याची बाब आहे असे बँकांना तूर्त वाटते. तशा जाहिरातीच बँका करतात! आता बँकांचे राष्ट्रीयीकरण होऊ द्या की मग पाहा! लोकच म्हणतील, शंभर रुपये चेकने देणार असाल तर ७५ रोख द्या. बाकीचे सोडतो पण चेक देऊ नका! अर्थात बँकांतील सरकारी कर्मचारी काम कमी झाल्याने सुखी होण्याची वेळ लवकरच येत आहे.

दुर्गापूर येथील सरकारी पोलादाच्या कारखान्यात व दुर्गापूर केमिकल्स या

सरकारी औषधे निर्माण करणाऱ्या कारखान्यातील सरकारी नोकर सुखी आहेत की नाही हे पाहण्याकरता, बंगाल सरकारने श्री. सुकू सेन यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली होती. या समितीचा अहवाल आता प्रसिद्ध झाला आहे.

समितीचे निष्कर्ष फारच आशावादी आहेत. काही निष्कर्ष असे आहेत—

१ : 'दुर्गापूर प्रोजेक्ट' हा कारखाना फायदा व्हावा म्हणून व्यापारी पद्धतीने चालवण्यात येत नाही. परंतु फायदा-तोटा राहिला बाजूला; हा प्रोजेक्ट अजिबात चालतच नाही ! अर्थनियंत्रक जो नेमला आहे तो कसलेही नियंत्रण करीत नाही. किंवा हिशेबही तपासत नाही.

२ : कर्मचारी कामावर वेळेवर येतात किंवा नाहीत, हे इथे कुणी पाहत नाही. त्यांना कामावर हजर असण्याची सक्तीही इथे नाही. येथील कर्मचारी व कामगार मनाला येईल तेव्हा कामावर येतात व घरी जातात. कामावर हजर नसले तरी त्यांचे हजेरीपत्रक भरण्याची व्यवस्था इथे आहे.

३ : ज्या जागा अस्तित्वात नाहीत अशा जागांवर ६७ माणसे नुकतीच नेमण्यात आली व लेखापालांनी सर्वांना पगार वेळच्या वेळी दिला ! त्यांनी जागेची मंजुरी विचारलीच नाही.

४ : लोकांनी अधिक उत्साहाने काम केले तर जो बोनस मिळतो, तो दोन वर्षांत १५२ टक्क्यांनी वाढला असला तरी उत्पादन मात्र घटले आहे !

५ : जादा तासाचे काम जे कामगार करतात त्यांची इथे आश्चर्यकारक नोंद आढळते. एका कामगाराने महिन्यात २६४ तास जादा काम केले ! याचा अर्थ १९ दिवस त्याने रोज १६ तास काम केले व ७ दिवस २४ तास काम केले.

दुर्गापूर केमिकल्स लिमिटेड या कारखान्यात तर सुकू सेन यांना मजाच मजा आढळली.

१ : हा कारखाना चालू शकेल की नाही याचा प्रथम अंदाज कुणीच काढला नाही.

२ : यंत्रसामग्री उभारताना, चुकीचे आराखडे, सदोष पायाभरणी, कंत्राटदाराची अपेशी निवड, यामुळे खूपच काळ वाया गेला.

३ : या कारखान्याचे उत्पादन दुर्गापूरला तर मॅनेजरचे ऑफिस कलकत्त्यालाच असते !

४ : ५४ कोटी रुपये खर्चून सुरू झालेला हा प्रकल्प सावरण्यासारख्या अवस्थेत तूर्त नाही.

दुर्गापुरातील सरकारी कर्मचाऱ्यांचे हे सुखी जीवन खरोखर हेवा वाटण्यासारखे आहे. आता या कारखान्यांतून उत्पादन होत नाही ही चांगली गोष्ट नसली तरी, अखेर सरकारी कारखाने व प्रकल्प हे जर लोकांचे जीवन सुखी करण्याकरता असतील, तर हा हेतू कारखाने नाही चालले तरी इथे साध्य होत नाही काय? कामा-

वर न जाताच हजेरी लागणे, दिवसाचे २४ तास सतत काम केल्याची नुसती नोंद होऊन जादा पैसे मिळणे, कामावर जाता जाता म्हातारा झाला म्हणून यथावकाश बढती मिळणे, यापेक्षा सरकारी कर्मचाऱ्यांची सुखाची अन्य कल्पना तरी काय असू शकेल ?

सुसरीने जगले पाहिजे. रखवालदाराची नोकरीही टिकली पाहिजे. यासाठी सरकारी तलाव अधिक वाढलेच पाहिजेत. सुसरसुख वाढले पाहिजे.

आता बँकांचे सरकारीकरण कधी होते ते पाहावे !

## □ गिरी ते दरी !

काँग्रेस पुढाऱ्यांवर टीका करणाऱ्या वात्रट माणसांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणाऱ्या दोन घटना गेल्या आठवड्यात एकाच दिवशी घडल्या आहेत. केरळात कम्युनिस्ट राजवट आहे. या राजवटीला मुस्लिम लीगचाही पाठिंबा आहे. तेथील सरकारात मुस्लिम लीगचे नेते आहेत. आता कम्युनिस्ट राजवट म्हटली की ती समतेची व गरिबांची कैवारी ! अशा लोकांच्या सहवासात नांदणाऱ्या केरळमधील पुढाऱ्यांनी, त्रिवेंद्रम येथे ठराव काय पास केला ? माहीत नसेल तर वाचा—

केरळ मुस्लिम लीगची बैठक येथे भरून तीत संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियांना—विरोध प्रकट करण्यात आला. लीगने आपल्या ठरावात म्हटले आहे, की जर संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया सक्तीची होणार असेलच तर या कायद्यातून मुसलमानांना वगळण्यात यावे. श्री. अहमद या लीगच्या विधानसभा सदस्याने केरळच्या आरोग्यमंत्र्यांची या बाबतीत भेट घेतली असता त्यांना मंत्रिमहाशयांनी सहानूभूतिपूर्वक विचार करू, असे आश्वासन दिले.

त्रिवेंद्रम, २७ ऑगस्ट, १९६७.

–[ Indian Express 28–8–67 ]

कुठे रफिकमियाँ आणि कुठे हे ' डावे 'मियाँ ! या उलट मुंबईत काँग्रेस पुढाऱ्यांच्या सहवासात असलेल्या मुसलमानांचे पुढारी व महाराष्ट्र सरकारचे आरोग्यमंत्री डॉ. रफिक झकारिया यांनी मुंबईत त्याच दिवशी बोलताना सांगितले—" मुंबईत प्रत्येक चार किंवा पाच संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियांत एक शस्त्रक्रिया मुसलमान धर्मियांवर केली जाते. " आता ही शस्त्रक्रिया मुंबईत व महाराष्ट्रात किती लोकप्रिय झाली आहे, याचे आकडे देताना डॉ. रफिकमियाँ म्हणाले—" गोळा केलेल्या आकड्यांनुसार मद्रास राज्यात ४,९७,३८८ शस्त्रक्रिया करण्यात आल्या व महाराष्ट्राचा नंबर दुसरा लागला. (अरेरे, इथेही दाक्षिणात्यांची शिरजोरी ! ) महाराष्ट्रात ३,१७,४७६ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. " याचा अर्थ महाराष्ट्रात ७९,३६९ म्हणजे जवळजवळ ८०,००० मुसलमानांनी शस्त्रक्रिया करून घेतलेल्या आहेत. काँग्रेस राजवटीत नांदणाऱ्या मुसलमानांचे हे क्रियाशील शहाणपण कुठे

आणि केरळातील नंबुद्रिपाद सरकारच्या कच्छपी लागलेल्या मुसलमानांचे या बाबती-तील अज्ञान कुठे ? डॉ. रफिक झकेरिया यांनी आपले उर्वरित आयुष्य केरळातील मुसलमानांच्या उद्धाराला दिले तरी ती मोठीच देशसेवा होणार आहे.

आता या बाबतीत कर्तबगारी दाखवण्याची जबाबदारी प्रांतिक पातळीवरच आली आहे. डॉ. चंद्रशेखर यांना जेव्हा लोकांनी विचारले की, खरोखरच तुम्ही फुकट ट्रॅन्झिस्टर देणार काय, तेव्हा ते म्हणाले की, "तसा काही विचार नाही. मी प्रकट विचारचिंतन (Loud thinking) करीत होतो इतकेच !" मध्यवर्ती सरकारातून असे पत्रच आल्याचे डॉ. रफिक झकेरिया यांनी सांगितले. गड आला तर सिंह पडावा हे दुर्दैव दिसते. खच्चीकरणाच्या हातघाईच्या लढाईतील तानाजी डॉ. चंद्र-शेखर हे आता असे कामी आले आहेत.

राष्ट्राध्यक्ष डॉ. झाकिर हुसेन या बाबतीत काही बोलू शकत नाहीत. उपराष्ट्र-पतींकडे जनता आशेने पाहत होती. परंतु गिरीराजांनी नुकतीच आपण त्या बाबतीत पूर्वायुष्यात हिमालयाएवढ्या चुका केल्याची कबुली दिली आहे. उपराष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांनी नुकतेच जाहीर भाषणात सांगितले–

"मी १६ मुलांना जन्म दिलेला असल्याने लोकांना या बाबतीत उपदेश कर-ण्याचा मला अधिकार नाही !" हल्ली लोक कामचुकारपणा करतात (Stint Work) अशीही तक्रार उपराष्ट्रपतींनी अर्नाकुलम म्युनिसिपालिटीच्या सत्काराला उत्तर देताना तेथील आपल्या भाषणात केली. उपराष्ट्रपतींनी स्वत: तरुण वयात 'काम' चुकारपणा केलेला नाही याबद्दल तरी लोकांची आता खात्री झालेली आहे. तात्पर्य, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, ही सर्व मोठी मंडळी या विषयात या ना त्या कारणाने बोलणार नाहीत. मग हे काम रेटायचे कुणी ? काँग्रेसच्या दुय्यम–तिय्यम नेतृत्वाला हे आव्हान आहे ! गिरीवरून गडगडलेला हा प्रश्न आता असा दरीत आला आहे.

**–ग्यानबा**

## पंपाने भरलेला माओचा विचार

गेल्या वर्षी माओने यांगत्से नदीत काही मैल पोहून दाखविले होते म्हणतात, त्या गोष्टीचा वाढदिवस काही दिवसांपूर्वी सबंध चीनमध्ये साजरा करण्यात आला. म्हणजे आपण हिंदुस्थानी लोक भवसागर तरुन जाण्याच्या गोष्टी करीत असताना तिकडे चिनी साम्यवादाच्या आधारावर भवनदी तरून जाता येते असे सिद्ध झाले. अर्थात माओप्रमाणे पोहता येणे 'माओच्या विचारा' शिवाय अशक्य आहे. पंपाने हवा भरावी त्याप्रमाणे माओचा विचार फुस्फुसांत भरून घेतला की बुडण्याची भीती नाही. म्हणजे पानशतचा अनुभव असलेल्या पुणेकरांना म्युन्सीपाल्टीपेक्षा माओच अधिक उपयोगी पडायचा.

# आ स्वा द

## तुझे हासणे

शरदामधली एक शर्वरी
उर्वशीपरी उरात घेऊन
अमृत यावी
फेसाळित अन् ओसंडित
धारोष्ण चांदणे
शतधारांनी चन्द्रस्तनातुन—
तसे हासणे
तुझे मुक्त अन् लोभसवाणे ..
तुझे हासणे अमृतवाणे लोभसवाणे...
मला न माहित...असे चांदणे ?

—वामन काळे



'तुझे हासणे' हा विषय तसा नवीन नाही. पण प्रत्येक प्रेमिकाची अनुभूती नवीन असते. आणि ती व्यक्त करतानादेखील थोडा वेगळा सुगंध येतोच. वामन काळे यांनी परिचित विषयाच्या गोजिरवाण्या मूर्तीवर काही नवा साज चढविला आहे. 'उर्वशीच्या उरातील अमृत' ही कल्पना विशेष सुंदर आहे. चांदण्याला दुधाची उपमा देण्याचा संकेत फार जुना आहे. पण त्या संकेताला जर 'धारोष्ण' हा शब्द जोडला तर काही नवीन सौंदर्य दिसू लागते. शेवटी उपमेयाच्या नादामध्ये उपमाच विसरून जावी हे विशेष बहारदार वाटते. या साऱ्या मोहक कवितेमध्ये एकच शब्द खटकतो आणि तो म्हणजे "चंद्रस्तनातुन." कदाचित् एवढा कलंक असल्यामुळेच या काव्यचंद्राची शोभा वाढली असेल !

गोपीनाथ तळवलकर

# विचार वारे

## □ आधुनिक भारताची जमेची बाजू

सर्वसाधारणपणे परदेशी वर्तमानपत्रांतून आधुनिक भारताचे जे चित्र रंगविले जाते ते म्हणजे सर्वत्र दारिद्र्याचा हाहा:कार उडाला आहे व रस्तोरस्ती लोक उपाशी मरत आहेत असे असते. वस्तुस्थिती खरोखरीच अशी आहे काय याची शहानिशा करण्यासाठी रॉबर्ट मूर आणि पीटर कोल-अडॅम्स या नावाचे दोन ऑस्ट्रेलियन पत्रकार नुकतेच भारत-भेट देऊन गेले. प्रत्यक्ष पाहणी केल्यावर कोल-अडॅम्स म्हणाले :

आम्हांला वाटत होते तशी परिस्थिती मुळीच नाही. रस्तोरस्ती माणसे मरत आहेत असे आम्हांला मुळीच दिसले नाही. कदाचित् भारताला मिळणारी खूप मोठ्या प्रमाणावरील परदेशी मदत, आणि भिक्षापात्राचे सांकेतिक चिन्ह या दोन गोष्टींमुळे हिंदुस्थानाचे चित्रण करताना असा विपर्यास होत असावा. आम्ही तुमच्याकडून रेडिओआयसोटोप विकत घेतो, आणि ही वस्तू कोठल्याही अर्थाने आधुनिक ठरेल. हिंदुस्थानात बेकारी, उपासमार, झोपड्या या गोष्टी आहेत हे खरे, पण त्या कोठल्या देशात नाहीत ? जगातल्या कोठल्याही देशात त्या आहेत, असे म्हणता येईल.

## □ " प्रकाशाचे बेट "

भारत, नेपाळ, अफगाणिस्तान, सिलोन आणि मंगोलिया या प्रदेशांत 'युनिसेफ'च्या कार्याचे संचालक डॉ. चार्ल्स एगर हे नुकतेच अमेरिकेला केंद्रकार्यालयात परतले. त्यांच्या मते " विकास-कार्यात सर्वांत महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे माणसाचा विकास होय. " हिंदुस्थानात बाल-कल्याण व कुटुंब-कल्याणाचे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य होण्यासाठी अजून खूपच कार्य करण्याची आवश्यकता आहे; परंतु प्रारंभ फारच चांगला झाला आहे. खेड्यातील जनतेचे जीवन आरोग्यदृष्ट्या व इतर बाबतींतही सुधारण्याच्या या कार्यात युनिसेफप्रमाणे सरकारनही बराच पुढाकार घेतला आहे; शिवाय खूपशा खाजगी संस्थांनी या क्षेत्रात कौतुकास्पद कार्य केले आहे.

अर्थात् अजून बऱ्याच समस्या बाकी आहेत. समाजकल्याण, स्वास्थ्य, शिक्षण आणि पौष्टिक अन्न या सर्व समस्यांचा एका वेळी सामना होऊ शकेल असा सर्वव्यापी प्रयत्न करून खेड्यांतल्या मातेच्या मताला जाग आणली पाहिजे. कारण

सामाजिक बदल घडवून आणण्याचे खरे साधन तीच आहे. त्याचप्रमाणे अर्धशिक्षितांना मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक शिक्षण मिळेल, अशी व्यवस्था केली पाहिजे. आणि प्रत्येक प्रयत्न हा स्थानिक गरजेवर आणि स्थानिक साधनांवर अवलंबून असला पाहिजे; हे एवढे मोठे कार्य ज्यांच्या हितासाठी हाती घेण्यात आले आहे, त्या जनतेच्या सक्रिय पाठिंब्यानेच प्रत्येक गोष्ट झाली पाहिजे." पंडित नेहरूंच्या कल्पनेतली छोटी छोटी पण जिवंत अशी "प्रकाशाची बेटे" बांधण्याचा हा एकच मार्ग आहे.

## ❑ 'स्ट्रक्चरल इंजिनियरिंग'चे महत्त्व

इमारती बांधण्याचे काम जगभर इतक्या जोरात चालले आहे की स्ट्रक्चरल इंजिनियरांची मागणी पूर्वीपेक्षा खूपच वाढली आहे; याचे कारण कोणतीही इमारत केवळ नवीन असताना चांगली दिसून चालत नाही, तर पुष्कळ काळ चांगली दिसण्यासाठी तिची बांधणी शास्त्रशुद्ध असावी लागते. या विषयावर भारतीय तज्ज्ञांचा एक शिक्षण-वर्ग घेण्यासाठी डॉ. गुरफिकेल नावाचे अमेरिकन तज्ज्ञ नुकतेच हिंदुस्थानात येऊन गेले. तेव्हा ते म्हणाले, बांधकामाची शास्त्रीय तत्त्वे जगभर एकच आहेत. शिक्षणवर्गात भारतीय मोजमापे व भारतीय पद्धती वापरण्यात आल्या. शिक्षणवर्गाचा उद्देश स्थानिक साहित्य व स्थानिक तज्ज्ञ यांचा अधिक चांगला उपयोग कसा करता येईल हे पाहणे हा होता. आणि भारतात कौशल्याची वाण नाही. मात्र तांत्रिक शिक्षणाच्या बाबतीत भारतात अजून बरीच प्रगती व्हायला पाहिजे. "येथे उत्कृष्ट तांत्रिक शिक्षणाच्या संस्था व शिक्षक आहेत, पण व्यावसायिक शिक्षणावर पुरेसा भर देण्याची आवश्यकता आहे. इंजिनियर हवेत. परंतु व्यवहारी दृष्टीचे इंजिनियर हवेत.

## ❑ इंडोनेशियातील सांस्कृतिक पुनरुज्जीवन

सोकार्नोंनी आपल्या कारकीर्दीत इतकी वर्षे पायदळी तुडविलेल्या सांस्कृतिक स्वातंत्र्याचे आता इंडोनेशियात पुनरुज्जीवन होत आहे, आणि तेथल्या लेखक-कलाकार व बुद्धिवादी मंडळींना सरकारी अंकुशाची भीती न बाळगता पुन्हा विचार-प्रदर्शनाचे स्वातंत्र्य मिळेल, अशी आशा एक प्रमुख इंडोनेशियन लेखक वीरात्मो सोकितो यांनी नुकत्याच भारताला दिलेल्या भेटीत प्रकट केली. इंडोनेशियन लेखक-कलाकारांना एखाद्या संस्थेच्या कुंपणात स्वतःला कोंडून घेण्याची इच्छा नाही, किंवा त्यांना ट्रेड युनियनही नको आहे. "आम्हांला व्यक्तिगत स्वातंत्र्य हवे आहे." मात्र सध्याची आर्थिक परिस्थिती सुधारेपर्यंत सर्व सांस्कृतिक चळवळींची गती मंद होणे अपरिहार्य आहे. ○

# रातराणी

कोणत्याही स्पर्धेत बक्षिसे कशी दिली जातात याविषयी काही पेटंट प्रवाद अस्तित्वात असतात. केवळ आपल्या इथेच नव्हे तर जगभर हेच चालते. या प्रवादांनुसार, स्पर्धा लावणाऱ्यांची काही अंदरकी बात असते; परीक्षक वशिलेबाज आणि/किंवा महामूर्ख असतात; स्पर्धेतले विजेते आडमार्गांनी यशस्वी झालेले असतात. आणि शेवटचे महान, सत्य म्हणजे खरी लायक माणसे बक्षीस न मिळालेल्यांतच असतात. कदाचित ती तुम्ही आम्हीच असू! एवढे नक्की की असले प्रवाद पसरवणारे मनोमन खऱ्या लायक माणसात स्वतःची गणना करीत असतात.

आता समजा की, एखाद्या धडपडत्या, जिद्दी, धाडसी, नीतिअनीतीची पत्रास न ठेवणाऱ्या, तल्लख आणि महत्त्वाकांक्षी तरुण माणसाने या प्रवादांवर निष्ठा ठेवून एखाद्या मोठ्या स्पर्धेत यशस्वी व्हायचे ठरवले तर तो काय काय करील? त्याचे अत्यंत रंजक आणि क्वचित विदारक चित्र पॅरॅमाउंट पिक्चर्सच्या 'ऑस्कर' या चित्रपटात पाहायला मिळाले.

## एक चित्रपट, तीन काज

ऑस्कर पारितोषिक म्हणजे हॉलिवुडच्या रुपेरी दुनियेतल्या तीव्र स्पर्धेचे प्रतीक आहे. वर्षातल्या उत्तम चित्रपटाला, दिग्दर्शकाला, नटनटींना, तंत्रज्ञांना ते टोलेजंग सोहळ्यानिशी दिले जाते. हे 'ऑस्कर' प्राप्त होण्यावर यशाच्या अवघड शिडीच्या अगदी वरच्या पायऱ्यांवर चढण्याची संधी अवलंबून असते. 'ऑस्कर'साठी निवडल्या गेलेल्या उमेदवारांत नाव येणे हाही एक मोठा मान समजला जातो.

चित्रपटसृष्टीतीलच अशा या हाणामारीच्या स्पर्धेच्या जोडीस तिच्याविषयीचे चित्तथरारक रहस्यमय खरेखोटे प्रवाद घेऊन रिचर्ड सेल नामक अमेरिकन कादं-

## ऑस्कर



स्टीफन बॉइड, एल्क सोमर

वरीकारांनी ' द ऑस्कर ' नामक एक कादंबरी लिहिली आणि ती चांगली खपली. या निमित्ताने आपल्या अंतरंगाचे एक सनसनाटी आणि खळबळजनक दर्शन आपणच आपल्या प्रेक्षकांना घडवल्यास तेही चांगला धंदा करील ही शक्यता हेरून होलिवुडवाल्या व्यापारी मंडळीने या कादंबरीवर त्याच नावाचा हा रंगीत चित्रपट काढला असावा.

चित्रपटाचा नायक फ्रँकी फेन. आयुष्याच्या ऐन उमेदीत दारिद्र्य, जगाचा कठोर व्यवहार आणि व्यवहारचतुर माणसांची हलकट वर्तणूक यांच्याशी जगण्यासाठी सामना करावा लागल्याने हा अमेरिकन तरुण पोरगा मोठा महत्त्वाकांक्षी आणि भल्याबुऱ्यापलीकडे केवळ यशाचाच विचार करणारा बनला आहे. यशासाठी सर्व काही क्षम्य आहे इतकेच नव्हे तर यश लाभल्यास हे सर्व म्हणजेच कर्तृत्व आहे अशी त्याची पक्की धारणा झाली आहे.

चित्रपटाचा आरंभ होतो तोच ऑस्कर पारितोषिके जाहीर होऊन दिली

विजय तेंडुलकर

जाण्याच्या अतिभव्य सोहळयाने. त्या सोहळयात हा फ्रँकी फेन मोठ्या रूबाबाने शिरतो, वावरतो आणि आपले नाव विजेता म्हणून पुकारले जाण्याची वाट पाहत तो त्याच्या आसनावर उत्कंठेने चुळबुळत बसून आहे; पलीकडे काही अंतरावर बसला आहे त्याचा या आधीच्या धडपडीतला एकनिष्ठ साथी हायमी केली. हायमीच्या नजरेत कसली तरी व्यथा जळते आहे. आपल्या उत्कंठित दोस्ताकडे लांबून पाहत तो आपल्याला—म्हणजे प्रेक्षकांना—या फ्रँकी फेनविषयी मनोमन सांगू लागतो...

आणि फ्रँकीचा भूतकाळ आपल्यासमोर या निमित्ताने उलगडू लागतो. संधी आल्यास दोन देणे आणि प्रसंगी दोन घेऊन पुढे जाणे हाच जीवनाचा कठोर कायदा फ्रँकीच्या अनुभवाला आल्याचे आपण पाहतो. म्हणूनच आयुष्य त्याला एखाद्या जंगलासारखे भासते. त्यात जो तो स्वसंरक्षणाचाच विचार करीत आणि पोटाचा खड्डा दोन वेळा भरण्यासाठी कुणाचातरी घास करीत वरवर सुसंस्कृत चेहऱ्याने फिरतो आहे असेच त्याच्या मनाने घेतले आहे. अशा या जंगलात हाती लागेल त्या साधनाने जास्तीत जास्त प्रबळ व्हावे आणि जगावे हे त्याचे आयुष्याचे तत्त्वज्ञान बनले आहे. जगात, जीवनात निरपेक्ष, सात्त्विक, निर्मळ आणि खरे काही त्याला दिसतच नाही. हॉटेला-हॉटेलांतून पोटासाठी उत्तान नृत्ये करणाऱ्या एका पोरीचा मदतनीस म्हणून तो जगत असताना एका फॅशन मॉडेल पोरीशी जमवून यशाच्या दिशेने एक पायरी चढतो. तिच्याबरोबर तिच्याच ओळखीने एका नाटकाच्या तालमीला गेला असताना एका मध्यम वयस्क नाट्य-शिक्षिकेवर भाव मारून होलिवुडची दिशा धरतो. या नाट्य-शिक्षिकेकरवी एका निर्मात्यापर्यंत पोचतो आणि चित्रपटात काम मिळवतो. त्यानंतर निर्मात्याच्या प्रसिद्धी खात्याच्या योजनेने एका उदयोन्मुख तारकेशी त्याचे सूत जमले असता सार्वजनिक जागी दोघांत एक मोठे भांडण भडकते आणि फ्रँकी फेन यातूनदेखील प्रसिद्धी पदरात पाडून घेतो. या त्याच्या तंत्राने तो उपयोगी येणाऱ्या सर्वांना उपयोग संपताच झटक्याने दूर लोटत उत्कर्षाच्या पायऱ्या कशा वेगाने चढून जातो. पाहता पाहता वैभव त्याच्यापुढे हात जोडून उभे राहते. फ्रँकी पूर्वीच्या मैत्रिणीशी—फॅशन मॉडेल पोरीशी—लग्न करतो. मध्यंतरीच्या काळात त्याची त्याही आधीची मैत्रीण—ती हॉटेलातून उत्तान नृत्ये करून जगणारी पोर—त्याच्या दोस्ताशी, हायमी केलीशी, लग्न करून स्वास्थ्य आणि सुखाची चव पुरती मिळण्याआतच मरण पावलेली असते. फ्रँकीच्या दृष्टीने या गोष्टींना काही किंमत नसते. कुणी मेले म्हणून तो रडत नाही आणि कुणाशी लग्न केले म्हणून तो तिच्यासाठी जीव पाखडीत नाही. साऱ्या जगाचे संचलन मुळी त्याच्यासाठीच घडत असते असे तो आता मानतो. त्याच्या जगाचा केंद्रबिंदू तो स्वतःच असतो. स्वतःपलीकडे कुणाचे मन, भावना, अपेक्षा, अस्तित्व-देखील त्यांच्या खिजगणतीत राहीनासे होते.

आणि ऑस्कर परितोषिकांचा उमेदवार म्हणून तो निवडला जातो. चित्रसृष्टीतली ही यशाची शेवटची पायरी त्याच्या महत्त्वाकांक्षेच्या टप्प्यात आता येते. एके काळचा दरिद्री, मुकेकंगाल फ्रँकी जागतिक ख्याती आणि करोडो डॉलर्सच्या मिळकतीचे स्वप्न असे अगदी हात लांबवावा इतके जवळ पाहतो. गुणांचा निखळ गौरव या पारितोषिकांद्वारे केला जातो यावर विलकुल विश्वास नसल्याने फ्रँकी परीक्षकांची सहानुभूती मिळविण्यासाठी एक हिकमती डाव खेळतो. आपल्या भूतकाळाबद्दल आपल्यावर चिखलफेक करणाऱ्या मोठमोठ्या गलिच्छ बातम्या प्रसिद्ध होण्याची व्यवस्था तो स्वतःच पैसे चारून करतो. ही आपली बदनामी पारितोषिकासाठी स्पर्धक म्हणून निवड झालेले आपले प्रतिस्पर्धी करताहेत असे परीक्षकांना वाटेल आणि त्यांचा कल साहजिकच आपल्याकडे झुकेल हा या मागचा त्याचा हुशार हिशेब. त्याच्या बदनामीचा मजकूर मोठमोठ्या मथळ्यांनी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होतो. त्यात त्याच्या आयुष्यात आलेल्या व्यक्तींविषयीही बरेवाईट, खोटेनाटे असतेच. आपण मतलबी प्रतिस्पर्ध्यांच्या मत्सराचे बळी झालो अशा चेहऱ्याने सर्वांची सहानुभूती मिळवीत फ्रँकी फेन चित्रसृष्टीत फिरतो. आणि त्याच्या या अमानुष किळसवाण्या डावपेचांचा वीट आणि संताप येऊन त्याची बायको त्याचा निरोप घेते. फ्रँकीच्या लेखी अशा कुणाच्या जाण्यायेण्याची खिजगणती आता उरलेली नसते. त्याचा एकच ध्यास : यशाची शेवटची, सर्वांत उंच पायरी : ऑस्कर !

## तो क्षण...

बायको त्याला टाकते, बदनामीच्या त्याच्या कारस्थानातला मदतनीस त्याच्याविरुद्ध फिरून त्याच्याकडून खरे ते प्रसिद्ध करण्याच्या धमकीवर वारेमाप पैसे उकळण्याला सिद्ध होतो. फ्रँकीकडे एवढे पैसे नसतात. फ्रँकी—ज्यांनी त्याला याआधी आधार दिला—त्यांच्यात्यांच्याकडे जातो, आपली हातखंडा नाटके करतो, पण सर्वांनी त्याला सोडले आहे असे त्याला आढळते. शेवटी तर त्याचा एकुलता एक जिगरजान दोस्त हायमी केलीदेखील बेफाम होऊन त्याला लाथांनी बुकलून काढतो पण यातले काही शरीरमनाला लागण्यापलीकडे महत्त्वाकांक्षेच्या दुर्धर रोगाने फ्रँकी किडला आहे, बधीर झाला आहे. त्याला दिसत असते फक्त ऑस्कर !

हा चित्रपट हे सारे कथानक दाखवून पुन्हा येऊन दाखल होतो तो मूळपदावर; ऑस्कर—पारितोषिक वितरणाच्या बादशाही सोहळ्यात. समारंभातल्या अत्यंत महत्त्वाच्या भागाला सुरुवात झाली आहे. ऑस्करच्या मूर्ती रंगमंचावर दिसत आहेत. बॉब होप हा ज्येष्ठ विनोदी चित्रपट-नट येऊन त्याच्या चुरचुरीत विनोदप्रचुर शैलीत समारंभाचा प्रस्ताव करतो. नंतर एकूण उमेदवारांची नावे टाळ्यांच्या गजरात उच्चारण्यात येतात. आणि मग एकेका यशस्वी उमेदवाराचे नाव जाहीर होऊ लागते. उत्कृष्ट नटाचे परितोषिक जाहीर होण्याचा महत्त्वपूर्ण क्षण येतो. नाव उच्चारले जाते, फ्रँक—

उत्कंठेने, मानसिक ताणाने अक्षरशः बधीर झालेला फ्रँकी फेन जागचा ताड्दिशी उठतो. मनोमन पुढे होऊ लागतो—प्रचंड टाळ्या वाजत राहतात. फ्रँकी फेन व्यासपीठावर जातो, ऑस्कर घेतो— सगळे मनोमन. सगळेच मनोमन.

कारण नाव जाहीर होते फ्रँक सिनाट्राचे. तो ज्येष्ठ गुणी नट हास्यमुखाने व्यासपीठावर जाऊन ऑस्कर स्वीकारतो. अप्रतिहतपणे टाळ्या वाजत राहतात. यशस्वी नटाला उत्थापन देण्यासाठी सर्वांच्या टाळ्या थांबतात. पण फ्रँकी फेनचे हात थांबत नाहीत. दारुण अपेक्षाभंगाच्या धक्क्याने खुर्चीतल्या खुर्चीत त्याची सारी कुडी आक्रसते आणि हात हालतच राहतात. नुसतेच हलत राहतात. फ्रँकी फेन काळाठिक्कर पडतो.

चित्रपट इथेच समाप्त होतो.

तसे म्हटले तर ही साधी बोधकथा आहे. 'गर्वाचे घर खाली' किंवा 'अती महत्त्वाकांक्षेने माणसाचा अंती घात होतो' असे एखादे सुतासारखे साधे तात्पर्य हिच्यातून निघू शकते. बोधकथेइतकीच या मुळात प्रभावी कथेची रचना या चित्रपटात रेखीव आणि फारशी गुंतागुंत नसलेली अशी केली आहे.

## साचा तोच, पण...

या साधेसोपेपणाच्या जोडीला हॉलिवुडच्या चित्रसृष्टीचे अफाट वैभव आणि या सृष्टीतले ज्येष्ठ—कनिष्ठ नामवंत नट—नटी योजण्यात आले आहेत. याशिवाय या नटनटींच्या जोडीस उत्तमोत्तम नवनवे पोषाख, केशभूषा, अशा 'फॅशन—शो'चीही व्यवस्था आहे. स्त्रीचे देहसौंदर्य तर हॉलिवुड खिरापतीसारखे प्रत्येक चित्रपटात मूठ मूठ भरून नुसते वाटत असते. पाहाल तेवढे थोडे !

म्हणजे कोणी बोधासाठी पाहावे, कोणी फॅशन्ससाठी शोधावे, कोणी नुसतेच नेत्रसुख घ्यावे असा हा हरकामी चित्रपट झाला आहे. मधून मधून बरे संवाद, वेगाने बोलले जाणारे इंग्रजी ज्यांना कळेल त्यांच्यासाठी, आहेत. स्टीफन बॉइडने फ्रँकी फेनची भूमिका पुष्कळच वेधक वठविली आहे. विशेषतः भोवतालची माणसे प्रेम, स्नेह, उपकारादी भावनांच्या जाळ्यात त्याला अडकवू पाहतात त्या क्षणी सावध होऊन हा सुळसुळीत माणूस ज्या शिताफीने या पाशातून निसटतो, ज्या तडफेने बाहेर फुटतो ती शिताफी आणि तडफ बॉइडचे शेलाटे उंच व्यक्तिमत्त्व चांगली पेलते. त्याच्या हिरव्या डोळ्यांतले काठिण्यही या भूमिकेला मानवले आहे. नटाची भूमिका असूनही उत्तम नट म्हणून कुठेही त्याचे एखाद्या चित्रपटातले पडद्यावरचे दर्शन आपल्याला या चित्रपटात घडत नाही. बुद्ध्याच ते टाळलेले आहे. उलट फ्रँकी फेनचा बहारदार अभिनय आपण पाहतो. त्याच्याच प्रत्यक्ष आयुष्यातल्या खऱ्याखुऱ्या प्रसंगात — जेव्हा तो आकस्मिक पलटचा खाऊन खोटे आपण आणि खरे आपण यांतला विस्मयजनक फरक क्षणार्धात समोरच्या कुणाला तरी दाखवतो, तेव्हा, हायमी केली या फ्रँकीच्या दोस्ताच्या गद्य भूमिकेत गायक टोनी बेनेट चप-

खल वसला आहे. बाकी मंडळी या चित्रपटात विशेष महत्त्वाची नाहीत आणि आपापल्या भूमिकांत ती ठीक आहेत. दिग्दर्शक आहेत रसेल राउज. तंत्रावर त्यांची पक्कड पक्की आहे. एक चित्रपट, तीन काज (म्हणजे कथानक, फॅशन-शो आणि स्त्रीसौंदर्याची विविध प्रदर्शने) ही कसरत त्यांनी होलिवुडच्या यशस्वी व्यापारी दिग्दर्शकाला साजेशी हाताळली आहे.

या पूर्वी नोबेल परितोषिकासाठी होणाऱ्या भानगडींवर 'द प्राइझ' नावाचा एक सनसनाटी चित्रपट होलिवुडने काढला होता. हा अॅकेडेमी अॅवॉर्ड्सवरचा जवळ जवळ त्याच प्रकारचा चित्रपट. साचे असेच असतात. त्यातून निघणाऱ्या मूर्तींना मुलायम घाट असतो. पण स्वतःचे वेगळे वैशिष्ट्य नसते. ते अपेक्षितदेखील नसते.

आपल्याला काय, दोन घटका चांगले मनरंजन झाल्याशी कारण. तिकिटाचे पैसे वसूल ! ◻

# एक संध्याकाळ, एक उद्घाटन

एक जुनी नाटचसंस्था मुंबईत गेल्या १५ सप्टेंबरला संध्याकाळी समारंभपूर्वक बंद झाली आणि नवी स्थापन झाली. 'दि किंग ईज डेड लाँग लिव्ह द किंग' या थाटातच हे वाक्य वाचावयाचे कारण, ज्यांनी जुनी बंद केली त्यांनीच नवी स्थापन केली. समारंभ नव्या नाटचसंस्थेच्या स्थापनेचा होता, पण त्या जुन्या संस्थेची सांगता गृहीत होती. जुन्या नाटचसंस्थेचे नाव होते 'पूर्णिमा'. ही नाटचसंस्था त्या आधी अन्य एका 'इंडियन नॅशनल थिएटर' नामक बहुभाषिक नाटचसंस्थेने रंगभूमीवर आणलेले दोन फार्स 'झोपी गेलेला जागा झाला' आणि 'दिनूच्या सासूबाई राधाबाई' मधूनमधून गावोगाव करीत असे. मूळ प्रयोगातले काही, काही नवे आणि वेळी एखाद-दुसरा आयत्या वेळी प्रेक्षागृहात मिळेल तो, अशा कलावंतांनिशी हे प्रयोग होत. या दोन जुन्याच लोकप्रिय फार्सेसच्या अशा जमवाजमवीच्या प्रयोगांपलीकडे या संस्थेकडून विशेष काही घडत नव्हते आणि संस्थेच्या प्रमुख नटनटींकडून बरेच काही घडत होते पण ते या संस्थेबाहेर आणि प्रामुख्याने सर्रास धंदेवाईक नाटचसंस्थांतून धंदेवाईक पद्धतीचे. अशी ही 'पूर्णिमा' नामक संस्था या समारंभाने 'युनायटेड थिएटर्स' नामक नव्या संस्थेत रूपांतरित झाली. रूपांतरित म्हणण्याचे कारण 'पूर्णिमा'चे आधारस्तंभ आत्माराम भेंडे हेच या नव्या संस्थेचेही आधारस्तंभ आहेत.



छाया—राजदत्त

वरळीच्या 'नॅशनल स्पोर्ट्स क्लब'च्या एका दालनात झालेल्या या एखाद्या लग्नसमारंभाचे स्मरण देणाऱ्या समारंभाचे अध्यक्ष आणि नव्या संस्थेचे उद्घाटक होते वयोवृद्ध नट केशवराव दाते. नाट्य-साहित्य-चित्रसृष्टीतली बरीच मंडळी समारंभाला उपस्थित होती.

केशवराव दाते यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर 'उद्घाटने हल्ली पुष्कळच होतात'. पण हे विशिष्ट उद्घाटन स्मरणीय ठरले स्वतः केशवरावांच्या भाषणाने. तसे केशवराव इच्छेने, अनिच्छेने पुष्कळदा भाषणे करतात. तळमळ हा त्यांच्या जवळजवळ प्रत्येक भाषणाचा स्थायीभाव असतोच. तरीही त्या दिवशी ते बोलले तसे आणि तितके व्यासपीठावरून बोलताना त्यांना या पूर्वी मी ऐकलेले नाही.

भेंडे पतिपत्नींविषयीची आपली कित्येक वर्षांची आदरभावना आरंभी व्यक्त करून केशवराव म्हणाले की, 'ही नवी नाट्यसंस्था स्थापन का करण्यात येत आहे हे मला संस्थेपैकी कुणी सांगितलेले नाही आणि मीही ते विचारले नाही. पण माझा मीच यावर विचार करून असे ठरवले की माझ्यासारख्यांच्या या मंडळींविषयीच्या ज्या जुन्या, अमूर्त अपेक्षा आहेत त्या पुऱ्या करण्याचा प्रयत्न या नव्या संस्थेमार्फत करण्यात येणार असावा.' 'पूर्णिमा'कालीन आत्माराम भेंडे यांच्या नाट्यकर्तृत्वाला केशवरावांनी 'मर्सिनरी' किंवा भाडोत्री सैनिकांची उपमा दिली. कुणाविरुद्ध आणि कुणासाठी लढावयाचे हा सवाल भाडोत्री सैनिकांपुढे कधीही नसतो. जो त्याला पगार देईल त्याच्यासाठी तो कुणाही विरुद्ध लढण्याला उभा राहतो. पगार महत्त्वाचा. निष्ठा जो पगार देईल त्याच्याशी, पगार मिळत राहील तोवरच. तसे भेंडे नाइट मिळेल तिथ जाऊन रंग लावून उभे राहिले. या उःत्स्फूर्त कठोर उपमेबद्दल भेंड्यांची केशवरावांनी लागलीच क्षमाही मागितली परंतु वस्तुतः मराठी रंगभूमीवरच्या

बहुसंख्य नटांचेच वर्णन केशवराव भेदक उपमेने करीत होते. मराठी रंगभूमीला आज जाचणाऱ्या या 'नायटचा 'ला नेमका हात घालून केशवरावांनी निष्ठेची मागणी हक्काने केली ती 'आर्थिकदृष्टया जे सुस्थिर झाले आहेत' अशाच, भेंडे यांच्यासारख्या कलावंतांकडून. ते म्हणाले, की यांच्यासारख्यांनी तरी पोटार्थी वृत्तीबाहेर पडून, काही आच सोसून, खिशाला प्रसंगी कात्री लागू देऊन रंगभूमीवर काही तरी विशेष केले पाहिजे.

## सर्वकालीन सत्य

हे काय, ते सांगताना गेल्या काही काळातील—काही थोडे अपवाद वगळता—सर्व नाटकांवर त्यांनी एक आरोप ठेवला. ते म्हणाले की, ही नाटके समाजनिरपेक्ष आणि आणि हेतूहीन आहेत. यात कसलीही आच नाही. काही सांगण्यासारखे नाही. ही का लिहिली हेच कळत नाही. नाटकांचे फॉर्म्युले बनले आहेत आणि आर्थिक यश हा त्यांच्या लेखन-प्रयोगामागील एकमेव परवल झाला आहे. परंतु आर्थिकदृष्टया यशस्वी नाटकाचे 'प्रिस्क्रिप्शन' आपल्या काळापासून आजतागायत कोणाही धंदेवाल्याला गवसलेले आणि साधलेले नाही आणि तसा दावा कोणी सांगूही नये असे त्यांनी बजावले. नाटक आर्थिक दृष्टया यशस्वी ठरल्यानंतरच त्याच्या आर्थिक यशाची कारणे शोधली जातात. ते यशस्वी होण्यापूर्वी त्याच्या यशाविषयी छातीवर हात मारून कोणीही हमी देऊ शकत नाही, शकलेले नाही, या कायम वस्तुस्थितीचा उल्लेख करून त्यांनी ध्वनित केले की, आर्थिक यश हे नाटयकृतीचे एकमेव पूर्वनियोजित उद्दिष्ट असूच शकत नाही. म्हणून त्याहून अधिक काही अशा उपक्रमांमागे असावयास हवे.

ते काय केले ते त्यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, समाजाविषयीची निष्ठा नाटयलेखनामागे, नाटयप्रयोगामागे असली पाहिजे. काहीतरी महत्त्वाचे, चांगले, मोठे समाजाला देण्याची तळमळ नाटक करणाराला हवी.

असे देताना आर्थिक घस थोडीफार तरी सोसावी लागेल. कारण चांगल्या गोष्टीची किंमत द्यावीच लागते असे म्हणून त्यांनी लागलीच श्रोत्यांना आपल्या उमेदीच्या काळात नेले. त्यांनी सांगितले, आमच्या काळीही ही किंमत सर्वांनी दिली. तेव्हाही ती द्यावीच लागली. आजचा काळ त्या दृष्टीने फार विपरीत आला आहे, असे समजण्याचे कारण नाही, चांगल्या गोष्टी महागातच पडतात हे सर्वकालीन सत्य आहे. तरीही त्या झाल्या पाहिजेत, कुणी तरी त्या केल्या पाहिजेत. भेंडे आणि त्यांच्या या नव्या संस्थेकडून त्या व्हाव्यात. एखादी दिनूची सासूबाई प्रेक्षकांना देताना त्यांनी हेही पाहावे की समाजात याहून मोठ्या, महत्त्वाच्या आणि चांगल्या अनेक सासूबाई आहेत आणि त्यांचेही प्रभावी चित्र रंगभूमीवर आणले पाहिजे. समाजाला काही खरोखर हिताचे आणि चांगले देण्याची धडपड त्यांनी केली तर आर्थिक यश त्यांना किती मिळेल आणि मिळेल वा न मिळेल हे मी सांगू शकत नाही. ते मिळणारही

नाही. पण मानसिक समाधान मात्र निश्चित मिळेल. असे कार्य यानंतर या मंडळीच्या हातून व्हावे म्हणून मी मनोभावे नटेश्वराची प्रार्थना केली आहे.

केशवराव हे सगळे बोलत असताना शब्दांपलीकडे आणखी पुष्कळ काही त्यांचा चेहरा आणि वृद्ध कुडीतले अवसान बोलत होते. जे झाले त्याविषयीचा वाजवी अभिमान, जे होत आहे त्याविषयीचे असमाधान आणि उद्‌वेग आणि जे व्हावेसे वाटते त्याविषयीची दुर्दम्य तळमळ या तपस्वी नटाच्या अवघ्या अंगातून शब्दा-शब्दासारखी उमटत होती. एकीकडे बोथट, लागट असे काही दूरान्वयानेही तोंडून, लेखणीवाटे जाऊ नये म्हणून मनस्वी जपणारे हे सज्जन गृहस्थ नको नको म्हणत मनातली सारी मळमळ एका आवेगाने ओकत होते. नाट्यविषयक प्रश्नावरदेखील सार्वजनिक जागी भिडस्तपणे ' माझा तसा अधिकार नाही ', ' आम्ही जुने झालो ' म्हणत शक्य तेवढे मौन पाळू बघणारे व्यवहारी केशवराव दाते या भाषणात देशातल्या एकूण विद्यमान परिस्थितीपर्यंत अखेर बोलत पोचले. जे इतरत्र तेच नाट्यसृष्टीत चालले आहे, सारे काही दिशाहीन वाटते, अशी एक व्यापक संगतीही आपल्या नाट्यविषयक गाऱ्हाण्याला त्यांनी जोडली. स्थळ काळाचे आणि स्वत:चे-देखील भान विसरूनच मुळी केशवराव त्या संध्याकाळी बोलले. ते जे बोलले त्याहून त्यांचा उफाळून आलेला आवेश अधिक बोलका होता. लोभस आणि चकित करणारा होता. ते मुळी भाषण नव्हतेच, तो एक उद्रेक होता.

केशवराव दाते यांच्या या अशा भाषणानंतर उत्तरादाखल आणि समारोपा-दाखल भाषण केले ते नव्या संस्थेचे अध्वर्यू आत्माराम भेंडे यांनी. त्यांचा शब्द केशवरावांच्या बरोबर उलट म्हणजे कमालीचा सौम्य, संथ, थंड होता. स्वर नित्या-प्रमाणे लाघवी होता. मुद्रेवर त्यांचे पेटंट मुलायम स्मित होते. ते म्हणाले की, गुरु-वर्य दाते यांच्या आमच्याविषयीच्या अपेक्षा पुऱ्या करण्याचे जास्तीत जास्त प्रयत्न आम्ही करूच.

माझ्या शेजारचे एक गृहस्थ न राहवून मला म्हणाले, बघा ! संस्था काढणारे किती स्वस्थ आहेत आणि कामाची आच जाणवून कोण तडफडतो आहे !

त्या दिवशी तरी त्या साऱ्या समारंभात सर्वांत तरुण, जिवंत, अशान्त आणि ज्वलंत वाटले ना, ते पांढरा शुभ्र केशकलाप मस्तकी वागवणारे. काठीच्या आधा-राने चालणारे केशवराव त्र्यंबकराव दाते. तुलनेने बाकी सारे आम्ही विझलेलो होतो.





# शहामृग

पां. वि. केळकर

पुनः टेलिफोनची घंटा घणघणली; पण नरसिंहरावांनी मान पण वर केली नाही. घंटा वाजली तरी टेलिफोन उचलावासाच वाटत नव्हता. टेबलावर विकल मनाने त्यांनी हातांच्या घडीत तोंड दडवले होते.

घंटा वाजतच राहिल्याने, त्यांची पत्नी मात्र बंगल्याच्या आतील

खोलीतून धावत आली. नरसिंहरावांना तेथेच पाहून तिला जास्तच आश्चर्य वाटले. " अहो ! टेलिफोन आहे कुणाचा तरी ! सकाळीच झोप पुन: लागली ?" तिने रिसीव्हर उचलून त्यांच्या हातात दिला. " फोन घेता ना ?"

" नको " मानसुद्धा वर न करता नरसिंहराव म्हणाले; " मला कुणाशीच बोलायचं नाही. "

" घेता ना फोन ?" तिचा प्रेमळ हात त्यांच्या पाठीवरून फिरला.

" नको ! नको ! फोनवर तेच विचारणार ना– ' भानगड 'मध्ये छापून येतंय ते सत्य आहे का......?"

ती काहीच बोलली नाही. स्वत: रिसीव्हर घेऊन तिने फोन करणाराला विदा केले, नि त्यांच्याजवळ जाऊन बसली.

बराच वेळ असाच नि:शब्दतेत गेला. मग तोच खिन्न मुद्रेने नि मरगळलेल्या आवाजांत बोलू लागला, " सगळी माहिती काढली मी––कुणी सल्ला दिला हे छापायचा ?"

तिने प्रश्नार्थक मुद्रा केली.

" आपल्या गावचे मासिके नि वृत्तपत्रांचे एजंट, रघूशेठ, आहेत ना ?–त्यांनीच. सध्याच्या काळात, नवीन मासिक काढलं तर चालणार कसं, याची संपादकांना चिंता वाटत होती. रघूशेठनेच एजन्सी घ्यावी असा संपादकांचा आग्रह होता. मग रघूशेठनेच सुचवलं, ' मासिक खपायला हवं असेल तर कुणातरी प्रसिद्ध माणसाचं लफडं शोधा––लग्न, प्रेमभंग, असं काही मिळालं तर फारच बहार ! मग तिखट–मीठ लावून बातमी कशी चटकदार नि सनसनाटी करून रंगवायची ते आपल्याकडे लागलं !"

" संपादकांनी तो आदेश बरोबर पाळला. मी माझ्या मित्रांना, अमेरिकेतून काही पत्रे लिहिली होती, ती म्हणे या ' भानगड 'च्या संपादकाच्या हाती पडली आहेत. त्यांत कृष्णेच्या नावाचा उल्लेख आहे; मग संपादकांनी राईचा पर्वत करून असं घृणास्पद चित्र रंगवलंय......" त्यांचा कंठ दाटला.

तिला या 'कृष्णा' प्रकरणाची माहिती होतीच. नरसिंहांनी स्वत:च तिला सांगितली होती. तिच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले, " आणि प्रसिद्धी करण्याचा मोका तर असा साधलाय की, महिन्यावर तुमच्या सत्कार–समारंभाची तारीख आलीय. "

" त्याचं महत्त्व मला वाटत नाही एवढं; कृष्णेच्या बाबतीत माझ्या हातून अन्याय घडलाय, खचित घडलाय; पण चुकीचे परिमार्जन करण्यासाठी, अंशत: का होईना, जो हा सामाजिक संस्थांचा पसारा वाढवला, त्यांच्यावर माझ्या कलंकित आयुष्याची छाया पडून त्या संस्था तर बंद नाही ना पडणार, या काळजीने माझे मन पोखरते आहे. "

नरसिंहांनी आर्ततेने तोंड हातात लपवले व टेबलावर विषण्णपणे पडून राहिले.

त्यांच्या डोळ्यांपुढे चित्रपटाप्रमाणे एक दृश्य, मनाच्या खपल्या ओरबाडत नि हृदय रक्तबंबाळ करत पुढे पुढे सरकू लागले......

......त्यांच्या डोळ्यांपुढे कृष्णा आली......एक भावडी, लाघवी सरळ मनाची तरुणी...एका बड्या पगारदाराची एकुलती एक मुलगी......तो होता वारावर जेवणारा एक गरीब पण बुद्धिमान मुलगा; शिष्यवृत्त्यांवर कशीबशी जीवननौका पुढे ढकलणारा, पण भारी महत्त्वाकांक्षी; अमेरिकेत शिक्षण घेऊन तेथेही आपल्या बुद्धिप्रभावाचे तेज पाडण्याची उमेद धरणारा...पण...पण...पैशाच्या अभावी त्याची आकांक्षा आणि परिस्थिती यांत एवढी खोल दरी होती !!

आणि ती दरी ओलांडण्यासाठीच त्यांनी कळत नकळत त्या भाबड्या जीवाची फसवणूक चालवली होती. आपल्या अबोल स्वभावाला अनुसरून त्याने जसे कधी उत्तेजन दिले नाही तसा स्पष्ट नकारही दिला नाही......त्यांच्या हुशारीने तर खरंच, पण तिच्या वडिलांच्या वशिल्याने पण नरसिंहांना एका अमेरिकन कोलॅबो-रेशन असलेल्या कंपनीची शिष्यवृत्ती मिळाली होती.

संयुक्त संस्थानांत, त्यांच्या हुशारीला भरपूर वाव मिळाला; आपल्या कुशाग्र बुद्धीच्या जोरावर कॉलेजच्या विश्वात नि कंपनीच्या संशोधनकार्यात त्यांचे तेज पसरू लागले. आपल्या Careerist जीवनाच्या ते पायऱ्या भराभर ओलांडू लागले. ज्या ध्येयासाठी एवढे कष्ट व मनस्ताप सोसले ते दृष्टिपथात दिसू लागले. पण...

......पण मध्येच कृष्णेची आठवण ओरबाडून जायची नि ते एकदम खिन्न होऊन जात. एकीकडे हिंदुस्थानात काही दिवसतरी जाण्याची तीव्र उत्कंठा वाटा-यची; "पण नको ! हिंदुस्थानात गेलं की कृष्णेशी विवाह टाळता येणार नाही." त्यांच्या मनात तिच्याविषयी कसलीच भावना नव्हती. त्यांनी तिला मुग्ध्यात ठेवले– ध्येयप्राप्तीचे साधन. एखाद्या इमारतीसाठी 'जिवंत बळी' देतात तशीच कृष्णा त्यांच्या ध्येयमंदिराची 'बळी' होती.

नरसिंहांचे शिक्षण संपूनही २–३ वर्षे होऊन गेली. ते परतही येईनात वा पत्रातून उत्तर धड देईनात. कृष्णेच्या वडिलांनी ओळखलं–पतंग हातातून निसटला आहे; आता त्याची भरारी स्वैर गगनात ! पण भाबड्या कृष्णेला पटवायचं कसं ? ती दुसऱ्यावरोबर लग्नाला तयार कशी होणार ? वडिलांनी कशीबशी तिला तयार केली. रूक्ष यांत्रिकपणे ती लग्न समारंभातून संस्कार करून घेत होती, स्वतःचं मन दुहेरी मारत होती. कशाच्या नि कुणाच्या जिवावर लग्न नाकारायचं ?

नरसिंहरावांना ही लग्नाची वार्ता कळली. वर्षभरातच त्यांनी हिंदुस्थानात आपली बदली करून घेतली. उजळ माथ्याने ते कृष्णेच्या वडिलांना जाऊन भेटले. त्यांनी लोकांचीच काय स्वतःच्या मनाची अशी फसवणूक चालवली, की कृष्णाच त्यांच्यासाठी लग्नाची थांबली नाही. पण लोक फसले तरी त्यांचे स्वतःचे मन कधीच बधले नाही. ते वरच्यावर त्यांच्या हृदयाला ओरखाडे काढी; हे शल्य

मोठ्या उदासपणे वर्षानुवर्षे नरसिंह वागवत आले होते. हे शल्य असे डिवचू लागले की, सार्वजनिक कार्यांत अधिकाधिक तन्मयतेने व पश्चात्तापदग्धतेच्या भावनेने जीव तोडून मेहनत करीत. या त्यांच्या जोपासलेल्या संस्थांवर आता काळी छाया पसरणार होती.

ही ‘ कटु-कथा ’ नरसिंहांच्या पत्नीला ठाऊक होती. पण ‘ भानगड ’च्या अंकातून ही कुलंगडी प्रसिद्ध होऊ लागल्याने त्यांचे हितशत्रू रसभरित वर्णन करून त्यांची विटंबना करणार होते, त्यांच्या समाजसेवेचा चोथा करणार होते. जुन्या चुकीची करुण मजबुरी त्यांच्या चेहऱ्यावर होती.

“ फार फार कठोर शिक्षा आहे, नाही ?” ती त्यांचे सांत्वन करू पाहत होती.

“ कठोर ! कठोर ! आरोपीला शिक्षा नेहमीच कठोर वाटते ” ते एकदम बोलायचे थांबले, आणि काही क्षणातच कडाडले, “ मी रघूशेटशी करार केलाय–त्याच्या-जेवढ्या प्रती येतील त्या सव्वापट किंमतीत विकत घेणार आहे. ” व्याकुळ मनाने त्यांनी हाताच्या घडीत पुनः तोंड लपवले–जणू काही वाळवंटातील वादळात तोंड लपविणारे ‘ शहामृगच !’

नरसिंहरावांशी करार करून खूश झालेले रघूशेठ अगदी आनंदात ‘ भानगड ’च्या कचेरीत घुसले. घाईने खुर्ची ओढून घेत ते म्हणाले, “ संपादक ! अहो संपादक ! पहिला स्पेशल चहा सांगा. ”

“ चहा मागवतो हो; पण एवढं झालं तरी काय ? पुढच्या आठवड्याला किती अंक छापणार ?”

“ छापू दोन हजार ” संपादक घाबरत चाचरले.

“ पाच हजार अंकतर मीच ‘ अंडरराइट ’ करतो आहे. ”

“ काय सांगता ?” संपादक खुर्चीवरून उडालेच !

“ मात्र नेहमीप्रमाणे ३५ टक्के कमिशनमध्ये नाही मागणार. आँ......हां !...” रघूशेठ,

“ अहो, अंक खपल्यावर कमिशनचीपण गॅरंटी; घ्या टाळी रघूशेठ. ” संपादक खदखदून हसले.

संपादकांना टाळी देऊन रघूशेठ अगदी मनापासून हसत होते; पण मनात हिशेब करत होते–दोन्हीकडचे मिळून किती ‘ कमिशन ’ मिळणार ?



# लोकप्रिय ठरलेला कथासंग्रह

पुस्तके

## चिद्घोष

ललित मासिकाच्या स्पर्धेत श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या 'चिद्घोष' या कथासंग्रहाला पहिले पारितोषिक वाचकांच्या बहुमताने मिळाल्याचे वाचून मला आश्चर्य वाटले. याचा अर्थ असा नव्हे की, 'चिद्घोष' हा कथासंग्रह मला आवडला नाही किंवा कमी दर्जाचा वाटला. पण तरीही पहिले पारितोषिक मिळण्याच्या दृष्टीने त्यात खूप काहीतरी कमी आहे असे मला वाटले आणि ही कमतरता मी शोधू लागलो.

असा शोध घेण्याच्या निमित्ताने 'चिद्घोष' पुन्हा वाचताना पूर्वी लक्षात न आलेली त्यातील अनेक सौंदर्यस्थळे नव्याने जाणवली; पण तरीही वरील रुखरुख मनात राहिलीच. ज्ञानेश्वर नाडकर्णींच्या 'चिद्घोष'मधील लेखनाला, किंबहुना त्यांच्या एकंदर लेखनपद्धतीलाच, आषाढात पडणाऱ्या लांबच लांब पाऊसझडीची उपमा द्यावीशी मला वाटते. त्यामध्ये एक ठाम लय असते, गांभीर्य असते, ओलसर कुंदपणा असतो; पण ही पाऊसझड अशी सातत्याने पडत राहते, की तिची लय एकसंध आकृतीत मिळून येत नाही. तिच्यात आवर्त-प्रत्यावर्तही हिंदकळत नाहीत. अपुऱ्या सोडलेल्या वाक्यांपुढे ठेवलेल्या टिंबा-टिंबांप्रमाणे या लयीचा एकजातीय स्वर उगाचच पसरटपणे वाढत वाढत जातो आणि त्याला मग शेवटी कंटाळवाणेपणाचा स्पर्श होतो. 'चिद्घोष'मधील सर्वच नाही पण काही मोक्याच्या कथांची गत अशा तऱ्हेची झालेली आहे; आणि त्यामुळे एका बैठकीत पुस्तक वाचताना अशा तऱ्हेच्या परिणाम मनावर होतो.

'चिद्घोप', 'आम्हां हेचि भांडवल', या कथा आणि 'वृंदावन', 'पारध,' 'दृष्ट', 'प्रयाण' व 'सूर्याचा स्पर्श' या कथा, हे कथांचे दोन गट लेखकाच्या कौशल्याने स्तिमित करण्यास समर्थ आहेत. त्यांतल्या त्यात 'चिद्घोष' आणि

' आम्हां हेचि भांडवल ' या दोन्ही कथांमधून प्रत्ययकारी अनुभूतीचे चित्र अगदी सुघडपणे परिपूर्ण झालेले आहे. ' चिद्घोष ' या कथेतील मनःस्थिती इतकी हळुवार आणि मुलायम आहे, की एखाद्या वाक्याचा जरी फटकारा चुकून वेगळा बसला असता तरी त्यातील सौंदर्याचा तोल ढळला असता. या कथेत घटना फारश नाहीत, निर्माण केलेली नाटचमयता नाही. परंतु कथेचा एकसंघ अनुभवच इतक नाटचमय आहे की, त्यातील प्रत्येक शब्दाला त्या नाटचाचा हळुवार फुलोरा आला आहे. अगदी जवळून पाहिल्याशिवाय न दिसणारा आणि तरीही स्पर्शाने रोमरोम फुलविणारा. कथेच्या शेवटी या हळुवार नाटचाला आलेले संवेदनाशील टोक हा फुलोऱ्याची आतापर्यंत न झालेली जाणीव एकदम करून देते. आणि त्याबरोबरच कथेला कितीतरी उंचावर नेऊन बसविते. अगदी मुलायमपणे हा फुलोरा फुलविलेला आहे. " ताईचे ते शब्द इतके धीरगंभीर होते की, मल्या पहाटेच्या गारव्यात पर्वतीच्या देवळालगतचा वारा आपण अंगावर घेत असल्यासारखे मला वाटले. त्या शब्दांच्या, ताईच्या आवाजाच्या स्निग्धतेमुळे देवळात चाललेला कर्णकटू घंटानादसुद्धा मऊ पडला, उदात्त वाटू लागला अन् सनईतून स्रवणाऱ्या मधुर सुरांची त्याला जोड मिळाली. आता माझ्या चेहऱ्यावर पहाट फाकली. "..." दवाची पखरण पानापानांवर, पाकळचापाकळचांवर झाली होती. फुलांच्या रतिवेदना सुरू व्हायला अजून बराच उशीर होता. अन् प्रत्येक फूल सकाळचे पहिले फुलपाखरू केव्हा येते याची आं वासून वाट पाहत होते." अशा तऱ्हेची वर्णने ही केवळ सृष्टिसौंदर्य म्हणून चांगली नाहीत तर कथेतल्या नाटचमय अनुभूतीशी त्यांचे जिव्हाळचाचे भावनिक नाते आहे; किंबहुना त्या अनुभूतीचाच तो एक तलम पदर आहे. ' आम्हा हेचि भांडवल ' या कथेत इतकी हळुवार अनुभूती नाही. त्यात कथा आहे, कथासूत्र आहे. परंतु त्या कथासूत्राच्या कमीजास्त पातळीवरील पायऱ्या घडविलेल्या नसून, त्या कथासूत्राची दोन्ही टोके अगदी चतुराईने नकळत एकत्र जुळवून त्यांचा हलकेच पीळ भरला आहे. हा पीळ जणू सबंध कथेत भिनून जातो. कथेकरीबुवा, त्यांचा मुलगा गजानन, बुवांची दिवंगत पत्नी आणि त्यांची नूतन सून या सर्वांच्या परस्परांविषयीच्या वेगवेगळचा भावनांचा गोफ त्यातून घडविला जातो. ही कथा पुन्हा वाचावीशी वाटते, ती त्यातील कथानकाच्या घडणीमुळे नसून या नाजूक पण विलक्षण अशा गोफामुळेच !

## विविध पैलू

' वृंदावन ', ' पारध ', ' दृष्ट ', ' प्रयाण ' व ' सूर्याचा स्पर्श ' या आणखी वेगळचा प्रकारच्या कथा आहेत. एकेक विशिष्ट व्यक्तिरेखा या कथांमधून प्रभावितपणे रेखलेली आहे. या व्यक्तिरेखा सवंग वाटत नाहीत, तशाच असंभाव्यही वाटत नाहीत. काही सामान्य आणि काही विक्षिप्त अशा रंगच्छटांचे छायाप्रकाश कौशल्याने एकत्र करून त्या पैलूदार बनविल्या आहेत. लेखकाची निवेदनाची पद्धती या

ठिकाणी इतकी रोखठोक बनते की, यातील एकेक पैलू अगदी टवका काढल्यासारखा उमटून निघतो. "एका नव्या जाणीवेने त्याच्या मनात रोप धरले आणि हळूहळू पत्ते पिसून पुन्हा व्यवस्थित ठेवून द्यावेत, तशा काही सुप्त आवडीनिवडी नीट जुळवून त्याने आपल्या दिनक्रमाची एक वेगळीच घडी बसविली. "..." आईच्या प्रेतासाठी चिता रचण्याचे काम चालू असतानाच, आपण दररोज रात्री आईचा बिछाना कसा घालून देत असू, त्यावर चादर पसरून ती गादीखाली कशी नीट दुमडत असू, याची वृंदावनला आठवण येत होती. अन् त्यामुळे लाकडे रचणाराचे नि आपले काहीतरी गूढ नाते आहे असे त्याला वाटत होते."..." पण खरोखरी त्याला जो धक्का बसायचा होता तो बसला होता. मात्र मांसाच्या लपक्यातून सुरी हळूच आत शिरावी तसा तो दिवसादिवसाच्या जाणिवेतून त्याला नकळत सावकाश पसरत चालला होता." अशा तऱ्हेच्या वास्तवाशी भिडलेल्या प्रतिमांनी विलक्षण विक्षिप्तपणा आणि चमत्कारिक साधेपणा या दोन्हीही गोष्टींवर नेमके बोट ठेवले जाते. पद्मिनींच्या मुलींना आपल्यासमोर झिरझिरीत साडी नेसायला लावून त्यांच्या विधवा आईवर सूड उगविणे, भांगेच्या तारेत 'कापसाच्या ढिगातून मार्ग काढीत' स्वत:ची जाणीव तरंगत ठेवणे, याच्या जोडीलाच पिकेट रोडवरच्या मारुतीचा शेंदूर आणि प्रसादाचा खोबऱ्याचा तुकडा यांचा प्रतिमासंघात विदारक वास्तवतेचा छेद होतो. 'पारध' या कथेतील विचित्र आणि मनाला सुन्न करणाऱ्या प्रसंगांचे सामर्थ्य प्रभावीपणे जाणवते ते अशा प्रकारच्या वास्तवाचा ठाव घेणाऱ्या भेदकतेमुळेच. बॅरिस्टर सचदेव, त्यांची तरुण पत्नी रोझा आणि त्यांची कन्या रक्षा या तीन आकृती त्या कथेतील 'मी'च्या जाणिवेला चांगलेच लयबद्ध हेलकावे देतात. आणि शेवटी बॅरिस्टरसाहेबांच्या शरम निर्माण करणाऱ्या भयानक बीभत्स कृत्याकडे या जाणिवेचा ओघ अगदी परिणामकारकतेने वाहत जातो. वाळू सरकल्यासारखी रोझाच्या नजरेतील हालचाल, रोझा आणि 'मी' यांच्या भाषणातील अतृप्त वासनांचा सेतू बनून राहिलेले टाचण्यांचे पॅड, बॅरिस्टरांच्या कृत्याच्या वेळी लोखंडाच्या तप्त कांडीने अंगावर डाग देऊन जळत चरचरत ठेवलेली जखम यांसारख्या प्रतिमा तो ओघ निर्माण होण्यास कारणीभूत होतात. अशाच आणखीही कित्येक प्रतिमा वर उल्लेखिलेल्या इतर कथांना परिणामकारक बनवितात. त्यांतून आततायी कमळू आणि त्याचा शामळू भाऊ गंगाधर, परदेशी 'प्रयाण' करण्यास निघालेले आणि घरादारावरोबर वायकापोरांनाही 'विकून टाकून हात झटकून मोकळे होता आले असते तर!' अशी विचित्र भावना होणारे डॉ. गर्दे, स्वत:ला द्रष्टा समजणारा वेडा रामदास अशी एकेक चित्रे त्यातून निर्माण होतात. या चित्रांनी घडविलेले प्रसंग किंवा त्यांच्या मनात नाचणाऱ्या सावल्यांचे काही खेळ पाहिले तर ते अतिशयोक्त वाटतील, असंभाव्य वाटतील. पण नाडकर्णींच्या त्या वास्तवछेदक भाषाशैलीने, कमालीच्या तुटक, परंतु तरीही कथेला लगटून असणाऱ्या अलिप्तपणाने आणि विलक्षण पण

अर्थवाही प्रतिमांमुळ ते सारे थरारक वाटले तरी त्यातील असंभाव्यता निवून जाते. उलट मनावर त्याचा गाढ परिणाम घडतो. कथा वाचून झाली तरी हा परिणाम निनादत राहतो.

## यश आणि मर्यादा

परंतु येथेच त्याच्या मर्यादाही स्पष्ट व्हायला सुरुवात होते. हा अलिप्तपणा, ही तुटकता, ही वास्तवता, ह्या प्रतिमा हे सारे परिणामकारक वाटले तरी केव्हा-तरी नाडकर्णींची लेखणी याच्या लक्ष्मणरेषेच्या पलीकडे पाऊल टाकते. कुठे ते नेमके कळत नाही. अमूक एक भाग कथेला चिकटवल्यासारखा उपरा वाटतो, तो काढून टाकला तर कथा सुरेख दिसेल, असे बोट दाखवता येत नाही. पण केव्हातरी हा फरक घडतो. बाळसे बाळसे म्हणता म्हणता एकदम सूज दिसायला लागावी तसे होते. कथेमधील प्रतिमासंघात इतका ताणला जातो की, त्यातून परिणाम-कारकतेऐवजी कंटाळा झिरपू लागतो. रोखठोक वास्तववादी भाषाशैलीला तप-शीलाच्या रुक्षतेचे स्वरूप येते आणि अनुभूतींची आकृती तयार होतच नाही, ती पातळ होते, विसविशीत बनते. हे नुसत्या कथेच्या लांबीवरून घडते असे नाही. कथा कुठेतरी लेखकाच्या हातातून निसटते, हव्या तशा गिरक्या घेते. किंवा लेखकच स्वतःच्या नियंत्रणाच्या पेपरवेटखालून बाहेर येतो आणि भुलवणाऱ्या प्रतिमा सृष्टीचा पाठलाग करण्याच्या नादात अनुभूतीच्या परिघापासून दूर सरकतो. कथेचे सूत्र अपरिहार्यपणे (केविलवाणेपणाने ?) त्याच्यामागून घरंगळते. वर वर्णन केलेल्या कथांतच हा बदल थोडाथोडा डोकावायला सुरुवात होते. 'पारध'मध्ये मधूनच त्याचे दर्शन होते; 'दृष्ट'मध्ये त्याची झलक जाणवते. पण 'मोडून पडलेली मोटार', 'मोझेकचे सूत्र', 'दुर्मिळ निशाचर', 'मर्त्य', 'शत्रू' या कथांतून हे फार जाणवते. मधूनच काही प्रतिमा इतक्या हृदयस्पर्शी वाटतात, काही ठिकाणी वातावरण इतके टोकदार बनते, की अपेक्षांची उंची कितीतरी झपाट्याने वाढते. पण या अपेक्षा त्या उंचीवर स्थिर होतच नाहीत. कोसळूनही पडत नाहीत. कुठे-तरीच अधांतरी घरंगळत राहतात.

'चिद्घोष'ला पहिले पारितोषिक मिळाल्याचे वाचून मला कसेतरीच वाटले ते या घरंगळणाऱ्या अपेक्षांचा पगडा मनावर राहिल्यामुळे. तो तसा राहतो हे खरे ! अर्थात हा काही लेखकाचा किंवा त्याच्या वाङ्मयप्रकृतीचा दोष अथवा कमतरता नाही. ती त्याच्या लेखनाची प्रकृतीच आहे, असे म्हणावे लागेल. 'चिद्घोष' हा एक चांगल्या कथांचा संग्रह आहे, परिणामकारक कथांचा संग्रह आहे,...पण एका बैठकीत वाचून काढण्यासारखा किंवा एकदा वाचल्यावर मनात घोटाळत राहण्या-सारखा मात्र नाही.

**—निशिकांत मिरजकर**

**[ 'चिद्घोष'—ज्ञानेश्वर नाडकर्णी—**किंमत आठ रुपये—मौज प्रकाशन—पृष्ठे २६० ]

# १८



# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

१९१७ च्या फेब्रुवारीमध्ये लेनिन झुरिक शहरात अतिशय उदास मन:स्थितीत वावरत होता. आपल्या हयातीत रशिया-मध्ये क्रांती होईल असे त्याला त्या वेळी मुळीच वाटत नव्हते. विकासाचे सर्व मार्ग खुंटल्याशिवाय समाज क्रांतीला तयार होत नाही हा मार्क्सचा सिद्धान्तच अखेरीस खरा ठरणार होता तर. अर्थात लेनिनला मार्क्सवादी क्रांती मुळीच अभिप्रेत नव्हती. इतिहासाला धक्का देणे एवढेच क्रांतीचे गणित त्याने आपल्या मनाशी मांडले होते. परंतु हा लहानसा धक्का देण्याचे भाग्यही आपल्या नशिबात आहे किंवा नाही यासंबंधी आता तो साशंक झाला होता. आपले स्वप्न साकार होण्याचा काळ अगदी नजीक आला आहे याची त्याला फेब्रुवारीच्या अखेरीपर्यंत मुळीच कल्पना नव्हती. रशियातील तत्कालीन परि-स्थितीशी तो सर्वस्वी अनभिज्ञ होता.

१९१६ च्या उत्तरार्धापासून साऱ्या रशियाभर अन्नधान्याचा तुटवटा जाणवू लागला होता. 'अन्न द्या नाहीतर युद्ध थांबवा' अशी मागणी करीत नाग-रिक मोर्चे काढीत होते. प्रत्येक लहान मोठ्या दुकानापुढे गिऱ्हाइकांच्या लांबच

लांब रांगा लागत होत्या. १९१७ च्या जानेवारीपासून तर भाववाढीला ताळमेळच उरलेला नव्हता. खुद्द पेट्रोग्राड या राजधानीच्या शहरात सर्वच वस्तूंचे भाव सहा पटींनी वाढले होते. मॉस्कोसारख्या मोठ्या शहरात अनेक दुकानांवर 'पाव संपला लवकर येण्याची शक्यता नाही' अशा पाट्या पाहावयास मिळत होत्या. अन्नधान्या-प्रमाणेच इंधनाच्या टंचाईनेही उग्र स्वरूप धारण केले होते. त्यामुळे वीजपुरवठ्यात कपात करावी लागत होती. याचा औद्योगिक उत्पादनावर परिणाम होऊन बेकारीत भर पडत होती. पोलीस खात्याने वरिष्ठांना सादर केलेल्या अहवालात म्हटले, 'सर्वसामान्य जनतेतील असंतोष आता शिगेला पोचला असून तो दूर करण्याच्या दृष्टीने उपाय योजले नाहीत तर शहराशहरांत अन्नधान्यासाठी दंगे सुरू होतील.'

परंतु या अहवालाची दखल घेण्याइतके सरकार शुद्धीवर नव्हते.

आपली अवस्था किती कठीण झाली आहे हे आघाडीवर लढणारे सैनिक खेडे-गावातील आपल्या नातलगांना कळवीत होते. त्याप्रमाणे खेड्यांतील रहिवासी किती कष्टात जीवन कंठत आहेत याच्याही बातम्या सैनिकापर्यंत येऊन पोहचत असत. हळूहळू सैनिकांच्या छावण्यांमध्येही उठावाची भाषा बोलली जाऊ लागली. परंतु झार आणि त्याचा गोतावळा रासपुटीनच्या तंत्राने वागत असल्यामुळे परि-स्थिती फार स्फोटक बनली आहे हे दरबारातील कोणीही मानण्यास तयारच नव्हते. प्रोटोपोपोव्ह हा त्या वेळचा झारचा गृहमंत्री तर कमालीचा विक्षिप्त होता. ड्युमाची बैठक केव्हा बोलवावयाची हे ठरविण्यासाठी तो ज्योतिष्यांना कुंडल्या मांडण्यास सांगत असे. याच सुमारास जपानच्या बादशहाने आपली लोकसभा विसर्जित केली म्हणून प्रोटोपोपोव्ह याने झारलाही ड्युमाचे विसर्जन करण्याचा सल्ला दिला. प्रचलित परिस्थितीशी सत्तारूढ राजवटीची एवढी फारकत झाल्याचे उदाहरण क्वचितच पाहावयास मिळते.

जी गोष्ट झारची आणि त्याच्या गोतावळ्याची, तीच इतर मंत्र्यांची आणि वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांची. हे सारेजण ख्यालीखुशालीत मशगुल होते. भ्रष्टा-चाराने तर इतका कहर मांडला होता की रासपुटीनची मर्जी सांभाळली की सामान्य व्यक्तीही मंत्रिपदापर्यंत सहज पोचू शकत असे. महाराणी अॅलेक्झांड्रासारख्या बुद्धिमान स्त्रीला हा सारा प्रकार काही प्रमाणांत समजत होता. आपल्या नवऱ्याला—झार निकोलसला—लिहिलेल्या पत्रात अॅलेक्झांड्रा म्हणते, 'आपले सारे मंत्री एकजात महा-मूर्ख असून त्यांना फटके मारले पाहिजेत.' परंतु आपल्या पत्नीच्या इशाऱ्याकडेही लक्ष देण्याची झार निकोलसला जरूरी वाटली नाही. रशियातील रोमोनोव्ह राज-घराण्याचे हे अखरचे दिवस होते. आणि तरीही झार निकोलस राजधानीत राहण्या-ऐवजी मोहिलेव्ह येथे जाऊन बसलेला असावयाचा. आपला पती राज्यकारभारा-विषयी एवढा उदासीन आहे हे पाहून अखेरीस अॅलेक्झांड्राने स्वतःकडे सर्व सूत्रे घेतली. ती जितकी बुद्धिमान होती तितकीच लहरीही होती. त्यामुळे तिच्या राज-

वटीत कोणाची मंत्रीपदी नेमणूक होईल व कोणाची हकालपट्टी होईल याला काही ताळमेळ उरलेला नव्हता.

या काळात ड्युमाही निष्प्रभ झाली होती. रशियाची आर्थिक दुरवस्था नाहीशी करून आधुनिक पद्धतीने अर्थव्यवस्थेची उभारणी करू शकणाऱ्या तडफदार नेतृत्वाची रशियाला त्या वेळी फार गरज होती. परंतु एवढा मूलगामी विचार ड्युमा-सदस्यही करीत नव्हते. अधूनमधून ते सत्ता हस्तगत करण्याचे बेत आखत होते. परंतु ते कृतीत उतरविण्याइतके धाडस कोणात आढळत नव्हते. अॅलेक्झांड्राला पळवून इंग्लंडला न्यायचे. झार निकोलसला राज्यत्याग करण्यास भाग पाडायचे आणि त्याच्या मुलाच्या—अॅलेक्सिसच्या—नावाने नव्या राजवटीची द्वाही फिरवावयाची अशी एक धाडसी योजना काही ड्युमा-सदस्यांनी आखली होती. या बेताचा सुगावा लागताच झार निकोलसचा चुलता ग्रँड ड्यूक निकोलाय त्याला भेटायला आला आणि त्याने आपल्या पुतण्याला एकाच वाक्यात सारी परिस्थिती समजावून सांगितली. निकोलाय म्हणाला, 'निकोलस, तुझे सिंहासन डळमळू लागले आहे. वेळीच जागा हो, नाहीतर जन्मभर पश्चात्ताप करण्याची पाळी येईल.'

परंतु या बोलण्याचा झारच्या डोक्यात काहीही प्रकाश पडला नाही. पुतण्याचा निरोप घेऊन बाहेर पडताना निकोलाय म्हणाला, 'आता याचे भवितव्य ठरून गेलेले आहे. आज ना उद्या निकोलस सिंहासन गमावून बसणार हे आता निश्चित झाल्यासारखेच आहे.' या सर्व अनर्थास रासपुटीन जबाबदार आहे याबद्दल झारच्या दरबारातील मानकऱ्यांनाही शंका उरलेली नव्हती. ते सारेजण शेवटी रासपुटीनच्या कारवायांना इतके कंटाळले की त्यांनी रासपुटीनचा खून करण्याचे ठरविले. ३० डिसेंबर १९१६ रोजी रासपुटीनला प्रिन्स युसुपोव्हच्या घरी बोलवण्यात येऊन तेथे त्याचा खून करण्यात आला. झार निकोलसला जागे करण्यासाठी दरबारातील मानकऱ्यांची येथपर्यंत मजल जाऊनही झार स्वस्थच होता. रासपुटीनच्या खुनात झारचा चुलतभाऊ ग्रँड ड्यूक डिमिट्री आणि ड्युमामधील झारच्या पाठीराख्या गटाचा नेता पुरिश्कोव्हिच यांनीच पुढाकार घेतला होता. अशा रीतीने राजघराण्यावर जबरदस्त मोहिनी घालणाऱ्या रासपुटीनचा अवतार समाप्त झाला. पण फार उशिरा. झारशाही वाचविण्याची वेळ या पूर्वीच निघून गेली होती.

राज्ययंत्रणा ड्युमाने आपल्या ताब्यात घ्यावी अशी चोहोकडून जोराने मागणी होऊ लागली. उपासमारीने खंगलेली जनता, पराभवामुळे वैतागलेले लष्कर, झारच्या बेदरकार स्वभावाला कंटाळलेला सरदारवर्ग इतकेच काय पण खुद्द झारच्या कुटुंबातील मंडळीही ड्युमाला जबाबदार राहील असे प्रातिनिधिक सरकार स्थापन झाले पाहिजे असा आग्रह व्यक्त करू लागली. परंतु ड्युमाचा अध्यक्ष मिखाईल

रोडॅझिअॅन्को याची राजनिष्ठा त्या वेळी उफाळून आली. तो म्हणाला, ' ड्युमा-सारख्या केवळ कायदे करण्याचा अधिकार असलेल्या संस्थेला सत्ता हस्तगत करण्याचा नैतिक अधिकार नाही. ते बेकायदेशीर कृत्य ठरेल आणि म्हणून झारविरुद्ध लोकांना उठाव करायला सांगण्याची माझी इच्छाही नाही आणि ताकदही नाही.

१९१७ च्या जानेवारीमध्ये जनरल क्रिमोव्ह हा सेनानी आघाडीवरून पेट्रोग्राडला परतला. रशियन सेना कोणत्या बिकट परिस्थितीत आघाडीवर उभी आहे हे क्रिमोव्ह जो भेटेल त्याला सांगू लागला. रोडॅझिअॅन्कोच्या घरी ड्युमा-सदस्यांची बैठक भरलेली असताना क्रिमोव्ह म्हणाला, 'ड्युमाने झारच्या हातातून सत्ता हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला तर लष्कर ड्युमाच्या बाजूने उभे राहील हे मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतो. सैनिकांना ज्या सरकारबद्दल विश्वास वाटेल असे लोकप्रिय सरकार पेट्रोग्राडमध्ये स्थापन झाल्याशिवाय आपल्याला लष्करी विजय संपादन करता येणार नाही. झारशाहीच्या जागी ड्युमाची राजवट आली तर प्रत्येक सैनिक या घटनेचे स्वागत करील आणि त्यामुळे पुन्हा नेटाने लढण्याची जिद्द त्याच्यात निर्माण होईल.'

परंतु लष्कराचे हे आव्हान स्वीकारण्याची ड्युमा-सदस्यांची तयारी नव्हती. या प्रश्नावरून ड्युमा-सदस्यात उघड उघड दोन गट पडले.

शिंगारेव्ह म्हणाला, ' क्रिमोव्ह म्हणताहेत ते बरोबर आहे. पण हे धाडस करणार कोण हा खरा प्रश्न आहे.'

शिडलोव्हस्की उतरला, ' झार जर रशियाच्या नाशाला कारणीभूत ठरत असेल तर आपण त्याला दया दाखविण्याचे काहीही कारण नाही.'

जनरल ब्रुसिलोव्हने नैऋत्य आघाडीवरून ड्युमाला कळविले होते—' झार आणि रशिया यांपैकी जर मला एकाचीच निवड करायची असेल तर मी माझी शवती रशियाच्या बाजूने उभी करीन.'

३ फेब्रुवारी १९१७ रोजी झार निकोलसचा भाऊ ग्रँड ड्यूक मिखाईल याने रोडॅझिअॅन्कोला स्पष्टच विचारले, ' रशियात क्रांती होईल असे तुला वाटते, का ?'

रोडॅझिअॅन्को उतरला, ' अजूनही क्रांती टाळता येईल. पण त्यासाठी अॅलेक्झांड्राने राजकारणात हस्तक्षेप करण्याचे बंद केले पाहिजे आणि तिच्या मर्जीतल्या मंत्र्यांच्या जागी लोकांचा विश्वास असलेल्या नेत्यांचा मंत्रिमंडळात समावेश व्हायला हवा. एक गोष्ट मात्र नक्की; ती ही की जर राज्यकारभाराची सूत्रे यापुढेही अॅलेक्झांड्राच्या हाती राहणार असतील तर क्रांती अटळ आहे. या क्रांतीत केवळ निकोलस आणि अॅलेक्झांड्रा यांचीच आहुती पडेल असे नव्हे. क्रांती तुमचा आमचा बळी घेतल्याखेरीज स्वस्थ बसणार नाही.'

ग्रँड ड्यूक म्हणाला, ' रोडॅझिअॅन्को, येथल्या ब्रिटिश राजदूताने झार निकोलसला नेमकी हीच गोष्ट सांगितली आहे. अॅलेक्झांड्राचे सर्वव्यापी वर्चस्व किती आगलावे

ठरणार आहे याची आपल्या कुटुंबातील प्रत्येकाला चांगली कल्पना आली आहे. पण आम्ही काय करणार? तिच्या आणि निकोलसच्या भोवती देशद्रोह्यांचा गराडा पडला असून त्यातून बाहेर पडण्याची त्या दोघांचीही तयारी नाही. सगळ्या चांगल्या लोकांनी राजघराण्याबरोबरचा संबंध तोडला आहे. पण हे आमच्या ध्यानात येऊन काय उपयोग ! '

रोडॅझिॲन्को म्हणाला, 'तुम्ही एकदा ही सारी परिस्थिती झारला नीट समजावून सांगा. तुम्ही त्यांचे एकुलते एक बंधू आहात. तुम्ही स्पष्ट शब्दांत बोलू शकता. ॲलेक्झांड्राच्या दैनंदिन हस्तक्षेपामुळे साऱ्या देशातले वातावरण किती पेटत चालले आहे हे तुम्ही भावाच्या नात्याने झारला सांगण्याची वेळ आलेली आहे.'

'मी प्रयत्न करतो.' ग्रँड ड्यूकने उत्तर दिले.

ग्रँड ड्यूकची भेट झाल्यानंतर रोडॅझिॲन्कोला थोडीशी आशा वाटू लागली. झार आपल्या भावाचे कळकळीचे चार शब्द ऐकेल असा त्याचा अंदाज होता. परंतु प्रत्येक दिवशी परिस्थिती अधिकच चिघळत चालली होती आणि झारकडून कोणतीच हालचाल होण्याचे चिन्ह दिसत नव्हते. शेवटी १५ फेब्रुवारी रोजी रोडॅझिॲन्को झारला भेटावयास गेला. तो म्हणाला, 'रशिया आता असंतोषाच्या ज्वालामुखीवर उभा आहे. तुम्ही ताबडतोब महाराणीला राज्यकारभारावरून दूर करा. लोकांना मान्य असलेल्या व्यक्तीची प्रधानमंत्रिपदावर नेमणूक झाली नाही तर हा ज्वालामुखी केव्हा उफाळून येईल याचा नेम उरलेला नाही. आज मला जरा स्पष्ट बोललेच पाहिजे. तुमच्या गोतावळ्यात सारे तोंडपुजे जमले आहेत. बाहेर काय चालले आहे हे समजण्याची किंवा समजले तर तुम्हांला सांगण्याची एकातही कुवत नाही. एकही प्रामाणिक माणूस हल्ली राजवाड्यात पाऊल ठेवत नाही. तुम्हांला न विचारताच महाराणी हुकूम सोडत असतात हे आता सगळ्यांना माहीत झाले आहे. सारे लाचार मंत्री महाराजांपुढे हांजीहांजी करीत असतात. आज दरबारात परिस्थिती अशी आहे की महाराणींना नको असलेल्या माणसांची हकालपट्टी होत आहे आणि त्या जागी नालायक माणसांची खोगीरभरती केली जात आहे.'

रोडॅझिॲन्कोचे हे अनपेक्षित बोलणे ऐकून झार संतापला. तो म्हणाला, 'रोडॅझिॲन्को, केवळ बेताल आरोप करू नकोस. पुरावा सादर कर.'

२३ फेब्रुवारीला रोडॅझिॲन्को पुन्हा झारला भेटावयास गेला. त्याला पाहताच झार संतापला. झार म्हणाला, 'जे काय तुला सांगायचे असेल ते चटकन सांग. माझी चहाची वेळ झाली आहे.'

रोडॅझिॲन्को म्हणाला, 'सगळीकडे बंडाची भाषा ऐकू येत आहे.'

'खोटे, एकदम खोटे,' रोडॅझिॲन्कोवर झार खवळत म्हणाला, 'मला मिळालेली माहिती नेमकी उलटी आहे. तुम्हा लोकांना उगाच बाऊ करण्याची सवय झालेली आहे.'

झारशी अधिक काही बोलण्यात अर्थ नाही हे रोडॅंझिॲन्कोला कळून चुकले. शक्य तेवढ्या शांत स्वरात तो म्हणाला, 'ठीक आहे. तुम्हांला मिळालेल्या माहितीवर तुम्ही विश्वास ठेवा. पण मला मिळालेली माहिती तुमच्या कानांवर घालणे मी माझे कर्तव्य समजून येथे आलो होतो. यापुढे मात्र मी आपल्याला भेटायला येणार नाही.'

'का?' झारने विचारले.

'कारण तुमच्याशी बोलण्यात आता काही अर्थच उरलेला नाही. तरीही राहवत नाही म्हणून पुन्हा सांगतो. अजूनही वेळ गेलेली नाही. ड्युमाला जबाबदार असणारे प्रातिनिधिक मंत्रिमंडळ ताबडतोब नेमण्यात आले तर परिस्थिती सावरता येईल. परंतु तसे करण्याचा तुमचा विचार दिसत नाही. माझे काहीही ऐकायचे नाही असा तुमचा निश्चयच असेल तर गोष्ट वेगळी. पण मी शेवटचे काय सांगतोय ते नीट लक्ष देऊन ऐका: क्रांती राजप्रासादाच्या उंबऱ्यावर येऊन उभी राहिली आहे. तिने एकदा का प्रासादात पाऊल ठेवले की ती कशाकशाची आहुती मागेल हे मीच काय, कोणीही सांगू शकणार नाही.'

झारने काहीच उत्तर दिले नाही.

२७ फेब्रुवारीला ड्युमाचे अधिवेशन सुरू झाले. पहिल्या दिवशी ट्रूडोव्हिकी गटाचा नेता ॲलेक्झांडर केरेन्स्की बोलावयास उभा राहिला. तो म्हणाला, 'सध्याच्या दुरवस्थेला मंत्रिमंडळ जबाबदार आहे अशी लोकांची समजूत झालेली दिसते. परंतु ती समजूत चुकीची आहे. सध्याचे मंत्री म्हणजे झारच्या हातातली नुसती बाहुली आहेत. मंत्रिमंडळात कोणाची नेमणूक होते व ही नेमणूक कोण करते हे आता सगळ्यांना माहीत झाले आहे. म्हणून झारला सिंहासनावरून दूर केल्याशिवाय अराजकाचे संकट टाळण्याचा दुसरा कोणताही मार्ग उरलेला नाही. या इशाऱ्याकडे ड्युमाच्या सदस्यांनी दुर्लक्ष केले तर मी सांगतो त्याच परिस्थितीला अखेरीस तोंड द्यावे लागणार आहे. रशियाच्या क्षितिजावर तळपणाऱ्या विजा काय सांगत आहेत, हे आपण सर्वांनी ऐकले पाहिजे.'

केरेन्स्कीच्या भाषणाचा वृत्तान्त ॲलेक्झांड्राच्या वाचनात येताच ती फिस्कारली– 'या देशद्रोह्याला फाशी दिले पाहिजे.'

विद्यमान परिस्थितीचा विचार करण्यासाठी पेट्रोग्राडमध्ये सर्व डाव्या पक्षांच्या नेत्यांची गुप्त बैठक भरली होती. बोल्शेव्हिक पक्षाचा श्लिआपनिकोव्ह म्हणाला, 'ड्युमाला जबाबदार ठरणाऱ्या मंत्रिमंडळाची उभारणी करावी ही लिबरल पक्षाची मवाळ मागणी माझ्या पक्षाला मुळीच मान्य नाही. लोकशाहीला आमचा विरोध नाही. परंतु तेवढ्यावरच आमचे समाधान होणार नाही. ड्युमा नष्ट करणे आणि ड्युमाबरोबरच झारशाहीच्या सर्व खाणाखुणा नष्ट करणे हे माझ्या पक्षाचे ध्येय

असून त्यासाठी क्रांतीचा रक्तध्वज हातात घेऊन ड्युमासमोरच्या नेव्हस्की प्रॉस्पेक्ट या हमरस्त्यावर निदर्शन करण्याचे आम्ही ठरविले आहे.' २७ फेब्रुवारीला ड्युमाचे अधिवेशन सुरू होताच बोल्शेव्हिक पक्षाच्या वतीने तरुणांची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत लष्करी अधिकारीही आपण होऊन सामील झाले. क्रांति-गीते गात ही मिरवणूक नेव्हस्की प्रॉस्पेक्टवर येऊन पोचली. समोरच्या टॉरिड प्रासादात ड्युमाची बैठक सुरू झालेली होती. बाहेरच्या संतप्त निदर्शनांची मंत्रि-मंडळालाही चाहूल लागली होती. म्हणून केरेन्स्कीचे भाषण आटोपताच प्रधानमंत्री गोलित्सिन बोलावयास उभा राहिला. तो म्हणाला. 'प्रातिनिधिक मंत्रिमंडळ स्थापन करण्याचे झार यांनी ठरविले आहे. उद्याच ते येथे येऊन आपल्यासमोर तशी घोषणा करणार आहेत.'

परंतु झारने आपला विचार अचानक बदलला. संध्याकाळी त्याने गोलित्सिनला बोलावून घेऊन सांगितले, 'मी मोहिलेव्हला चाललो आहे.'

'पण तुम्ही उद्या ड्युमामध्ये येऊन प्रातिनिधिक मंत्रिमंडळाची घोषणा करणार आहात ना?' गोलित्सिनने विचारले.

'हो, सकाळी माझा तसा विचार होता,' गोंधळलेल्या गोलित्सिनकडे पाहत झार म्हणाला, 'पण माझा विचार आता बदलला आहे. मी ड्युमात येणार नाही. मोहिलेव्हला जाण्याचा माझा बेत पक्का झाला आहे.'

पेट्रोग्राड पेटू लागले असताना अॅलेक्झांड्राच्या सूचनेनुसार झार निकोलस मोहि-लेव्ह येथे निघून गेला.

त्यामुळे तर असंतोषाची धग अधिकच वाढू लागली. आदल्या दिवशीची गोलि-त्सिनची ड्युमामधील घोषणा ऐकताच निदर्शक पांगले होते. परंतु झार पेट्रोग्राड-बाहेर गेल्याचे कळताच ठिकठिकाणी निदर्शनांचे थवे जमू लागले. झार परत येत नाही असे दिसून आल्यामुळे ८ मार्च रोजी पेट्रोग्राडमधले सारे कामगार संपावर गेले. १० मार्चला पेट्रोग्राडमधल्या लष्करी छावणीचा प्रमुख जनरल खाबालोव्ह याने झारला तार करून परिस्थिती किती स्फोटक झाली आहे ते कळवले. खाबा-लोव्हने तारेत म्हटले होते– 'अन्नधान्याच्या टंचाईमुळे कामगार चिडले असून त्यांनी आता सार्वत्रिक संप पुकारला आहे. शहरात ठिकठिकाणी दंगलींना प्रारंभ झाला आहे.'

ही तार येऊनही पेट्रोग्राडला परतण्याची झारला आवश्यकता वाटली नाही. त्याने तारेनेच खाबालोव्ह याला कळविले–'कामगारांची गय करू नका. शहरातील दंगलींचा तावडतोब बीमोड झाला पाहिजे.'

खाबालोव्ह काय हुकमाचा ताबेदार. झारची तार हातात पडताच त्याने निद-र्शकांवर बेछूट गोळीबार करण्याचा आपल्या लष्कराला हुकूम दिला.

ॲलेक्झांड्रा पेट्रोग्राडमध्ये असूनही तिला दंगलीच्या गांभीर्याची जाणीव होऊ शकली नाही. या किरकोळ दंगलींचा आपले लष्कर सहज बंदोबस्त करू शकेल अशीच तिची कल्पना होती. ९ मार्च रोजी तिने आपल्या नवऱ्याला कळविले—व्हॅसिलेव्ह बेटात आणि नेव्हस्की प्रॉस्पेक्टवर काल दंगली झाल्या. निदर्शकांचा मुख्य रोख पावांच्या दुकानांवर होता. बरीच दुकाने फोडण्यात आली. दहा वाजता सुरू झालेली दंगल एक वाजता लष्कराने आटोक्यात आणली. खाबालोव्हने सर्वत्र कडक बंदोबस्त ठेवला आहे.'

दुसऱ्या दिवशी तिने पुन्हा पत्र लिहिले— ' कालच्यापेक्षा आज दंगलींचा जोर वाढला आहे. परंतु प्रामुख्याने गुंडच ही दंगल घडवून आणीत आहेत. 'रोटी पाहिजे, रोटी पाहिजे ' असे ओरडत मुलेमुली रस्त्यांवरून धावत असतात. ड्युमाचे सदस्य गप्प राहिले तर ही दंगल आपोआप शांत होईल. ड्युमामध्ये जे सदस्य सरकारविरुद्ध भडक भाषणे करतात त्यांना ताबडतोब कडक शासन करावे, असे मला वाटते.'

११ मार्चला ॲलेक्झांड्राने आपल्या नवऱ्याला तिसरे पत्र लिहिले— 'बेकार सुशिक्षित, जखमी सैनिक आणि शाळकरी मुलीदेखील आता दंगलीत भाग घेऊ लागल्या आहेत. टॅक्सी—ड्रायव्हरांना लहान लहान विद्यार्थीही दमदाटी करू लागले आहेत. त्यामुळे बरेचसे टॅक्सी ड्रायव्हर संपावर गेले आहेत. माझी मात्र अजूनही अशी खात्री आहे की जनतेचा तुमच्यावरच विश्वास आहे. फक्त आपल्यास पुरेसे खायला मिळाले पाहिजे एवढीच त्यांची सरकारकडे मागणी आहे.'

परिस्थिती स्फोटक होत चालली असतानाही झार राजधानीत परत येत नाही हे पाहून ११ मार्चला रोडॅझिॲन्कोने त्याला तार केली— 'परिस्थिती गंभीर आहे. पेट्रोग्राडमध्ये तर जवळ जवळ अराजकता निर्माण झाली आहे. सरकारी यंत्रणा कोलमडून पडली आहे. शहरातील वाहतूक बंद आहे. असंतोष सार्वत्रिक असून तो क्षणाक्षणाला वाढत आहे. सैन्यात दोन गट पडले असून त्यांचा आपापसात गोळीबार चालू आहे. अशा वेळी साऱ्या देशाचा ज्याच्यावर विश्वास आहे अशा व्यक्तीच्या हाती सरकारची सूत्रे सोपविणे अत्यंत आवश्यक आहे. आता मुळीच उशीर करून चालणार नाही. दिरंगाई सर्वनाशक ठरेल.'

या तारेला उत्तर आले नाही म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी रोडॅझिॲन्कोने झारला आणखी एक तार धाडली—'परिस्थिती कालच्यापेक्षाही अधिक विकट झाली आहे. ताबडतोब नव्या राजवटीची घोषणा करावी. उद्या काय होईल हेदेखील सांगता येत नाही इतके वातावरण अस्थिर आहे. देशाचे आणि झार राजवटीचे अंतिम भवितव्य ठरण्याची अखेरची घटिका येऊन ठेपली आहे.'

झारचे तारेनेच उत्तर आले—' ड्युमा विसर्जित करा.'

रोडॅझिअॅन्कोने पुन्हा तार केली—'तुमच्या हुकमाप्रमाणे ड्युमाची बैठक महिनाभर तहकूब केली आहे. परंतु एवढयाने काहीच साध्य होणार नाही. दंगली बंद पाडण्यास सरकार सर्वस्वी असमर्थ आहे. सैन्यावरदेखील अवलंबून राहता येत नाही; कारण बरेचसे लष्कर दंगलखोरांना सामील झालेले आहे. पेट्रोग्राडमध्ये यादवी युद्ध सुरू झाले असून ते वाढतच चालले आहे. ताबडतोब नव्या सरकारची घोषणा करावी. आता क्षणाचाही उशीर करू नका. एकदा का सैन्यात बंडाचा वणवा पेटला की जर्मनीचा विजय होईल आणि मग रशियाबरोबर रोमोनोव्ह राजघराण्याचाही अंत होईल. रशियाच्या हितासाठी मी तुम्हांला हात जोडून विनंती करतो की तावडतोब नव्या सरकारची घोषणा करावी. आपले आणि रशियाचे भवितव्य निश्चित करणारा क्षण समीप आला आहे. आता यापुढे आपल्याकडून वाया घालविण्यात येणारा प्रत्येक क्षण सर्वनाशाला आमंत्रण देत आहे.'

रोडॅझिअॅन्को एवढ्या कळकळीने सांगत असताही झार निकोलसचा आपल्या पत्नीच्या सांगण्यावरच विश्वास होता. ड्युमा विर्सजित करून आपण क्रांतीचा शेवटचा पलिता पेटवीत आहोत याचेही त्यास भान राहिले नाही. कारण नागरिक झारशाहीविरुद्ध कितीही चिडले असले तरी त्यांचा ड्युमावर अद्यापही विश्वास होता. परंतु ड्युमा विर्सजित करण्याचा झारचा हुकूम कळताच त्यांच्या विश्वासाचा आधारच नाहीसा झाला.

झारने ड्युमाचे विसर्जन करण्याचा हुकूम दिला आहे, ही बातमी कळताच पुढच्या कार्यक्रमाचा विचार करण्यासाठी ड्युमा-सदस्यांची खाजगी बैठक घेण्याचे ठरले. ज्याला ज्याला ही बातमी कळली होती तो तो सदस्य टॉरिड प्रासादाकडे निघाला होता.

शिगारेव्ह या लिबरल सदस्याने शुलगीन याला फोन केला— 'ड्युमाची तातडीची बैठक आता सुरू होणार आहे.'

'अरे, तू हे काय सांगतोस ?' शुलगिनला झारच्या हुकमाची माहिती नव्हती.

शिगारेव्ह सांगू लागला, 'ड्युमा विर्सजित करण्याचा झारने रोडॅझिअॅन्को याला हुकूम दिला आहे. म्हणून आपण यापुढे काय करावयाचे हे सर्व ड्युमा सदस्यांनी एकत्र जमून निश्चित करावयाचे ठरविले आहे. झारच्या ताज्या हुकमाची बातमी शहरात पसरताच सगळीकडे पुन्हा जोरदार दंगल सुरू झाली आहे. पुलांचा तावा निदर्शक घेत आहेत. म्हणून आपल्याला ताबडतोब ड्युमामध्ये पोचले पाहिजे. मी मोटार पाठवीत आहे. तू माझ्या घरी ये. आपण दोघे बरोबर निघू या.'

शुलगिन आणि शिगारेव्ह मोटारीतून ड्युमाकडे जाण्यासाठी निघाले असताना शिगारेव्ह म्हणाला, 'झारला निदान अखेरच्या क्षणी तरी सद्‌बुद्धी सुचेल अशी मला आशा होती. पण नाही ! त्याने आपला हट्ट अखेरपर्यंत कायम ठेवला आहे.

ड्युमाच्या विसर्जनाचा हुकूम देऊन त्याने क्रांती टाळण्याची शेवटची संधी दवडली आहे. झारने कसेही करून ड्युमाशी तडजोड केली असती तर क्रांती टळण्याची काही तरी शक्यता होती.'

शिंगारेव्हची मोटार कामेनोस्ट्रोव्हस्की रस्त्यावर आली तेव्हा तेथे कामगार आणि विद्यार्थी यांची इतकी गर्दी झाली होती की मोटार पुढे नेणे शिंगारेव्हला अशक्य झाले. निदर्शक प्रत्येक रस्ता रोखून धरत होते. शिंगारेव्हची मोटार कशीबशी तेव्हा पुलाजवळ येऊन पोचली. जमावाने मोटारीस पुढे जाऊ देण्यास प्रतिबंध करताच खिडकीतून डोके बाहेर काढत शिंगारेव्ह म्हणाला, 'आम्ही ड्युमाचे सदस्य आहोत. आम्हांला बैठकीला गेले पाहिज."

'तुम्ही शिंगारेव्ह आहात काय ?' एका विद्यार्थ्याने विचारले.

'होय.'

ताबडतोब तो विद्यार्थी आपल्या मित्रांना मोठमोठ्याने सांगू लागला– 'हे ड्युमाचे सदस्य आहेत. यांची वाट मोकळी करा.'

शिंगारेव्हची गाडी टॉरिड प्रासादाच्या प्रवेशद्वाराशी पोचली. तेथे कामगार, सैनिक, विद्यार्थी व स्त्रिया मिळून वीस हजार निदर्शक जमून झारशाहीच्या धिक्काराच्या घोषणा करीत होते. ड्युमाचे सदस्य कोणता आदेश देतात याची वाट पाहत हे निदर्शक बाहेर उभे होते. प्रवेशद्वारातून आत जाताना शिंगारेव्ह शुलगिनला म्हणाला, 'अजूनही ड्युमा लोकांना शांत करू शकेल. पण...' बाहेरच्या गोंगाटामुळे शिंगारेव्हचे पुढचे शब्द शुलगिनला ऐकू आले नाहीत.

ड्युमाचा सभापती रोडॅझिॲन्को याच्या कचेरीत ड्युमातील सर्व पक्षांच्या नेत्यांची बैठक सुरू झाली. ड्युमा विसर्जित करण्याचा झारचा हुकूम झुगारून देऊन आपण आपले अधिवेशन चालूच ठेवावे असे काही सदस्यांनी सुचविले. तसे करणे म्हणजे राज्यक्रांतीची घोषणा करण्यासारखेच होते. म्हणून रोडॅझिॲन्कोने या सूचनेला विरोध केला. झारचा हुकूम मानावा, परंतु त्याबरोबरच आपले अनौपचारिक अधिवेशन चालू ठेवावे, म्हणजे लोकक्षोभास आवर बसेल.' असे रोडॅझिॲन्कोसारख्या राजनिष्ठांचे म्हणणे होते. परंतु त्याची ही सूचना ऐकताच अनेक सदस्य खवळले व ते सारेजण एकदम बोलू लागले.

एकजण म्हणाला, 'ड्युमाने हंगामी सरकार स्थापन करून ड्युमाचे घटना समितीत रूपांतर झाल्याचे आपण घोषित करावे.' दुसरा एकजण म्हणाला, 'आता स्पष्ट बोलण्याची वेळ आलेली आहे. आपण झारच्या बाजूचे आहोत की, लोकांच्या बाजूचे आहोत हे आपण निःसंदिग्ध शब्दांत लोकांना सांगितले पाहिजे.'

एवढ्यात खोलीचे दार करकरले. ड्युमाच्या पहाऱ्यासाठी नेमलेल्या पोलिस तुकडीचा प्रमुख आत येऊन रोडॅझिॲन्कोला म्हणाला, 'सैनिकांनी इमारतीच्या

पहिल्या चौकात प्रवेश केला असून त्यांनी पहाऱ्यावरच्या शिपायांना भोसकण्यास प्रारंभ केला आहे ! मलाही मारण्याचा त्यांचा विचार होता. पण मी कसाबसा तेथून पळालो. आता तुम्ही मला वाचविले पाहिजे. '

त्या पोलिस अधिकाऱ्याचे ते शब्द ऐकताच ॲलेक्झांडर केरेन्स्कीचे डोळे चमकले. आता वादविवाद करण्यात वेळ घालवून चालणार नाही हे त्याला कळले. ताडकन उभा राहून तो म्हणाला, ' जे काही आपण आता ऐकले त्यावरून आपल्याला एका क्षणाचाही उशीर करून भागणार नाही. सैनिक बिथरले असून रस्त्यारस्त्यांवर झारनिष्ठ तुकड्यांशी त्यांच्या चकमकी सुरू झाल्या आहेत. मी या सैनिकांना भेटावयास जाणार आहे. मी त्यांना ड्युमाच्या वतीने काय सांगू ? मी त्यांना असे सांगू का, की सैनिकहो, ड्युमा तुमच्या पाठीशी आहे. तुमच्या आंदोलनाचे नेतृत्व करण्यास ती सिद्ध आहे. ड्युमा राज्यसूत्रे स्वतःकडे घेण्यास तयार आहे ? बोला, मी सैनिकांना काय सांगू ? माझ्या या एकाच प्रश्नाचे मला तुमच्याकडून उत्तर हवे आहे. '

ड्युमा–सदस्यांत कुजबुज सुरू झाली. सैनिकांना भेटण्यासाठी केरेन्स्की अधीर झाला होता. कोणीच काही निश्चित उत्तर देईना तेव्हा केरेन्स्कीने स्वतःशीच निर्णय केला. कोणालाही न विचारता तो बाहेर जमलेल्या वीस हजार निदर्शकांना त्यांच्या स्वागतासाठी सामोरा जाणार होता. केरेन्स्की एकटाच रोडॅझिॲन्कोच्या खोलीतून तीरासारखा बाहेर पडला. चौकात निदर्शक उभे होते. त्यांच्यापुढे जाऊन उजवा हात उंच करीत केरेन्स्की गरजला, ' क्रांतीच्या अग्रदूतांचे मी स्वागत करतो. '

केरेन्स्कीचे हे उद्गार ऐकताच हर्षभरित झालेले विद्यार्थी निदर्शक सैरावैरा धावत सुटले आणि अल्पावधीतच त्यांनी ड्युमाच्या इमारतीचा ताबा घेतला.

१२ मार्च १९१७ ची दुपार. मोहिलेव्ह येथील आपल्या आलिशान खोलीत झार निकोलस अलेक्झांड्राचे ताजे पत्र वाचत होता. तिने लिहिले होते– ' पेट्रोग्राडमध्ये दंगली सुरू झाल्या असल्या तरी आम जनतेचा अद्यापही तुमच्यावरच विश्वास आहे. ' त्या पत्राची घडी करीत झार स्वतःशीच पुटपुटला, ' रोडॅझिॲन्कोला काही कळत नाही. ॲलेक्झांड्रा म्हणतीय तेच खरे आहे. '

आणि त्याच वेळी झारचे पेट्रोग्राडमधले सिंहासन हादरू लागले होते. या सिंहासनाचे भवितव्य काही दिवसांतच नव्हे तर काही तासांतच ठरणार होते.

(क्रमशः)

# भिंतीच्या पेंबड्या

सुधाकर राजे

## ☐ उपाशी पुतळा

एक वेळ माणूस चांगला असू शकेल (–'माणूस'चांगला आहेच !), पण हेडक्लार्क चांगला असणे सुतराम् अशक्य. अर्थात् आमचा हेडक्लार्क त्यातलाच. त्यामुळे त्याच्या कोटाच्या खिशांत मेलेला उंदीर ठेवायचा धाडसी कट रचण्यापासून साहेबाने त्याला एकदा आमच्यासमक्ष खरपूस झाडावा, असा ठराव लंच-अवरमध्ये एकमताने पास करण्यापर्यंत आम्ही आतापर्यंत त्याच्यावर यथेच्छ सूड उगवला आहे–पण तो सर्व मनातल्या मनात. देवाने आधी शेळी निर्माण केली आणि शेळ्या करण्याची भरपूर प्रॅक्टिस झाल्यावर कारकून निर्माण केला. तेव्हा आम्ही मंडळी आणखी दुसरे काय करणार ? पण कनिष्ठाला वरिष्ठाबद्दल वाटणाऱ्या या नैसर्गिक वैरभावाला बिनधोक मोकळी वाट घालून देण्यासाठी जपानमध्ये एक अभिनव कल्पना वापरलेली वाचनात आली. तेथल्या एका मोठ्या वीज कारखान्याच्या चालकांनी फोरमनचा एक पुतळा तयार केला आहे, आणि आठवड्यातून एक दिवस त्या पुतळ्याला मारझोड करण्याची कामगारांना परवानगी देण्यात आली आहे. घ्या ! आमच्यापैकी एकाही कारकुनाच्या अंगात हेडक्लार्कचा संगमरवरी पुतळाच काय पण फायलीवर पेन्सिल-स्केच काढण्याइतकीदेखील कला नाही ही त्याच्या दृष्टीने केवढी भाग्याची गोष्ट आहे ! अन् समजा, नवचित्रकार हुसेनच्या प्रतीक-कलेच्या धर्तीवर आमच्यापैकी एखाद्याने चष्मा, फाइल, कॉलबेल, बॉलपेन अशी प्रतीके जुळवून हेडक्लार्कचे चित्र तयार केले असते तरी त्या चित्राचा आठवड्यातून एकदा 'समाचार' घेण्याची परवानगी आम्हांला देण्याइतकी कला-दृष्टी आमच्या साहेबांत आहे की नाही याची मला फार शंका आहे.

पण कल्पना अफलातून आहे यात शंकाच नाही, अन् ती आपल्याकडे निरनिराळ्या ठिकाणी थोड्याफार फरकाने वापरता येईल. उदाहरणार्थ, मुंबईच्या गिरणी-कामगारांनी या जपानी तंत्रात खास हिंदुस्थानी सुधारणा करून आपल्या फोरमनच्या पुतळ्याला आठवड्यातून एकदा 'घेरा' घालावा अन् त्याला तब्बल चोवीस तास उपवास घडवावा. दिल्लीच्या सरकारी कारकुनांनी सेक्शन ऑफिसरच्या पुतळ्यावर आठवड्यातून एकदा सिकनोटींचा मारा करून त्याला हतबुद्ध करावे. विद्यार्थ्यांनी मास्तरांच्या पुतळ्यासमोर "परीक्षा मुर्दाबाद, गाईड झिंदाबाद"

अशा बुलंद घोषणा करून त्याचे कान किटवून टाकावेत—अन् प्रत्येक नवऱ्याने आपल्या बायकोचा पुतळा करून त्याच्यासमोर मूग गिळून न बसता बोलायची दुर्मिळ संधी (गुपचूप) साधावी.

## ☐ सौंदर्याची उंची

उत्तरकाशी येथील नेहरू गिर्यारोहण संस्थेचे प्रमुख ब्रिगेडियर ग्यानसिंग यांनी म्हटले आहे की तरुण स्त्रियांनी गिर्यारोहण केले तर त्यांच्या सौंदर्यात भर पडेल. कमाल आहे ! चढण्याचीच गोष्ट असेल तर शेजारच्या चाळीतली सरवटयांची सरु रोज पाच जिने चढून जाते तरी तिला लिपस्टिक-पावडरच्या मुखवटयाखाली 'अंदरकी बात' लपवावी लागते, आणि कामतांची कमू कधी मलबार हिलवर तर कधी अँटॉप हिलवर फिरायला जाते, पण अजूनही तिन मुरका मारला की, मला मळमळायला लागते. पण मला वाटतं अमेरिकेतले स्कायस्क्रेपर मात्र अमेरिकन स्त्रियांच्या ब्यूटी ट्रीटमेंटचे एक अविभाज्य अंग म्हणूनच बांधण्यात आले असावेत, एरव्ही सौंदर्याची उंची कशी मोजता येणार ? मुंबईतही आता पंधरा-वीस मजली इमारती उठू लागल्या आहेत, तेव्हा उपवर मुलींच्या बापांनी स्थळ शोधण्याच्या आधी असल्या इमारतींच्या अगदी वरच्या मजल्यावर राहायला स्थळ शोधावे, म्हणजे काम फत्ते !

## ☐ डोक्यावर चढलेली फॅशन

इंग्लंडात पक्ष्याच्या घरटयासारखी केशभूषा करून एक फॅशनेबल स्त्री पक्ष्यांचे संग्रहालय पाहायला गेली तेव्हा तिच्या डोक्यावर खरोखरीच घरटे आहे असे वाटून तेथल्या पक्ष्यांनी तिच्यावर हल्ला केला, अशी बातमी परवा वर्तमानपत्रांत वाचली. काय म्हणावे या पक्ष्यांच्या अडाणीपणाला ! फॅशन म्हटली की बायकांच्या डोक्यात काय येईल व त्याच्या मागोमाग डोक्यावर काय येईल हे ब्रह्मदेवाला सांगता यायचे नाही. मात्र ब्रह्मदेव हा हिंदुस्थानी देव असल्याने त्याचे या बाबतीतले अज्ञान क्षम्य आहे, पण फॅशनेबल इंग्लंडातल्या पक्ष्यांनी एवढा अडाणीपणा दाखवला ही खरोखरीच लाजिरवाणी गोष्ट आहे. आपल्याकडे या फॅशनचे स्वदेशीकरण करायचे म्हणजे कावळ्याचे शेणाचे घर जास्त फॅशनबेल, की चिमणीचे मेणाचे घर जास्त फॅशनेबल हे ठरवावे लागेल. ते काही असले तरी आजच्या फॅशनेबल युगात फॅशनचा कुठलाही हुकूम 'शिरोधार्य' आहे—आता एखादे वेळी फॅशन जरा निराळ्या अर्थाने डोक्यावर चढून बसते, ही गोष्ट वेगळी.

○




# राष्ट्रीय स्पर्धेत परदेशी हस्तक्षेप

'सोव्हिएट देश' पाक्षिकातर्फे ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस एक अठरा इंच उंचीचा सुंदरसा पेला कलकत्त्यातील रशियाचे व्हाईस–कौन्सिल मि. व्ही. आय्. गुर्जेनोव्ह यांनी भारतीय फुटबॉल असोसिएशनकडे सुपूर्द केला. 'इडन गार्डन्स'च्या पॅव्हिलियनमध्ये अध्यक्ष श्री. एस्. के. आचार्य यांनी तो थाटामाटात स्वीकारला. १९६७ सालातील भारतीय फुटबॉल संस्थेच्या स्पर्धेतील विजेत्या संघास तो बहाल करण्यात येणार आहे.

भारतीय फुटबॉल संस्थेची स्पर्धा अर्थातच राष्ट्रीय पातळीवर असणार. अशा राष्ट्रीय स्पर्धेकरिता परदेशातील एका प्रकाशनसंस्थेतर्फे विजयी संघास बक्षीस दिले जावे आणि ते प्रतिवर्षी फिरते राहावे ही कल्पनाच मुळी स्वाभिमानी राष्ट्रभक्ताला पटणार नाही. राष्ट्रीय संस्थेच्या कारभारात बाहेरील व्यक्ती किंवा संस्थांना वर्चस्वाचे स्थान नसावे. भारतीय फुटबॉल संस्थेला आज रशियाने एक पेला दिला, उद्या अमेरिका देईल, परवा एखादी परदेशीय व्यक्ती काही बक्षीस देईल, तिचा वापर कोणत्या पद्धतीने करावा याचे तारतम्य भारतीय संस्थेच्या सदस्यांना असणे आवश्यक आहे.

आज दुर्दैवाने राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या संस्था खाजगी आहेत. या खाजगी संस्थाच भारताचे नाव घेऊन परदेशी जातात किंवा परदेशी संघाबरोबर खेळतात. कुआलालंपूर येथे झालेल्या मेरडेका फुटबॉल स्पर्धेत भारताचा अकरापैकी आठवा क्रमांक लागला. पण त्यामुळे भारतीय फुटबॉल संस्थेला कुणी दोषी धरले नाही. मधल्यामधे भारताची मात्र बदनामी झाली. कारण भारत हरला असेच सगळीकडे झाले.

'सोव्हिएट देश'ने दिला तसा पेला उभारण्याची भारतीय फुटबाल संस्थेजवळ ताकद आहे. असा शोभिवंत पेला खरेदी करून या संस्थेने एखाद्या उत्तम राष्ट्रीय फुटबॉलपटूचे नाव त्याला दिले असते तर त्या खेळाडूबरोबरच संस्थेचा गौरवही पण आपोआप झाला असता. परंतु झाले हे काही ठीक झाले नाही. भारतीय फुटबॉल संस्थेने हा पेला त्या पाक्षिकाला परत देऊन टाकावा हे बरे. सरकारने जर

या कृत्याला परवानगी दिली असेल तर तीही त्वरित काढून घ्यावी. नाहीतर सामान्य रसिकांच्या मनातून ही संस्था फुटबॉलप्रमाणे लाथाडली जाईल !

## भावी खिलाडूवृत्तीचे अंकूर

डेक्कन जिमखान्याच्या क्रीडांगणावर तुम्ही संध्याकाळी जर कधी गेलात तर एक मनोहर दृश्य तुम्हांला दिसेल. सात ते चौदा वर्षांची मुले आणि मुली तुम्हांला तेथे हसता-खेळताना, नाचता-बागडताना दिसतील. हॉकी, फुटबॉल, कवायती असे निरनिराळे खेळ त्यांच्यामधून तुम्हांला अनुभवावयास येतील. एक नवी जोमदार पिढी तयार करण्याचे कार्य तिथे चालले आहे. वार्षिक वर्गणी फक्त तीन रुपये. दीड-दोनशे मुले तेथे रोज सायंकाळी एक-दीड तास खेळत असतात. चार शिक्षकांची बाल-क्रीडा मंदिरात नेमणूक केलेली आहे. प्रत्येक खेळाचे प्राथमिक शिक्षण तेथे दिले जाते. लहान मुलांच्या मानसिक अवस्था लक्षात घेऊन तो तो आवडीचा खेळ त्यांना वहाल करून टाकतात. खेळताना त्यांच्यावर विशेष बंधने घातली जात नाहीत. त्यांना कंटाळा किंवा राग येईल असे काही शिस्तीचे धडे दिले जात नाहीत.

आज भारतामधील क्रीडाक्षेत्रात जी सुधारणा होऊ पाहते ती वरपासून खालपर्यंत. भारताचा एक संघ करण्यासाठी सर्व संस्था आटापीटा करीत असतात. पण त्यात कर्तृत्व मिळत नाही. नुसते ९ किंवा ११ खेळाडू मिळतात. वरच्या लोकांनी खालच्या थरातून कशा सुधारणा होतील याकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे. आज भारताची प्रत्येक खेळात आंतरराष्ट्रीय क्षितिजावर पीछेहाट होताना दिसते त्याचे एक महत्त्वाचे कारण हेच आहे. मध्यंतरी मेजर शंकरराव चाफेकर यांनी सांगितले की आम्हांला जागतिक कीर्तीचा एखादादुसरा क्रीडापटू नको. कमी प्रतीचे हजारो खेळाडू आम्हाला चालतील.

भारतीय नोकरवर्गात, उद्योगधंद्यात खेळाडू आणि खिलाडूवृत्ती मिळेनाशी झाली आहे याचे कारण लहानपणीच त्यांचेवर तसे संस्कार झालेले आढळत नाहीत. त्या दृष्टीने डेक्कन जिमखान्याने उचललेले पाऊल नमुनेदार आहे. ही मुले पुढे मोठी झाली म्हणजे त्यांच्यात खेळासंबंधीची एक जबाबदारीची जाणीव निर्माण होईल. मग ती कोणत्याही क्षेत्रात जावोत. खेळ खेळल्यामुळे त्यांच्यांत खिलाडूपणाची स्वभाववृत्ती मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊ शकेल. त्या वेळी मग आजच्यासारख्या विद्यार्थ्यांच्या दंगली आणि असंतोषाचे भडके तुम्हांला आढळणार नाहीत. अशा नव्या आशावादाच्या अंकुरांची रोपटी महाराष्ट्रांत सर्वत्र लावणे आणि रुजणे आवश्यक आहे.

—मनोहर रेगे

# कर्णधार पतौडी

स. न. सप्रें, ९

आपल्या १६-६-६७ च्या अंकात आपले क्रीडासमीक्षक श्री. मनोहर रेगे ह्यांचे "बोर्डेविरुद्धचे वादळ" ह्या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेले समीक्षण वाचले आणि आश्चर्य व खेद वाटला.

श्री. मनोहर रेगे जर श्री. चंदू बोर्डे ह्यांना भारतीय क्रिकेट संघाच्या ऑस्ट्रेलियाचे दौऱ्यावर कर्णधार म्हणून सुचवीत असतील तर तो त्यांचा वैयक्तिक हक्क आहे. परंतु तसे करताना सध्याचे कर्णधार पतौडीचे नबाब श्री. मन्सूर अली ह्यांना बदनाम करण्याचा हक्क श्री. रेगे ह्यांना पोहोचत नाही, हे ते विसरलेले दिसतात.

पतौडीचे नबाब ह्यांना ऑक्सफर्डहून उसने आणले आहे ह्या विधानाशी आम्ही सहमत नाही; किंबहुना असे म्हणणे म्हणजे श्री. मन्सूर अली भारतीय नागरिकच नव्हेत असे म्हणण्यासारखे आहे. त्यांना भारतीय नागरिकत्वाचा हक्क नाकारण्याचा अधिकार श्री. रेगे यांना आहे का ?

पतौडींच्या नेतृत्वाविषयी त्यांनी केलेली टीका त्यांचे क्रिकेटविषयक ज्ञानभांडार उघडे करते. त्यांची आम्हांस कीव येते. सर लिअरी कॉन्स्टन्टाईन, गॅरी सोबर्स, विजय मर्चंट, ए. एफ्. एस्. तल्यारखान व विजय मांजरेकर ह्यांच्यासारखे मातबर तज्ज्ञ त्यांच्या नेतृत्वाविषयी प्रशंसा करतात ती काय गंमत म्हणून, की क्रिकेटविषयीच्या त्यांच्या अज्ञानामुळे ? ससेक्स संघाचे नेतृत्व करण्यासाठी त्यांची निवड झाली ती काय ससेक्सला नेते कमी पडले म्हणून !

बापू नाडकर्णी व जयसिंह ह्यांचे गेल्या वर्षी वेस्ट इंडीजविरुद्ध झालेल्या सामन्यातील व रणजी ट्रॉफी सामन्यातील "पराक्रम" पाहिले की त्यांची निवड झाली नाही हे योग्यच झाले असे वाटते. शिवाय भारतीय संघाची व कर्णधाराची निवड एकाच वेळी झाली तेव्हा पतौडींना उपरोक्त दोन खेळाडू दौऱ्यावर नसावेत, असा निवड समितीला सल्ला देण्यास अवधी तरी मिळाला का ?

हैदराबादने पतौडींची कर्णधारपदी निवड केली नाही त्याचा निष्कर्ष ते कर्णधारपद धारण करण्यास नालायक आहेत, असा श्री. रेगे ह्यांनी काढला आहे. तो केवळ पोरकटच व आपले ते गोमटे व लोकांचे ते कारटे म्हणण्याएवढा खुळा आहे.

महाराष्ट्राचे नेतृत्व श्री. चंदू बोर्डे सध्या करतात; पण रणजी करंडक सामन्यात करंडक दूरच, पण विभागीय

# कर्णधार चंदू बोर्डे

अजिक्यपद महाराष्ट्रास मिळू शकत नाही. हे केवळ दुर्दैव आहे, त्याचा अर्थ श्री. बोर्डे हे निकृष्ट नेते आहेत किंवा ते चांगले खेळाडू नाहीत असा होत नाही.

इंग्लंडच्या पराभवाचे खापर श्री. रेगे पतौडींच्या माथी मारतात, पण ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडबरोबर मिळालेल्या विजयाचे श्रेय मात्र ते पतौडींच्या नेतृत्वाला देत नाहीत. वास्तविक इंग्लंडच्या दौऱ्यात व कसोटीमालिकेत फलंदाज क्षेत्ररक्षक म्हणून कामगिरी उत्तम तऱ्हेने पाडून आपल्या नेतृत्वाची धुरा त्यांनी फार उत्तम प्रकारे सांभाळली हे श्री. रेगे नाकारू शकतात का ? लीडस् येथील सामन्यांतील दुसऱ्या डावात भारतीय संघाच्या पराक्रमाचा अर्ध्याहून अधिक वाटा पतौडींच्या नेतृत्वाचाच आहे हे वेगळचाने सांगण्यास हवे काय ? केवळ निष्णात नेताच पराभवाचे उंबरठ्यावर असताना आपल्या वीरांना स्फूर्ती देऊ शकतो व शत्रूला नामोहरम करू शकतो, हे श्री. रेग्यांना नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही, असे वाटते.

१९३२ सालापासून संघैक्य सावणारा नेता भारतास लाभला नव्हता; कारण त्या वेळी वयक्तिक हेवेदावे अधिक होते हे सर्वांनाच ठाऊक आहे आणि आता पतौडींच्या रूपाने असा नेता लाभला असता श्री. रेग्यांसारखे टीकाकार अपशकुन करू बघतात हीच खेदाची गोष्ट आहे. त्यांचा लेख भारतीय संघातील संघैक्य भंग पावण्यास पुरेसा नसला तरी त्याला छोटासा तडा नक्की पाडू शकेल.

**अ. रा. गुप्ते**
**स. न.**

इंग्लंडमधील कसोटी मालिकेत चंदू बोर्डे यांना अपयश येताच त्यांच्या विरुद्ध गहजब करणे बरोबर होणार नाही. त्यापूर्वी वेस्ट इंडीजविरुद्ध त्यांनी मुंबई येथे बहारदार शतक टोलवलेच होते. शिवाय प्रत्येक कसोटी सामन्यात त्यांनी चांगली कामगिरी बजावली आहे.

रणजी ट्रॉफीत महाराष्ट्राचे त्याचप्रमाणे दुलीप ट्रॉफीत पश्चिम विभागाचे ते कर्णधार आहेत. त्यांचा अनुभव मोठा, वागणूक सौजन्यपूर्ण आहे. खेळाडूंमध्ये संघभावना निर्माण करून ते भारतीय क्रिकेटची शान वाढवू शकतील. पतौडींना हैदरावादचे नेतृत्वही मिळू शकत नाही. भारतीय क्रिकेटमध्ये रुळल्याशिवाय संघनायकाची माळ त्यांच्या गळ्यात वारंवार घालणे योग्य नाही. बोर्डे यांना एकदा संधी देण्यास काय हरकत आहे ?

**रा. गो. कोरान्ने**

## तकलादू स्क्रिप्ट : समर्थ दिग्दर्शन

# राजा नावाचा गुलाम

'महाराष्ट्रीय कलोपासक' या संस्थेने 'रसिक कुला'ची आपली जुनी कल्पना गेल्या वर्षीपासून पुन्हा अंमलात आणावयास सुरुवात केली. आणि थोड्या खर्चामध्ये निश्चितपणे काही चांगले पाहावयास मिळेल, अशा विश्वासाने प्रेक्षकांनी या योजनेस उदार आश्रय दिला.

पहिल्या वर्षीच्या यशाने उत्साहित होऊन या मंडळींनी दुसऱ्या वर्षीचा कार्यक्रम हाती घेतला. शाम फडके यांच्या 'राजा नावाचा गुलाम' या नाटकाने या वर्षीच्या कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

साधी शुद्ध करमणूक करण्याच्या हेतूने नाटक उभे करण्यात आले होते. आणि नाट्य-निर्मितीचा हा हेतू निश्चितपणे सफल झाला. खटकले ते इतकेच की, प्रयोगाचा दर्जा कलोपासकांच्या पूर्वलौकिकास साजेसा नव्हता.

फडके यांच्या लेखनात अनेक दोष आहेत. फार्सला आवश्यक असलेली गती शेवटपर्यंत सांभाळता न आल्याने प्रयोग समाधानकारक होत असूनही प्रेक्षक कंटाळतो. फारसा विचार करू नये, होईल ते पाहावे, भरपूर हसावे, आणि चांगली करमणूक झाल्याचे समाधान मानीत घरी परतावे, इतक्याच माफक अपेक्षाही फडक्यांचे लिखाण पुऱ्या करू शकत नाही.

राजा नावाचा तरुण. बेबी नावाची छोकरी राजावर फिदा तर राजाचा जीव शशीवर. वासू हा राजाचा मित्र. राजाचे आपल्याकडे लक्ष जावे म्हणून बेबी वासूने आपल्यावर प्रेम करावे, असा आग्रह धरते. तो पुरा पडत नाहीसे दिसल्यावर ती राजाच्या 'बॉस'वर प्रेमाचा वर्षाव करते.

प्रथम बिचकणारा नाडकर्णी बेबीसाठी वेडापिसा होतो. कावळे-बावळे ही जोडी राजाचे लग्न सीता नावाच्या मुलीशी व्हावे म्हणून कसून प्रयत्न करीत असते. या सर्वांच्या गोंधळात माजलेल्या रेड्यासारखा घुसतो तो वासूचा मामा–दूधवाला दात्या.

राजाभोवती सीता, शशी, कावळे व बेबी, असा चौफेर पिंगा सुरू होतो. वैतागलेला राजा सर्वांना झिडकारून 'शशी'चे पाणीग्रहण करण्याच्या बेतात असताना अंतर्बाह्य बदललेली सीतामाई नाडकर्णींचा हात धरून निघून जाते. चौघींच्या

चौकड्यात राहूनही राजा 'कोरडा'च राहतो.

तीन तासांच्या तीन अंकी फार्समधील एखाद–दुसरी जागा सोडता, फडक्यांना यश संपादन करता आलेले नाही. सुसंबद्ध कथानकाची अपेक्षा नसली तरी नाट्य-प्रसंगांची सलगता सांभाळून येणारा विनोद अपेक्षित होता. या संदर्भातही निराशा पदरी आली. असे हे तकलादू स्क्रिप्ट माधव वझे यांनी जास्तीत जास्त यशस्वी पद्धतीने उभारण्याचा प्रयत्न केला आहे.

'रसिक कुला'ची रंगभूमी ही प्रयोगशील रंगभूमी. नवीन प्रयोग, नवे नेपथ्य, नवीन कलावंत यांना या रंगभूमीवर भरपूर वाव! त्याच दृष्टीने माधव वझे यांनी आपले कलावंत निवडले असावेत, असे वाटते.

रेखा अभ्यंकर (विवेक यांची कन्या), मीनल चव्हाण ही मंडळी नवीन. अरुण शिन्दे, सुरेश गरसोळे यांच्या पदरीही अनुभवाची शिदोरी आहे असे नाही. त्यातल्या त्यात अनुभवी अरविन्द साने (दाते दूधवाले). असा हा नटसंच. अर्थात अभि-नयाच्या दृष्टीने सर्वांत प्रभावी ठरली कल्पना मालेराव. बेबीचा 'भावडेपणा'(?), सहज वावर, आणि कमालीचा आत्मविश्वास ही तिची जमेची बाजू. कल्पनाच्याच बाबत दुसरी उल्लेखनीय गोष्ट म्हणजे संयम. प्रेक्षकांच्या पसंतीच्या लाटेवर कला-वंत चटकन स्वार होतात. विशेषतः, फार्सिकल विनोदी नाटकामध्ये असा धोका जास्त. परंतु मालेराव जशा कमी पडल्या नाहीत, तशाच अवास्तव वाहवल्याही नाहीत. नवीन कलावंतांच्या संचातील हा प्रयोग पुष्कळच नीटस वाटला. फार्समध्ये दिग्दर्शकाला भरपूर वाव. वझे यांनी आपल्या कल्पनाचातुर्याने अनेक प्रसंग खुलवले. पात्रांच्या हालचाली व कॉंपोझिशन्स यावरही पुष्कळ मेहनत घेतलेली दिसली. आनंद पै यांचे नेपथ्य वास्तव होते. वास्तव अशासाठी की, प्रयोग सुरू होण्या-पूर्वीच कोणत्या पद्धतीचे नाटक पाहावयास मिळणार याची कल्पना नेपथ्य समर्थ-पण देत होते.

प्रयोगातील अजून एक मोहक बाजू म्हणजे भास्कर चंदावरकरांचे पार्श्वसंगीत. नाटकाच्या 'मूड'शी मिळते जुळते व त्याला पूरक ठरणारे हे संगीत प्रयोगाची रंगत वाढवण्यास उपकारक ठरले.

नेपथ्य, संगीत व कलावंत यांच्या प्रयत्नांतून निर्माण झालेल्या या प्रयोगामागे दिग्दर्शक नावाचा प्राणी समर्थपणे उभा असल्याचे जाणवत असले, तरी एक तक्रार नोंदवावीशी वाटते. प्रयोगाला आणखी आठ–दहा दिवसांची तालीम मिळाली असती तर ते उपकारक ठरले असते. रसिक कुलाच्या प्रेक्षकांकडून 'पात्री' दहा रुपयांचा खुराक आगाऊच वसूल केला असल्याने प्रत्येक प्रयोग जास्तीत जास्त निर्दोष व्हावा, याची जाणीव संयोजकांनी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

– शरद गोखले



# पुरंदरच्या बुरुजावरून

इंग्रज टोपीकरांची फलटणे खंडाळयाचा घाट ओलांडून पुढं निघाली. साहेब पुण्याच्या रोखाने निघाला. कर्नल कुक आणि कॅप्टन स्टुअर्ट यांना खात्री वाटत होती, आपण आठ दिवसांत पुणं गाठणार ! पुणं जिंकणार ! इंग्रजी निशाण शनिवार वाड्यावर लागणार !

इंग्रजांचे पडघम वाजत होते. तुताऱ्या ललकारत होत्या. बुटांचे आवाज रपरपत होते. करड्या आवाजांत इंग्रजी हुकूम सुटत होते. इंग्रजी निशाण फडफडत होतं. सहा हजार मैलांवरून आलेल्या मूठभर इंग्रजांचा केवढा हा ज्योश ! केवढी ही हिम्मत ! मराठी साम्राज्याच्या मुळावरच घाव घालायला साहेब निघाला होता. खास इंग्रजी गोरं सैन्य होतं फक्त पाच हजार !

तरीही एवढा आत्मविश्वास ? विजयाची एवढी खात्री ?

होय ! कारण साहेबाला घेऊन येत होता आमच्यातलाच एक फितूर ! त्याचं नाव होतं, श्रीमंत रघुनाथराव ऊर्फ दादासाहेब पेशवे ! प्रत्यक्ष थोरल्या बाजीरावसाहेब पेशव्यांचा हा औरस पुत्र शत्रूला सामील होऊन मराठी दौलत इंग्रजी घशात घालीत होता.

पुण्यात बातम्या आल्या. फडणीसनानांनी आणि बोकीलबापूंनी पुण्याचा बंदोबस्त केला होता. मराठी फौजा साहेबाच्या तोंडावर गेल्या होत्या. पानशांचा तोफखाना जबडे पसरून शत्रूवर किरण साधीत होता. महादजीबाबा शिंदे आपली बालेघाटी फौज घेऊन सलामीला उभे होते.

आणि युद्ध पेटलं. काल्र्यापासूनच दणादणी सुरू झाली. मराठी तोफखाना झडू लागला. जागोजाग मराठी हत्यारं इंग्रजी छाताडांना भिडली. कडाका उडाला. धुळीची धुंद उसळली. घोडदळं इतस्ततः दौडत खिंकाळत इंग्रजांवर तुटून पडली. बंदुकांच्या फैरी उडू लागल्या. रण पेटलं अन् इंग्रजांचा खासा इष्टुर फाकडा उडाला ! फाकड्याचं प्रेत मराठी मातीत लोळत पडलं. हा इष्टुर फाकडा म्हणजेच कॅप्टन स्टुअर्ट. हा अत्यंत शूर होता, म्हणून मराठी माणसंही त्याला 'फाकडा' असं म्हणत.

लढाई मावळात दुमदुमत होती. साहेबावर शिद्यांचा मारा जीव खाऊन होत होता. साहेबाचं निशाण डळमळायला लागलं होतं. लढाई वडगाव आणि तळेगाव या गावांपर्यंत पांगली होती. इंग्रज मार खात होता. इंग्रजी फौज आसरा घ्यायला तळेगावात घुसली. मराठे होतेच पाठीवर. साहेब घरा-घरांत घुसले. पण आता जाणार कुठं ? मराठ्यांनी इंग्रजांचा पाठलाग करून घुशी माराव्यात तसं बुकलून मारलं. इंग्रजी घमेंड खलास झाली.

इंग्रजांचा सपशेल पराभव झाला ! पुणं जिंकायची आणि शनिवारवाड्यावर युनियन जॅक लावण्याची स्वप्नं विरघळली. इंग्रजांनी गुडघे टेकले. वडगावच्या लढाईत इंग्रजांचं अगदी सपशेल अरबस्तान झालं. श्रीमंत राघोबादादा मराठ्यांचे कैदी बनले.

मराठ्यांनी इंग्रजांचा पराभव केला या बातम्यांनी जगाला आश्चर्याचा धक्काच बसला. हे असं कसं झालं ?

खुद्द इंग्लंडमध्ये खळबळ उडाली. मुत्सद्देगिरीत आणि समशेरीत कमी न पडणारे इंग्रज अडाणी मराठ्यांकडून झोडपले गेले ? कमाल झाली ! जो तो पराभवाची कारणं शोधू लागला. अन् लष्करी टीकाकारांना या पराभवाचं कारण सापडलं. इंग्रजांचा मराठ्यांनी का आणि कसा पराभव केला ? टीकाकारांनी कारण असं शोधलं की, इंग्रजांच्याच ईस्ट इंडिया कंपनीने आपली इंग्रजी हत्यारं मराठ्यांना

# आमची लायकी

ब. मो. पुरंदरे

विकली. नेहमीच विकतात. तीच हत्यारे, तोफा व दारूगोळा मराठ्यांनी वडगावच्या लढाईत इंग्रजांवर वापरला! त्याच शस्त्रास्त्रांनी त्यांनी इंग्रजांना झोडपून काढलं!

ही हकीकत जाहीर होताच इंग्लंडमध्ये भयंकर खळबळ उडाली. तिथल्या वृत्तपत्रांनी ईस्ट इंडिया कंपनीवर भयंकर कठोर टीका सुरू केली. आपली हत्यारं शत्रूला विकून त्याच हत्यारांखाली शत्रूकडून मारा खाणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या अकलेची 'तारीफ' लोक करू लागले. लोक चिडून संतापून इंग्रज कुंपणीवर आग पाखडू लागले. ईस्ट इंडिया कंपनी-विरुद्ध रान पेटलं. या पराभवाच्या चौकशीची मागणी इंग्लंडमध्ये होऊ लागली.

चौकशी झाली. तीत असंच दिसून आलं की, इंग्रजांकडून विकत घेतलेली शस्त्रास्त्रं मराठ्यांनी वापरून इंग्रजांना झोडपलंय! ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाची बैठक झाली. बैठक फारच गरमागरम झाली. शेवटी बोर्डाने हिंदुस्थानातील आपल्या इंग्रज अधिकाऱ्यांना जाब विचारला, की तुम्ही मराठ्यांना शस्त्रास्त्रे का विकली आणि का विकता?

तेव्हा हिंदुस्थानातील इंग्रज वरिष्ठ अधिकाऱ्यांनी इंग्लंडला जवाब लिहून पाठविला की, 'आम्ही मराठ्यांना शस्त्रास्त्रे विकली व विकतो हे खरं आहे. त्यांच्या मागणीनुसार त्यांना आपली शस्त्रास्त्रं आम्ही विकतो. पण कमी पल्ल्याची जुनी शस्त्रास्त्रे विकतो. तीही आम्ही त्यांना जर देण्याचं नाकारलं, तर अशी साधार भीती वाटते की, हे मराठे स्वतःच स्वतःची शस्त्रास्त्रं तयार करतील! आपल्या तोडीची शस्त्रास्त्रं ते खासच बनवतील! हे लोक खरोखरच बुद्धिमान आहेत. त्यांची लायकी फार मोठी आहे. पण स्वतःचीच लायकी त्यांनी ओळखलेली नाही. त्यांना अशाच आळसात व अज्ञानात ठेवलं, तरच आपला कार्य-भाग हिंदुस्थानात साधेल. दुसऱ्यावर नेहमी अवलंबून राहण्याची त्यांची सवय आपल्या हिताच्या दृष्टीने आपणच जोपासली पाहिजे. वडगावच्या लढाईत इंग्रजांचा पराभव झाला आहे, हे खरं आहे. पण तो केवळ दुर्दैवी योगायोग आहे. नेहमीच असा आपला पराभव होणार नाही!'

—आमची लायकी आम्हांला कधीही उमगली नाहीं. चिमूटभर इंग्र-जांनीं अखेर आमचं खंडप्राय राष्ट्र सहज गिळून टाकलं.

# एक नमुनेदार वर्गणी ग्रंथालय

वा. पु. कोल्हटकर, ग्रंथपाल, पुणे

कल्पना करा. आपण सगळेजण एका सुव्यवस्थित ग्रंथालयाची आपल्या गावासाठी अपेक्षा करीत आहा. ते ग्रंथालय असे हवे की जेथे आपली गरज अत्यल्प वेळात अंदाजणारे देवघेवकार आहेत. आपणांस हवी असणारी अनेक पुस्तके, मागणीनुसार अधिक प्रतीही तेथे आहेत. त्यांवर धूळ कणमात्रही नाही. फाटतूट तंतुमात्रही नाही. सगळी नवट, तरुण नि खुटखुटीत आहेत. देवघेवसाहाय्यकांचा सल्ला घेऊन आपणा स्वतःसच त्या त्या विषयाच्या कपाटाशी जाता येऊन ती स्वतःच्या हाताने काढून आणता येत आहेत. देवघेव टेबलाशी ती आपण आणून ठेवल्यावर तेथले ते देवघेवकार ती चटकन हाती घेत आहेत आणि काही क्षणांमध्येच आपणांशी काही ओळखीचे घरेलू वार्तालाप करीत जरूर त्या नोंदी उरकून आपली फक्त सही घेऊन आपणांस चटपटीतपणे मोकळे करीत आहेत. अजूनही भल्याभल्यांना मोहिनी घालणारे इंग्रजी भाषेतले वार्तालापच–अगदी खालच्या पट्टीतले किंवहुना सुकोमल स्वरांतले कानी येत आहेत. घरी नेलेली पुस्तके परत आणण्यास उशीर झाला असेल तर हिशेबानुसारचा दंड योग्य अजिजीच्या उद्‌गारांसह आपण स्वतः होऊन काढून देत आहो. ही उशिराची दुसरी तिसरी वेळ असेल तर तेथले ग्रंथपाल निर्धारी मुद्रेने व खडखडीतपणे सफाईदार इंग्रजीत सुनावून टाकीत आहेत की "आजच मी आपलं सदस्यत्व रद्द करणार होतो. पण ही जाणीव दाखवता आहा. म्हणून आणखी एक संधी देतो. नाहीतर माझ्याजवळ ठोक दोन हजार प्रतीक्षकांची यादी आहे. उगीच हे बेशिस्त काम नको. आमच्या नियमितपणासारखाच वाचकांचाही नियमितपणा व व्यवस्थितपणा आम्हांला इथे पाहिजे. उगीच काय आपलं सगळं हे असं अनियमित नि बेशिस्त?" वाचक वर काहीही न बोलता वरमून "माफ करा" म्हणू लागतो आहे तोच "हं. मीच बोलतोय" या शब्दांत स्मितमुद्रेने ते ग्रंथपाल फोनच्या किणकिणाटास उत्तर देऊ लागत आहेत.

एक कल्पना आहे ही. एक साधे वर्गणी ग्रंथालय. म्हणजे लोकांकडून वर्गणी घेऊन त्यांची सेवा करणारे ग्रंथालय. नवट, झगमगणारी, खुटखुटीत पुस्तके, त्यांपैकी अनेकांच्या मागणीच्या अंदाजाने जरूर तेवढचा जास्त प्रती ठेवून वाचकांची सोय करणारे ग्रंथालय. घरून परत आणलेली पुस्तके देवघेव साहाय्यकांच्या हाती शिस्तशीर स्तब्धतेत ठेवणारे, उशीर झाला तर अजिजीने बोलून योग्य तो दंड देणारे,

नव्याने घरी न्यावयाची पुस्तके निवडताना कपाटाशी स्वत: जाण्याची मुभा नीट सांभाळणारे व नोंदीसाठी देवघेवकारांहाती ठेवणारे, आपल्या अयोग्य वर्तनाबाबत ग्रंथपालांचा योग्य शब्दांचा मार मुकाट्याने घेणारे वाचक. साधेच पण त्यांतल्या त्यांत शानदार कपडे सदैव वापरू शकणारे, वाचकांनी पुस्तके उशिरा परत दिल्यावर दंड वसूल करणारे, घाटदार आवाजात काहीशा थाटाच्या रीतीने शिष्टाचाराचे शब्द उच्चारणारे व वेळी अवक्तशीर, अव्यवस्थित, अनियमित वाचकांना आपल्या ग्रंथालयाचे रास्त नियम, आजच्या लोकशाहीच्या जमान्यातही सुनावणारे ग्रंथपाल. आणि केवळ ग्रंथालयाचा दर्जा व कामाच्या गरजाच ध्यानात प्रामाणिकपणे वागवून नेमणुका करणारे व ग्रंथालयाची दैनंदिन व्यवस्था, अर्थसंकल्प, साहाय्यकनियुक्ती, वाचकव्यवहार, एकंदर शिस्त यांबाबत ग्रंथपालाचाच शब्द निरपवादपणे अखेरचा मानणारे ग्रंथपालांच्या वरचे चालक. ग्रंथालयाच्या केवळ अर्ध्याच तपात एकूण व्यवहार कल्पनातीत वाढून अर्ध्या तपापूर्वीची जागा अत्यंत अपुरी ठरून स्वतंत्र तीन मजली सव्वादीड लाख रुपये बांधणीकामी घेतलेली ग्रंथालयाच्या व्यापानुसारची सुप्रशस्त, सुप्रकाशित, सुसज्ज नवी इमारत व तीसभोवरचे देखणे आवार.

## छे, कल्पनाविलासातले !

केवळ कल्पनासाम्राज्यातले दृश्य वाटते, नाही हे ! आपल्याकडे ग्रंथालये काय कमी आहेत ? अर्धे तपच काय, एक-दीड दोनच काय, नऊ-नऊ, दहा-दहा तपांच्या उमरीची ग्रंथालये काय नाहीत ? पण त्या सर्वांचा त्यांमधल्या काही विशिष्ट किताबतींनीं भूषित वा सरकारप्रणीत प्रसादचिन्हांकित झालेल्यांचादेखील अनुभव काय आहे ? सामान्यजनांस कोणता आहे ? ग्रंथपालन हा जीवन-व्यवसाय म्हणून पत्करणारांचा काय आहे ? यच्चयावत् सर्वांचा अनुभव समानच आहे. वर उल्लेखिल्याप्रमाणे दहा-दहा तपे गेल्यावरही त्या ग्रंथालयांच्या स्वत:च्या इमारती असल्याच तर त्या आता अत्यंत अपुऱ्या, गैरसोयीच्या, ज्या एका काळीं त्या उभ्या झाल्या, त्यानंतरच्या काळात आजूबाजूची घरे – वस्ती – रस्ते यांत कल्पनातीत बदल झाल्याने स्थलांतराचीच मागणी करणाऱ्या ठरल्या आहेत. वर्गणीच्या उत्पन्नाचे मान अपुरे आहे आणि व्यवहारी दृष्टीने काही उत्पन्न वाढविणे अवश्य असूनही स्वत:च्या उत्पन्नासाठी वेगळी जागा भाड्याने देण्यासारखी काही त्या आवारात करणे शक्य असूनही ती सोय ध्येयदृष्टीशी विसंगत ठरेल अशा आम्हा पढीक व्यावसायिकांच्या परोपदेशामुळे न केल्याने, जमापुंजी अगदी तुटपुंजी आहे. अपुऱ्या उत्पन्नामुळे गरजेनुसार वाढता ग्रंथसंग्रह सांभाळणे जुळत नाही. कपाटे, खुर्च्या, टेबले हे कायम सामान नवे खरीदणेच काय, असलेल्याची डागडुजी, रंगरंगाईही करविणे जमत नाही. ग्रंथसंग्रहाच्या संख्येप्रमाणेच जितक्या संख्येचे व गुणमानाचे सेवक असणे अवश्य तितके व तसे घेणे आणि राखणे अवश्य झालेले आहे. कामात निरलसपणे गुंतलेले सेवक असले तरी त्यांची जीवनमानानुसारची काहीही सोय झालेली

नसल्याने ते आतल्या आत क्षणशः कणशः धुमसत आहेत. वर्गणी भरणारेच उत्पन्नदाते असल्याने त्यांच्या तक्रारींना चालकांकडून कान व मान दिला जात आहे. घरी नेलेली पुस्तके वेळेवर परत करण्याची सवय व शिस्त बाजूलाच राहिली, वर उलट ठरीव उपयोगाची पुस्तके शक्य तितकी लांब मुदत स्वतःकडेच ठेवण्याचे पाहणारे, ग्रंथालयाची वेळ संपल्यावरही हक्काने पुस्तके घेणारे, मोठमोठ्याने सैरावरा बोलत ग्रंथालयात बसणारे वा हिंडणारे, वार्षिक त्रैवार्षिक निवडणुकांमध्ये आपल्या मतांच्या हुकमी हलवाहलवीवर चालकांना खेळवणारे वाचक ठायी ठायी आहेत. त्या निवडणुकांच्या जल्लोषात म्हणजे हैदोसघुल्ल्यात सभ्य, सुशिक्षित व ससंस्कृत वाचक भाग घेणे नको असे म्हणत आहेत.

## आणि सरकारी मदतीनंतरही तेच

हे वरतीच वर्णिलेले आपल्या वर्गणी ग्रंथालयांचे बहुशः सर्वत्रचे, सदोदितचे, सुपरिचित दृश्य. अलीकडे यांपैकी अनेक वर्गणी ग्रंथालयांना सरकारी अनुदानाने मुक्तद्वार करण्यात आलेले आहे. तेथे कोठेही गेलो तरी हेच बहुशः आढळेल. ही वर्गणीग्रंथालये जुन्या काळापासून सार्वजनिक म्हणून चुकीने गणली गेली. पण अलीकडच्या त्यांच्या मुक्तद्वारपणामुळे ती आता सार्वजनिक ह्या संज्ञेतही बसली आहेत. अशा सर्वच ग्रंथालयांचे एकंदर दृश्य चालकसेवकप्रेम, सेवकवाचकनाते, वाचकचालक यांचे नाजूक संबंध, सेवकजीवन सोयरीक सर्वत्र एकच एक, सर्व समान आहे. या ग्रंथालयाच्या पाठीशी त्यास मुक्तद्वार व सार्वजनिक बनविणारी योजना असूनही त्यामध्ये सेवाव्यवहारकरारांच्या दृष्टीने किंचितदेखील फरक झालेला नाही. ग्रंथालये मुक्तद्वार झाल्याला वीसवर वर्षे झाली आहेत. म्हणजे जवळपास एका पिढीचा काळ संपला आहे. पण पूर्वी होते तेच आजही अबाधितपणे राहिलेले आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवरचे पुण्यातल्याच एका ग्रंथालयाचे दृश्य किती व कसे कौतुकाचा व आनंदाचा विषय आहे पाहा. आरंभी जे कल्पनेतले दृश्य म्हणून वर्णिले ते त्या ग्रंथालयाचे वर्णन आहे. हे सांगोवांगीचे सातासमुद्रापलीकडच्या ग्रंथालयाचे वर्णन नव्हे. तर येथले पुण्यातले अनेकानुभूत दृश्य आहे व तेच वर्णिले आहे. त्याची वाढ अविरत झाली, प्रारंभ अगदी मोजका पण थाटाचा झाला. सेवक खऱ्या निवडीने घेतले व संतोषाच्या स्थितीत प्रथमारंभापासून ते सगळेच राहिले,– त्यांचे योग्य व यथार्थ ते कौतुक वरिष्ठांनी केले, अपरिमित देवघेवीतील वापरामुळे व विशिष्ट वाचकांच्या वावरामुळे होणारी फाटतूटलूट रोजच्या व्यवहाराच्या ठरविलेल्या स्थिर धोरणामुळे दूर सारली गेली, जाग्यावरच्या ग्रंथपालांना व त्यांच्या सहकाऱ्यांना संपूर्ण व सत्य पाठिंबा प्रारंभापासूनच दिला गेल्याने अनियमित, बेशिस्त वाचकांना वचक बसला नि शिस्तशीर वक्तशीर वाचकांच्या सवयी नि स्वभाव अन्य वाचकांमध्येही पसरले. हे जेथे पाहण्यासारखे आहे त्या पुण्यातल्या ब्रिटिश ग्रंथालयाचे ते सर्व वर्णन आहे. काहीही कल्पनेतले नाही. ○

## शिवसेना

[ पृष्ठ ३ वरून ]

राजकीय पक्षांना एक प्रचंड आव्हान असल्यामुळे मुळातच ती संघटना उखडून टाकायचा प्रयत्न काही राजकीय पुढारी करीत आहेत. ठाणे नगरपालिकेच्या निवडणुकीत सर्व राजकीय पक्षांचा पराभव करून शिवसेनेला निर्विवाद बहुमत मिळाले. भिवंडीमध्ये शिवसेना–पुरस्कृत उमेदवारांच्या गळ्यात विजयश्रीने माळा घातल्या. आता मुंबई महानगरपालिकेकडे शिवसेनेचा मोर्चा वळत आहे. लोकसत्ताक राज्यपद्धतीमध्ये लोकमत हे सर्वश्रेष्ठ. शिवसेनेची प्रचंड शक्ती तिच्यावरील मराठी जनतेच्या प्रेमात आहे. ठाणे नगरपालिकेवर फडकत असलेला शिवसेनेचा विजयी ध्वज मराठी मन शिवसेनेने किती सहज जिंकले आहे त्याची ग्वाही देत आहे. गत-वर्षी शिवाजी पार्कवर भरलेल्या शिस्तबद्ध, शांत आणि भव्य मेळाव्यात तीच गोष्ट दिसून आली. शिवसेनेने मनात आणले म्हणून अन्यथा लोकप्रिय असलेले शिव-सेनेचे कठोर टीकाकार श्री. आचार्य अत्रे हे मुंबईमधील लोकसभा मतदारसंघातून निवडणूक हरले. उलट कै. स. गो. बर्वे आणि त्यांच्या भगिनी सौ. तारा सप्रे ह्या शिवसेनेच्या वरदहस्तामुळे अनेक मतांनी निवडून आल्या. मराठी समाज अत्यंत विस्कळीत झाला होता. तो काही प्रमाणात संघटित करण्याचे बहुमोल कार्य शिवसेनेने केले.

शिवसेनेचे बरेच, विशेषत: मराठी, टीकाकारसुद्धा हे कबूल करतात की शिवसेनेच्या मागण्या योग्य आहेत. म्हणजेच जोपर्यंत शिवसेनेच्या मागण्या प्रत्यक्ष अंमलात आणल्या जात नाहीत तोपर्यंत शिवसेनेची नितांत आवश्यकता आहे. मुंबईमधील मराठी माणूस आज स्वत:च्या राज्यात बेकार, बेघर, निराधार आणि निर्वासित म्हणून राहत आहे. महाराष्ट्रात मुंबई आहे पण मुंबईत महाराष्ट्र पाहण्यास आज मिळत नाही. नवीन येणारे परप्रांतीय मुंबईत आल्यावर ४–५ दिवसांत नोकऱ्या मिळवतात आणि वर्षभरात राहण्यास स्वत:ची जागा मिळवतात. ह्याचे कारण म्हणजे परप्रांतीयांची हुशारी आणि मराठी माणसाचे दुर्गुण हे निखालस खोटे आहे. दाक्षिणात्यांचे इंग्रजी अधिक चांगले आणि ते लोक अनेक बाबतीत मराठी लोकां-पेक्षा श्रेष्ठ ही समजूत अत्यंत चुकीची आहे. केंद्र सरकारने १० कोटी रुपये खर्चून मद्रासमध्ये काढलेल्या 'नेवेली लिग्नाईट कॉर्पोरेशन'मध्ये काम करणारे १०० टक्के लोक तामीळ आहेत हा केवळ योगायोग असे कोण म्हणेल ? मराठी उच्चा-धिकारी असलेल्या ऑफिसमध्ये अथवा धंद्यांत बहुरंगी स्वरूप पाहावयास मिळते. परंतु परप्रांतीय, विशेषत: दक्षिण भारतीय, उच्चाधिकारी असलेल्या ठिकाणी केवळ एकरंगी, एकभाषी स्वरूप दिसते ह्याचे स्पष्टीकरण आणि कारणमीमांसा शिव-सेनेचे टीकाकार कशा रीतीने करतील ? बंगालमध्ये खाजगी उद्योगधंद्यातही ८०%

जागा केवळ बंगाली लोकांना राखून ठेवण्याचा कायदा बंगालचे भूतपूर्व मुख्यमंत्री पद्मभूषण श्री. बिधनचंद्र रॉय ह्यांनी केला होता. इतर प्रांतांतही स्थानिक लोकांना अग्रहक्क, प्राधान्य देण्याचा अलिखित कायदा असतो. मग असा कायदा महाराष्ट्रात करण्याची शिवसेनेने मागणी केली तर त्यात काय गैर आहे? शिवसेनेच्या टीका-कारांनी प्रथम Shiv Sena Speaks ही पुस्तिका वाचावी.

राष्ट्रवादाच्या नावाखाली महाराष्ट्रावर आजपर्यंत अनेक अन्याय झाले. राष्ट्रवाद ही काही केवळ महाराष्ट्राची मक्तेदारी होऊ शकत नाही. भाषावार प्रांतरचनेच्या वेळी बराच मराठी मुलूख शेजारच्या राज्यात विलीन करण्यात आला. महा-राष्ट्राला मुंबई मिळू न देण्याचा अटोकाट प्रयत्न करण्यात आला. कृष्णा, गोदावरी पाणीवाटपासाठी नेमलेल्या गुलहट्टी कमिशनने ८० टक्के पाणी आंध्र आणि म्हैसूर ह्या राज्यांना देण्याचे ठरविले. कृष्णा–गोदावरी ह्या नद्या महाराष्ट्रात उगम पावतात. महाराष्ट्रात शेतीसाठी पाटबंधारे, कालवे, धरणे अत्यंत कमी असून अन्नधान्याच्या बाबतीत ते एक परावलंबी राज्य आहे. परंतु अन्याय हा महा-राष्ट्राच्या पाचवीलाच पुजलेला आहे. कारण तो सहन करण्याची ताकद अथवा दुबळेपणा फक्त महाराष्ट्रातच आहे हे सर्वांना आणि विशेषत: केन्द्र सरकारला चांगले माहीत आहे. खुळचा आणि नेभळट राष्ट्रवादाच्या कल्पनेमुळे राष्ट्रभक्तीची परंपरा असलेल्या महाराष्ट्रातील पुढारी महाराष्ट्राच्या हितसंबंधाबाबतही ऐक्य करू शकत नाहीत. म्हणूनच मराठी जनता ते नेभळट नेतृत्व झुगारून आज शिव-सेनेच्या तोंडून आपल्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडीत आहे. महाराष्ट्राशिवाय इतर सर्व प्रांतांतील पुढारी स्थानिक लोकांच्या हितसंवर्धनासाठी सदैव जागरूक असतात म्हणूनच इतर कोठल्याही प्रांतांत आपणांस बहुरंगी शहरे आढळत नाहीत. मुंबईला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, बहुरंगी, कॉस्मॉपॉलिटन ह्या गोंडस विशेषणांनी गौरवून मराठी जनतेच्या आणि नेतृत्वाच्या डोळ्यांत धूळ फेकली जाते. मुंबई जर केवळ महाराष्ट्राची नसून सबंध राष्ट्राची, तर मग तिच्या उन्नतीसाठी केन्द्राकडून जादा देणग्या का मिळू नयेत? बहुरंगी, कॉस्मॉपॉलिटन असणे ही जर चांगली गोष्ट असेल तर मग इतर सर्व राज्यांच्या राजधान्या बहुरंगी का केल्या जाऊ नयेत? इतर प्रांतां-तील पुढारी आणि जनता जर आपली शहरें कॉस्मॉपॉलिटन होऊ न देण्यासाठी दक्ष राहतात तर मग आमच्या पूर्वजांच्या मूर्खपणामुळे मुंबईस आलेला महाराष्ट्र-हितघातक असा बहुरंगीपणा कमी करण्यासाठी शिवसेनेने प्रयत्न केला तर त्यांत तिचे काय चूक?

आपल्या लोकांचे हित आपल्याच काय पण इतरांच्या राज्यांतही पाहण्यासाठी परप्रांतीय पुढारी किती जागरूक आणि दक्ष असतात ह्याचे एक ताजे उदाहरण म्हणजे काही दिवसांपूर्वी दोन मद्रासी खासदारांनी काढलेला मुंबईचा दौरा. ऐकीव बातम्यांवर विश्वास ठेवून शिवसेनेची चौकशी करण्यासाठी आलेल्या द्रविड मुन्नेत्र

कळघम पक्षाचे श्री. कृष्णमूर्ती आणि कम्युनिस्ट पक्षाचे श्री. उमानाथ ह्यांनी महाराष्ट्र सरकारवर अनेक कोरडे ओढले आहेत. परप्रांतीय पुढाऱ्यांनी मुंबईत येऊन शिव-सेनेची चौकशी करण्याचा अव्यापारेषु व्यापार करावा हा महाराष्ट्राचा केवढा मोठा अपमान ! महाराष्ट्राच्या कोणत्याच पुढाऱ्याने त्याविरुद्ध ब्र काढू नये ही काय आश्चर्यजनक गोष्ट. नक्षलबारीची पाहणी करण्यासाठी निघालेल्या खासदारांच्या तुकडीला बंगालच्या मुख्यमंत्र्याने केवढा प्रखर विरोध केला. देशासाठी स्वार्थत्याग, प्राणार्पण करणे ही शूर महाराष्ट्राची परंपरा. ह्या थोर परंपरेस अनुसरून महाराष्ट्राने आजपर्यंत परप्रांतीयांना अत्यंत सहिष्णुतेने वागविले. त्यांचे अनंत लाड केले. स्वतःच्या लोकांना विसरून परप्रांतीयांना राहण्यासाठी गृहनिर्माण मंडळाचे गाळे दिले; त्यांना जाडचा पगाराच्या नोकऱ्या दिल्या. परंतु आज, ' काय फल हे मम तपाला ' असे वैतागून म्हणून कपाळावर हात मारण्याची वेळ महाराष्ट्रावर आली आहे. संकुचित दृष्टीचा म्हणून त्याच्यावर आरोप होत आहेत आणि राष्ट्रवादाचे धडे शिकविण्यात येत आहेत. वास्तविक असे धडे देण्याचे महाराष्ट्र हे सबंध भारता-तील शेवटचे राज्य. कारण महाराष्ट्राचा पिंड राष्ट्रभक्तीचा. फार पुरातन काळा-पासून राष्ट्रावर जेव्हा जेव्हा आक्रमण आले तेव्हा तेव्हा त्याचे निवारण करण्यासाठी महाराष्ट्राने कमालीचा स्वार्थत्याग केला. मोंगल आणि ब्रिटिश साम्राज्यांना खरा विरोध महाराष्ट्रात झाला. भारताचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक मराठी देश-भक्त कामास आले. अशा परिस्थितीत महाराष्ट्राला राष्ट्रभक्तीचे धडे मिळावेत, आणि तेही द्रविड मुन्नेत्र कळघमसारख्या पक्षाच्या पुढाऱ्यांकडून, हा केवढा मोठा


**दिवसभर क्लासवर प्रवेश चालू**

- ★ अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मशिनच्या प्राथमिक माहिती-सहित इंग्रजी, हिन्दी, मराठी, (नवीन कीबोर्ड) टाईपरायटिंग शिकविले जाते.
- ★ भगिनींसाठी स्त्रीशिक्षकांची सोय व दुपारच्या सोयीच्या वेळा.
- ★ थोड्याच दिवसांत इंग्रजी शॉर्टहँड चालू होत आहे.

**समाधान टाईपरायटिंग इन्स्टिटयूट**

**८८, भवानी शंकर रोड, दादर, मुं. २८.**

विरोधाभास आहे. द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचे राज्य मद्रासमध्ये आल्यानंतर तेथे राष्ट्रभाषेवर अनंत अत्याचार होत आहेत. 'सत्यमेव जयते' ह्या राष्ट्रीय बोधवाक्याचे तेथे तामीळमध्ये भाषांतर केले गेले. द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचा जन्मच मुळी भारतातून फुटून निघण्याच्या आणि ब्राह्मणद्वेषाच्या तत्त्वावर झाला. आज त्यांनी ते तत्त्व तूर्त बाजूला ठेवले असले तरी केन्द्राकडून जादा देणगीची मागणी करतेवेळी तशी धमकी दिली जाते. त्यावरून त्यांचे राष्ट्रप्रेम किती तकलुपी आहे हे स्पष्ट होते.

शिवसेनेच्या टीकाकारांनी ह्या गोष्टीचीही जाणीव ठेवावी, की इतर प्रांतांतही अशा संस्था आज अनेक वर्षे कार्य करीत आहेत. तेथील पुढारी त्याविरुद्ध आवाज न उठविता उलट त्यांना साहाय्यच करीत असतात. २२ ऑगस्ट १९६७ च्या 'टाईम्स ऑफ इंडिया' मध्ये पहिल्याच पानावर पुढील अर्थाची बातमी होती : "आसाम हा आसामी लोकांसाठी आहे अशा पाट्या आसाममध्ये ठिकठिकाणी आढळतात. तेलगू चित्रपटांवर बंदी घालावी म्हणून ओरिसामधील तरुण चळवळ करीत आहेत; ओरिसामधील लोकांना बंगालमधील लोकांकडून गाड्यांतून ओढून काढून बडवले आणि मारले गेले." म्हैसूरमध्ये बेकायदा मिळविलेल्या प्रदेशाचे पद्धतशीर कानडी-करण चालू आहे. तेथे बसवदल नावाची शिवसेनेप्रमाणेच एक संघटना निर्माण झाली आहे. सबंध देशातच अशी परिस्थिती असताना केवळ शिवसेनेवर प्रांतीयतेचे खापर फोडणे योग्य आहे काय ? का स्वत: संततिनियमन करून, ते न करणाऱ्या केरळी लोकांना अन्न, वस्त्र, थारा देण्याची जबाबदारी महाराष्ट्राची आहे ? शिवसेनेचे लक्ष्य विशेषत: दाक्षिणात्य आहेत हे सत्य आहे; परंतु त्याचे कारण—ते लोकच आहेत हे वर येऊन गेले आहे. कै. बर्वे हे केवळ मराठी आणि श्री. मेनन हे दाक्षिणात्य ह्या एकाच कारणाने एकजात सर्व दक्षिण भारतीयांनी मेननना मते द्यावीत हे मनाला पटत नाही. स्वत:च्या राज्यात स्वत:च्या भाषेचे महत्त्व अवास्तव वाढवणारे हे लोक आज मुंबई विश्वविद्यालयात मात्र मराठी माध्यम करण्यास विरोध करीत आहेत.

शिवसेनेचे तत्त्व आणि मागण्या योग्य परंतु मार्ग चुकीचा, अशी टीका काही लोक करतात. परंतु ती टीकाही चुकीची, पूर्वग्रहदूषित नजरेने झाली आहे. मुंबईमधील प्रत्येक दंगलीमागे शिवसेनेचा संबंध लावला जातो. दंगलीला शिवसेनेशिवाय इतर कारणे असू शकत नाहीत काय ? तसे असेल तर शिवसेनेच्या कक्षेबाहेरील नक्षल-बारीत दंगल कशी झाली ? तामीळनाडमध्ये हजारो झोपड्यांची राखरांगोळी कोणी केली ? कलकत्त्यामध्ये वारंवार दंगली कशा होतात ? आज भारतीय जीवनातील असंतोष सबंध भारतातच दंगलीच्या स्वरूपात वारंवार दिसून येत आहे. गुंड आणि देशद्रोही लोक त्यांना मिळणाऱ्या संधीचा फाजील फायदा घेत आहेत. त्याला शिव-सेना जबाबदार नाही. मराठी लोकांना धंद्यात आणि इतरत्र उत्तेजन देणे आणि मराठी समाजाला संघटित, जागृत करणे हे शिवसेनेचे मुख्य कार्य आहे.

**प्रा. केशव आचार्य**, मुंबई

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H–649

नवे साहित्य

ऐतिहासिक कथासंग्रह

# पुरंदऱ्यांची दौलत

बाबासाहेब पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि.. ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९